CMYK

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | सोमवार, ६ जुलै २०२६ | वर्ष ४ थे अंक ११६ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



रणभूमीवरील प्रतिस्पर्ध्याला केवळ शेरास सव्वा शेर हीच भाषा समजते. युद्धातील योद्धा जखमा आणि मृत्यूची नोंद ठेवत नाही. प्रतिस्पर्ध्यापेक्षा आपण अधिक शक्तिशाली आहोत, त्याला समजणाऱ्या भाषेतच उत्तर देऊन समस्या कायमची दूर करू शकतो.

**- स्व. यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे
पूर्व सह सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



**'एक देश में दो विधान, दो प्रधान, दो निशान नहीं चलेंगे'चा नारा देणारे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची आज जयंती**

# सेमीकंडक्टर प्रकल्प काँग्रेसमुळे रखडला

### पंतप्रधान मोदींचा घणाघात | २० वर्षांपूर्वी प्रस्ताव धुडकावला | तत्कालीन सरकार विकासविरोधी



गुजरातच्या साणंद येथे सेमीकंडक्टर प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित पंतप्रधान मोदींचे स्वागत करताना कंपनीचे संचालक, बाजूला अश्विनी वैष्णव

**गाधीनगर, ५ जुलै**

सुमारे दोन दशकापूर्वी गुजरातचा मुख्यमंत्री असताना राज्यात सेमीकंडक्टर प्रकल्प उभारण्याची संपूर्ण योजना तयार केली होती.

मात्र, केंद्रातील तत्कालीन काँग्रेस सरकारने प्रकल्पाचा धुडकावला. विकासविरोधी सरकारमुळे हा प्रकल्प रखडला, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.

गुजरातच्या सानंद येथे त्यांनी 'सीजी सेमी'च्या आउटसोर्स केलेल्या सेमीकंडक्टर असेंब्ली अँड टेस्ट (ओएसएटी ) प्रकल्पाचे उद्घाटन केले. या कार्यक्रमादरम्यान मोदी यांनी आपल्या जुन्या अपुऱ्या प्रकल्पाचा उल्लेख करत काँग्रेसवर टीका केली. २० वर्षांपूर्वी किंवा कदाचित त्याहूनही आधी, मी गुजरातमध्ये सेमीकंडक्टर प्रकल्प उभारण्याची योजना आखली होती. मी गांधीनगर आणि प्रांतिजजवळ ३५० ते ४०० एकर जमिनही निश्चित केली आणि काही कंपन्यांशी चर्चाही झाली होती. त्यावेळच्या केंद्रातील काँग्रेस सरकारने प्रकल्पाला मंजुरी दिली नाही आणि प्रकल्प रखडला. त्यावेळी मी सेमीकंडक्टर विषयावर बोलायचो, तेव्हा प्रसारमाध्यमे माझी थट्टा उडवत होते. तेव्हा हे होऊ शकले नाही. मात्र, आज ते प्रत्यक्षात येताना पाहून मला प्रचंड आनंद होत आहे.

**दशकाच्या प्रयत्नामुळे उद्योगांचा विस्तार**

भारतातील सेमीकंडक्टर उद्योगाचा विस्तार एका रात्रीत झालेला नाही; गेल्या दशकात भारतात झालेल्या इलेक्ट्रॉनिक्स क्रांतीचे हे फलीत आहे. सानंदमधील सीजी सेमी ओसॅट चिप उत्पादन प्रकल्प आत्मनिर्भरतेला प्रोत्साहन देईल आणि जागतिक सेमीकंडक्टर मूल्य साखळीमध्ये भारताचे स्थान अधिक मजबूत करेल. भारताला सेमीकंडक्टर उत्पादनात आत्मनिर्भर आणि आघाडीचा देश बनवण्याचे सरकारचे लक्ष्य आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### भारत जे ठरवतो ते साध्य करतो

देश आपला दृढनिश्चय कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्षात उतरवतो. भारत जे ठरवतो ते साध्य करतो. पाच वर्षांपूर्वी सुरू केलेल्या धोरणात्मक दृष्टिकोनाची आठवण करून देताना मोदींनी सांगितले की, देशाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे जागतिक केंद्र बनवणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे. आम्ही 'डिझाइन इन इंडिया' आणि 'मेक इन इंडिया' या मूळ मंत्रासह यशस्वीपणे पुढे वाटचाल करत आहे. पंतप्रधानांनी या प्रकल्पाताल कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. ■

# ५८ अभियांत्रिकी महाविद्यालयांना टाळे

### एआयसीटीईचा निर्णय, महाराष्ट्र, उत्तर प्रदेशातील सर्वाधिक महाविद्यालये

**नवी दिल्ली, ५ जुलै**

देशभरातील तब्बल ५८ इंजिनिअरिंग आणि तंत्रशिक्षण महाविद्यालयांनी नियमांचे पालन करण्याकडे दुर्लक्ष केल्याने ती कायमची बंद करण्याचा निर्णय 'ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन' (एआयसीटीई) ने घेतला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, महाविद्यालय बंद होण्याच्या या यादीत महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश दोन्ही राज्ये अव्वलस्थानी आहेत. बंद करण्यात आलेली महाराष्ट्रातील



१२ आणि उत्तर प्रदेशातील १२ महाविद्यालयांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी ५८ महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून 'प्रोग्रेसिव्ह क्लोजर' म्हणजेच टप्प्याटप्प्याने बंद करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याशिवाय, विविध महाविद्यालयामधील तब्बल ९५० पेक्षा जास्त अभ्यासक्रम देखील कायमचे बंद करण्यात आल्याची माहिती एआयसीटीईने प्रसिद्धीपत्रकातून दिली आहे. ज्या महाविद्यालयांची नावे यादीत आहे, त्यांना यावर्षीपासून पहिल्या वर्षासाठी नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही. मात्र, जे विद्यार्थी आधीपासूनच तिथे शिकत आहेत, त्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्याची पूर्ण परवानगी असेल. त्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल. ◂ (वृत्तसंस्था)

**तीन सरकारी अनुदानित महाविद्यालयांचा समावेश**

बंद झालेल्या ५८ संस्थांमध्ये खाजगी महाविद्यालयांची संख्या सर्वाधिक आहे. एकूण संस्थांपैकी फक्त ३ सरकारी अनुदानित आहेत, तर बाकी सर्व खाजगी आहेत. राज्यांचा विचार केला तर महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशमध्ये प्रत्येकी १२ महाविद्यालये, मध्य प्रदेशमध्ये ८, तेलंगणा आणि पंजाब मध्ये प्रत्येकी ४, आंध्र प्रदेश आणि राजस्थान मध्ये प्रत्येकी ३, गुजरात आणि कर्नाटक मध्ये प्रत्येकी २, तामिळनाडू, हरियाणा, ओडिशा, उत्तराखंड आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी १ महाविद्यालय बंद करण्याचा आदेश जारी करण्यात आला. ■

### निर्णय घेण्याचे कारण काय?

- एआयसीटीई ही देशातील तंत्रशिक्षणाचे नियमन करणारी सर्वोच्च संस्था आहे
- या महाविद्यालयात गेल्या काही वर्षांत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमालीची घटली
- नियमाप्रमाणे आवश्यक असलेले पात्र प्राध्यापक टिकवून ठेवण्यात महाविद्यालये अपयशी ठरली
- लायब्ररी, लॅब आणि इतर पायाभूत सुविधांच्या नियमांच्या पालनाकडे दुर्लक्ष
- नियमांचे पालन करण्याच्या सूचना देऊनही महाविद्यालयाकडून दुर्लक्ष करण्यात आले. ■

### शिक्षकांची गुरुवारी शाळा बंदची हाक

**पुणे, ५ जुलै**

राज्यातील शिक्षक संघटनांनी ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाची हाक दिली असून, सामूहिक रजा घेऊन आंदोलन केले जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक मध्यवर्ती शिक्षक संघटनेचे सरचिटणीस राजेश सुर्वे आणि शिक्षक महासंघ मुंबई व कोकण विभागाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी पुणे येथे माध्यमांशी बोलताना दिली.

बीएलओ, पदोन्नती प्रक्रिया याविरोधात आंदोलन करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येणाऱ्या एसआयआर मोहिमेसाठी शिक्षकांची नियुक्ती करण्यास राज्यातील शिक्षक संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# ६३ वर्षीय वृध्दाने केला १४ वर्षीय मुलाचा विनयभंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जुलै-**

६३ वर्षीय वृध्दाने १४ वर्षीय अल्पवयीन मुलाचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सलीम हुंडेकरी (रा.जुना विडी घरकुल, सोलापूर) असे त्या आरोपीचे नाव आहे. एमआयडीसी पोलिस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करुन त्यास अटक करण्यात आली.



ही घटना शनिवार, दि.४ जुलै २०२६ रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास हैद्राबाद रोडवरील जुना विडी घरकुल परिसरात घडली. यातील पीडित अल्पवयीन मुलगा घरी असताना आरोपी सलीम हुंडेकरी याने पाणी पिण्याच्या बहाण्याने आपल्या घरी बोलावले.

घरी बोलावल्यानंतर आरोपीने पीडित मुलाचा हात पकडून ओढत अश्लील भाषा वापरुन त्याला घट्ट मिठी मारत कपडे काढण्याचा प्रयत्न केला. तेव्हा पिडीत मुलाने आरोपीच्या तावडीतून सुटून बाहेर पळून जात असताना आरोपीने त्याला घरात ओढले आणि अंगावर हात टाकून विनयभंग केला.

या प्रकारानंतर घाबरलेल्या पिडीत मुलाने घरी जाऊन घडलेला सर्व प्रकार नातेवाईकांना सांगितला. यानंतर पीडित मुलाच्या नातेवाईकांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली.

## महत्त्वाचे

### ईपीएफओ पोर्टल पुन्हा सुरू

**नवी दिल्ली :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेचे (ईपीएफओ) युनिफाइड मेंबर पोर्टल पुन्हा सुरू झाले आहे. पोर्टल अद्यावत करण्यासाठी मागील एक आठवड्यापासून ते बंद होते. नवीन पोर्टलमध्ये सुधारित डिझाइन, जलद प्रक्रिया आणि अधिक सुरक्षित वैशिष्ट्ये आहेत. तथापि, पोर्टलमध्ये यूएएन (युनिव्हर्सल अकाउंट नंबर) सक्रिय करणे आणि नवीन यूएएन तयार करणे या सेवा यापुढे ईपीएफओ पोर्टलवर उपलब्ध राहणार नाहीत. या दोन्ही सेवा सरकारच्या उमंग ॲपवर हलवण्यात आल्या आहेत, जिथे ही प्रक्रिया आधार-आधारित चेहरा प्रमाणीकरण तंत्रज्ञानाद्वारे पूर्ण केली जाईल. ऑनलाइन सेवा अधिक जलद, सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवण्यासाठी डेटाबेस एकत्रीकरण आणि सॉफ्टवेअर आधुनिकीकरणाचा भाग म्हणून हा बदल करण्यात आला आहे. ■

### मुंबईसह उपनगरात मुसळधार पावसाचे दोन बळी

**मुंबई-चिपळूण ५ जुलै -**

मुंबई उपनगर व कोकण विभागात रविवारी दि. ५ रोजी झालेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. महानगरांत झाड कोसळून दोन जणांचा मृत्यू झाला. गोरेगाव पुर्वमधील आरे कॉलनीत सायकलवरुन जाणाऱ्या १८ वर्षीय युवकाच्या अंगावर झाड कोसळून त्याचा मृत्यू झाला. कुर्ला भागात दुकानावर झाड कोसळून एकाचा मृत्यू झाला आहे. दरम्यान मुसळधार पावसामुळे मुंबई परिसरातील अनेक रस्ते पाण्याने वेढले आहे. वाहतुकीचा खोळंबा झाला आहे. मुंबई गोवा महामार्गावर वाहतूक सहा तास बंद होती. कोकणातील कुंडलिका अंबा, सावित्री, जगबुडी, वशिष्टी, अर्जुना या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. कोकण विभागात हवामान खात्याने अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केला आहे.

### राम मंदिर ट्रस्टची महत्त्वपूर्ण बैठक आज

**अयोध्या, ५ जुलै**

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टची एक महत्त्वपूर्ण बैठक सोमवारी होणार आहे. याबैठकीत ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांनी सादर केलेल्या राजीनाम्यांचा मुद्दा प्रामुख्याने चर्चेत राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती ट्रस्टच्या सूत्रांनी वृत्तसंस्थेला दिली.

ही बैठक ट्रस्टचे अध्यक्ष नृत्य गोपाल दास यांच्या मणीराम छावणी या मठात होणार आहे. ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंद देव गिरी यांनी सर्व नियमित आणि पदसिद्ध सदस्यांना या चर्चेत सहभागी होण्यास सांगितले आहे. प्रकृती चिंताजनक असल्याने रुग्णालयात दाखल असलेले ट्रस्टचे अध्यक्ष नृत्य गोपाल दास आणि वयोमानामुळे उद्भवलेल्या आरोग्यांच्या समस्यांमुळे प्रवास न करू शकणारे के. परासरन हे आभासी स्वरूपात बैठकीत सहभागी होऊ शकतात. ◂ (वृत्तसंस्था)

# गायिका तीजनबाई कालवश

### छत्तीसगडमध्ये अन्त्यसंस्कार

**दुर्ग, ५ जुलै**

दमदार आवाजाने आणि भावपूर्ण शैलीच्या बळावर छत्तीसगडची पारंपरिक कथाकथनाची कला जगभरातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या पंडवानी या लोककलेच्या प्रख्यात गायिका पद्मविभूषण तीजनबाई यांचे दीर्घ आजारानंतर रविवारी रायपूर येथील एम्स रुग्णालयात निधन झाले, अशी माहिती डॉक्टरांनी दिली. त्या ७० वर्षांच्या होत्या. छत्तीसगडमधील दुर्ग जिल्ह्यातील मूळ गावी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार करण्यात आले.

२७ मेपासून उपचार घेत असलेल्या तीजनबाई यांनी रुग्णालयात पहाटे सव्वातीन वाजता शेवटचा श्वास घेतला, असे डॉक्टरांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र



मोदी यांनी तीजनबाई यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आणि आपल्या सादरीकरणाद्वारे छत्तीसगडच्या लोककलेला एक वेगळी जागतिक ओळख मिळवून दिल्याचे सांगितले. भारतीय लोककला आणि संस्कृतीतील त्यांचे अतुलनीय योगदान सदैव स्मरणात राहील, अशी प्रतिक्रिया छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी व्यक्त केली.

दुर्ग जिल्ह्यातील गनियारी गावात एका सामान्य कुटुंबात १९५६ मध्ये जन्मलेल्या आणि पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित असलेल्या तीजनबाई यांना लहानपणापासूनच महाभारतातील कथा ऐकण्याची व त्या सादर करण्याची आवड निर्माण झाली. ◂ (वृत्तसंस्था)

### विदेशात मोठ्या प्रमाणात सादरीकरण

तीजनबाई यांनी केवळ भारतच नव्हे, तर अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जपान, रशिया, ऑस्ट्रेलिया आणि जर्मनीतही सादरीकरण करीत छत्तीसगडच्या समृद्ध सांस्कृतिक वारशासाठी जागतिक स्तरावर ओळख मिळवली. ■

### विविध पुरस्कारांनी सन्मानित

भारतीय लोककलांमधील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाची दखल घेऊन त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या पद्मविभूषण या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. ■

# अल्पवयीन मुलीचे लग्न; आई-वडील, सासरच्या मंडळीसह दोन डॉक्टरांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जुलै-**

एका अल्पवयीन मुलीचे लग्न लावल्याप्रकरणी त्या मुलीचे आई-वडील, सासरच्या मंडळींसह दोन डॉक्टरांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सदर घटना दि.५ जानेवारी २०२४ रोजी घडली. दि.५ जुलै २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी अंगणवाडीच्या मुख्य सेविका यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, यातील पीडित मुलगी अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही, आरोपींनी तिचे लग्न लावून दिले. त्यानंतर पीडित मुलगी गरोदर राहिली आणि तिने बाळाला जन्म दिला. दरम्यान, पीडिता अल्पवयीन आणि गरोदर असतानाही, ही बाब पोलिसांना न कळवता उपचार केल्यामुळे अमीन व मार्कंडेय हॉस्पीटल येथील डॉक्टर आणि पिडीतेचे आई-वडील, आत्या, सासू, आणि पती यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### प्रशांत किशोर निवडणूक लढविणार

**पाटणा :** राजकीय रणनीतिकार प्रशांत किशोर यांनी गतवर्षी गाजावाजा करत बिहार विधानसभेची निवडणूक लढवली. मात्र त्यांच्या पक्षाला अपयशाचा सामना करावा लागला. बांकीपूरमधून ते लढणार आहेत. ■

# देशातील १६६ जलाशये कोरडेच



### जुलै उजाडूनही तुटवडा

### क्षमतेच्या केवळ २६ टक्के पाणीसाठा शिल्लक

**नवी दिल्ली, ५ जुलै**

यावर्षी उशिराने दाखल झालेला मान्सून जूनच्या अखेरीस देशाच्या बहुतांश राज्यात सक्रिय झाला, अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस कोसळत असताना जलाशये भरण्यासाठी अजूनही मुबलक पावसाची प्रतीक्षा आहे. जुलै महिना उजाडला असून, अद्याप देशातील १६६ मोठी जलाशये कोरडीच आहे. अनेक राज्यांसाठी सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या जलाशात क्षमतेच्या केवळ २६ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे.

केंद्रीय जल आयोगाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार १६६ प्रमुख धरणांमध्ये त्यांच्या एकूण क्षमतेपैकी केवळ २६ टक्के पाणी उपलब्ध आहे. यामागे पावसाचे असमान वितरण हे प्रमुख कारण आहे. गेल्या दशकभराच्या तुलनेत यावर्षी जलाशयातील पाण्यात विक्रमी घसरण झाल्याचे आयोगाने म्हटले आहे. देशात जवळपास सर्वत्र मान्सून सक्रिय असून, मुसळधार पावसामुळे अनेक राज्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. तथापि, देशातील प्रमुख जलाशयांची परिस्थिती गंभीर असल्याने पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. पावसाच्या अत्यंत असमान भौगोलिक वितरणामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. जवळपास दोन तृतीयांश जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाल्याचे आयोगाने म्हटले आहे. अनेक जलाशयांची पातळी सामान्य पातळीपेक्षा १६ ते ४६ टक्क्यांनी खाली आहे.

**दक्षिण, पूर्व भारताला सर्वाधिक फटका**

पुढील काही आठवड्यांत पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस पडला नाही, तर खरीप शेती, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि जलविद्युत निर्मितीवर दबाव वाढू शकतो. केंद्रीय जल आयोगाच्या मते, १३ राज्यांमधील पाणीसाठा गेल्या दहा वर्षांच्या सरासरीपेक्षा कमी आहे. यामध्ये हिमाचल प्रदेश, पंजाब, बिहार, झारखंड, मेघालय, मिझोराम, नगालँड, ओडिशा, पश्चिम बंगाल, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि तेलंगणा यांचा समावेश आहे. दक्षिण भारतातील कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि तेलंगणा या राज्यांमध्ये अनेक जलाशये कोरडीच आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### महाराष्ट्राला दिलासा

महाराष्ट्रात पावसाने दमदार हजेरी लावल्याने सध्या प्रमुख जलाशयात ६० टक्क्यांपेक्षा अधिक पाणीसाठा उपलब्ध आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यातील जलाशयातील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. दुसरीकडे विदर्भातील जलाशयात अजूनही सरासरीपेक्षा कमी पाणी उपलब्ध आहे. ■



# इन्स्टाग्रामला केंद्र सरकारची नोटीस

### बाल लैंगिक शोषणाशी संबंधित मजकूर

**नवी दिल्ली, ५ जुलै**

इन्स्टाग्राममधील सशुल्क जाहिरातींमध्ये बाल लैंगिक शोषण आणि गैरवर्तन सामग्रीवर (सीएसईएएम) सरकारने मेटाला कठोर नोटीस जारी केली आहे, अशी माहिती सूत्रांनी रविवारी दिली. ही नोटीस शनिवारी सायंकाळी जारी करण्यात आली.

सीएसईएएमला प्रोत्साहन देणाऱ्या आणि त्यापर्यंत पोहोचण्यास मदत करणाऱ्या सर्व जाहिराती व मजकूर बंद करण्याचा आदेश इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने इन्स्टाग्रामला दिला आहे, असे सूत्रांनी सांगितले. बाल लैंगिक शोषणाच्या साहित्याला कथितपणे प्रोत्साहन देणाऱ्या इन्स्टाग्राम जाहिरातींप्रकरणी मेटाला समन्स बजावण्याचा निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांना दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही घडामोड समोर आली.

मुलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित मजकुराच्या जाहिरातींबाबतच्या आरोपांवरून मेटाला पाठवलेल्या नोटीसमध्ये मंत्रालयाने स्पष्टीकरण आणि केलेल्या कारवाईची माहिती मागवली आहे, असे सूत्रांनी सांगितले. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने देखील सात दिवसांच्या आत सविस्तर स्पष्टीकरण मागितले आहे. कॅलिफोर्नियातील तंत्रज्ञान क्षेत्रातील मेटा कंपनी या समाज माध्यम मंचाची मालक आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### अल्गोरिदममध्ये गडबड

मेटाचा शिफारस अल्गोरिदम बाल लैंगिक शोषणाचे साहित्य असलेले व्हिडीओ प्रसारित करीत होता. यामुळे सुरक्षा उपायांतील गंभीर त्रुटी उघड झाल्या, असा आरोप 'बीबीसी'च्या बातमीत केल्याच्या पृष्ठभूमीवर मंत्रालयाने ही कारवाई केली आहे. तपासात फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर अशा प्रकारच्या जाहिराती दिसून आल्याचेही समोर आले होते. विशेष म्हणजे, मेटाच्या जाहिरात धोरणांमध्ये नग्नता आणि लैंगिकदृष्ट्या स्पष्ट मजकुरावर स्पष्टपणे बंदी घालण्यात आली आहे. ■

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### माथेरानमध्ये विक्रमी ४०८ मिलिमीटर पाऊस

**चिपळूण :** रायगड आणि ठाणे जिल्ह्यात मागील २४ तासांत पावसाने अक्षरशः हाहाकार उडवला आहे. माथेरानमध्ये सर्वाधिक आणि विक्रमी ४०८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्यापाठोपाठ कर्जतमध्ये २९१ मिमी, बदलापूर शहरात २३८ मिमी, तर भीमाशंकर येथे २३७ मिमी पाऊस बरसला आहे. भौगोलिकदृष्ट्या माथेरान, कर्जत आणि भीमाशंकर या उंचावरील भागात जोरदार पाऊस झाल्यास त्याचे सर्व पाणी वेगाने उल्हास नदीच्या पात्रात येते. येथून वाहणाऱ्या पोशिर आणि चिल्हार नदी उल्हास नदीला येऊन मिळते. या नद्यांच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने नदीच्या पाणी पातळी वाढली. त्यामुळे काल रात्रीपासूनच उल्हास नदीच्या पाणी पातळीत सातत्याने वाढ होत होती. रात्रीच्या वेळी पाण्याची पातळी वाढत गेल्याने नदीकाठच्या भागात चिंतेचे आणि तणावाचे वातावरण होते. रविवार सकाळी १० वाजेपर्यंत बदलापूर येथे उल्हास नदीची पाणी पातळी १४.६५ मीटरवर पोहोचली होती. उल्हास नदीची इशारा पातळी १६.५० मीटर तर धोक्याची पातळी १७.५० मीटर निश्चित करण्यात आली आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास नदी लवकरच इशारा आणि त्यानंतर धोक्याची पातळी ओलांडेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# आम्हाला मदत करा

## व्याप्त-काश्मिरातील नेत्यांनी मागितली भारताकडे मदत

**नवी दिल्ली, ५ जुलै**

व्याप्त-काश्मिरातील परिस्थिती आता पूर्णतः अनियंत्रित झाली आहे. पाकिस्तान सरकार करीत असलेले अत्याचार आणि ६०० पेक्षा जास्त सामाजिक कार्यकर्त्यांच्या अटकेनंतर पाकिस्तानात विद्रोह भडकला आहे. आम्हाला मदत करा, अशी मागणी आंदोलक नेत्यांनी भारताकडे केली आहे. व्याप्त काश्मिरात शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख आसिम मुनीरच्या विरोधात उग्र निदर्शने करण्यात आली. गेल्या महिनाभरापासून व्याप्त काश्मिरात उग्र आंदोलन सुरू आहे.

आंदोलनातील मोठे नेते शौकत नवाज मीर यांना नजरकैद केल्यामुळे संतप्त झालेल्या जॉईंट ॲक्शन कमेटीने आता थेट पाकिस्तान सरकारला आव्हान दिले आहे. जम्मू-काश्मीर जेएएसीचे मुख्य सदस्य सरदार अमन खान यांची एक चित्रफीत सध्या झपाट्याने समाज माध्यमावर व्हायरल होत आहे. या चित्रफितीत ते जम्मू-काश्मिरातील लोकांशी संवाद साधत आहेत आणि पाकिस्तानी सरकारचे अत्याचार, पिठापासून ते मिठापर्यंतचा तुटवडा तसेच तेथील दयनीय अवस्थेवर खंत व्यक्त करीत असल्याचे दिसून आले. मेंढर, पूंछ, राजौरी आणि डोडा जिल्ह्यातील जनतेला मदत करावी. आमच्या येथे अन्नधान्य आणि औषधांची तीव्र टंचाई आहे. आम्हाला तुमच्या मदतीची गरज आहे, असे आवाहन सरदार अमन यांनी जम्मू-काश्मिरातील नागरिकांना केले. पाकिस्तानी अत्याचाराच्या विरोधात एकत्र येऊन आवाज उठवा तसेच आम्हाला मदत करा, असे आवाहन अमन खान यांनी श्रीनगर, बारामुल्ला, पूंछ, मेंढर, राजौरी, जम्मू, लडाख, कारगिल आणि गिलगिट-बाल्टिस्तानातील लोकांकडे केले.



व्याप्त काश्मिरात पाकिस्तानी सरकारच्या विरोधात सुरू असलेले आंदोलन

**आम्हाला नियंत्रण रेषा रद्द करायची आहे**

पाकिस्तानी ताब्यातून मुक्तीची तीव्र इच्छा व्यक्त करीत, जेएएसीच्या एका नेत्याने दोन्ही देशांना विभागणारी सीमाच रद्द करण्याची मागणी केली.

सीमेपलीकडे भारतीय हद्दीत राहणाऱ्या लोकांना संबोधित करताना त्यांनी सांगितले की, आम्हाला ही शस्त्रसंधी रेषा कायमची पुसून टाकायची आहे आणि हे साध्य करण्यासाठी आम्हाला तुमच्या मदतीची गरज आहे. पाकिस्तानी शासकांनी स्थानिक लोकांना कमी लेखण्याची चूक करू नये, असा इशारा अमन खान यांनी पाकिस्तानी शासकांना दिला. ◂ (वृत्तसंस्था)

### आंदोलकांवर पाकिस्तानी लष्कराचा गोळीबार

व्याप्त काश्मिरात जॉइंट अवामी ॲक्शन कमिटीने रविवारी केलेल्या शांततापूर्ण निदर्शन रॅलीवर पाकिस्तानी सैन्याने गोळीबार केला. अब्बासपूर येथील सरदार गुलाम हुसेन खान स्पोर्ट्स स्टेडियममध्ये सुमारे ४० हजार लोक जमले होते, असा दावा जेएएसीने केला. डुडियालच्या एएमबी परिसरात शांततापूर्ण निदर्शन करणाऱ्या लोकांवर पाकिस्तानी लष्कराने कोणत्याही चिथावणीशिवाय गोळीबार केला. यात अनेक लोक गंभीर जखमी झाले. मात्र, जखमींची अधिकृत संख्या किंवा पाकिस्तान प्रशासनाकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. ■

# नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावरील आपत्कालीन निर्बंध हटविले

## मध्यपूर्वेतील परिस्थिती नियंत्रणात आल्याने केंद्र सरकारचा निर्णय



**नवी दिल्ली, ५ जुलै**

पश्चिम आशियातील तणाव कमी झाल्यानंतर आणि होर्मुझ सामुद्रधुनीतून एलएनजी (लिक्विफाइड नॅशनल गॅस) चा पुरवठा पूर्ववत झाल्यानंतर केंद्र सरकारने नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावर लागू केलेले बहुतांश आपत्कालीन निर्बंध आता पूर्णपणे हटवले आहेत. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने रविवारी प्रसिद्धीपत्रकातून ही माहिती दिली.

पश्चिम आशियातील संघर्षाच्या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारने ९ मार्च २०२६ रोजी आवश्यक वस्तू कायद्यांतर्गत ही आपत्कालीन व्यवस्था लागू केली होती. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर आणि त्यास इराणकडून दिलेल्या प्रत्युत्तरामुळे होर्मुझमधून होणाऱ्या तेल आणि वायूचा पुरवठा विस्कळीत झाला होता. त्यानंतर नैसर्गिक वायूच्या पुरवठ्याबाबतचे निर्बंध लागू केले होते. मंत्रालयाने अधिसूचनेत म्हटले आहे की, सध्या या प्रदेशात युद्धविराम लागू असून चर्चेची प्रक्रिया सुरू आहे. तसेच होर्मुझमधील सागरी वाहतूकही पूर्ववत झाली आहे. त्यामुळे नैसर्गिक वायू पुरवठ्यावरील आपत्कालीन निर्बंध कायम ठेवण्याची आवश्यकता उरलेली नाही. पश्चिम आशियातील संकटाच्या काळात ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला होता.

**काय घेतला होता निर्णय ?**

पेट्रोकेमिकल प्लांट्स आणि गॅसवर चालणाऱ्या वीज प्रकल्पांच्या पुरवठ्यात कपात करण्यात आली होती. तसेच तेल रिफायनरींनाही त्यांचा वापर ६५ टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्यास सांगितले होते. या संपूर्ण गॅसचे पुनर्वितरण आणि नवीन किंमत ठरवण्याची जबाबदारी गेल कंपनीकडे सोपवण्यात आली होती. आता हे सर्व निर्बंध हटल्यामुळे देशातील उद्योगधंदे आणि ऊर्जा क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला असून बाजारपेठ पूर्वपदावर येण्यास मदत होणार आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# भोंदू खरातच्या चौकशीची ‘ईडी’ला विशेष परवानगी

**नाशिक, ५ जुलै**

भविष्यवाणी आणि दैवी शक्तीच्या नावाखाली महिलांचे शोषण व आर्थिक लूट करणारा भोंदू अशोक खरात याच्याभोवती सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) आपला पाश घट्ट केला आहे. विशेष म्हणजे, संशयितांना नेहमी आपल्या कार्यालयात बोलावून चौकशी करणारी ईडी आता थेट नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात तळ ठोकणार आहे. नेहमीच्या चौकशीपेक्षा ही चौकशी हायटेक असणार आहे, कारण ईडीचे अधिकारी थेट लॅपटॉप, मोबाईल आणि प्रिंटर घेऊन तुरुंगातच खरातचा जाबजबाब घेणार आहेत. ईडीच्या चार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकाला ३ ते ९ जुलै या कालावधीत नाशिकरोड कारागृहात जाऊन चौकशी करण्याची विशेष परवानगी दिली आहे.

चौकशीदरम्यान ईडीच्या पथकाला मोबाईल फोन, लॅपटॉप, प्रिंटर, डिजिटल उपकरणे, पेन ड्राइव्ह आणि इतर आवश्यक शैक्षणिक व लेखन साहित्य तुरुंगात सोबत नेण्याची मुभा असेल, असे न्यायालयाने कारागृह प्रशासनाला दिलेल्या आदेशात स्पष्ट केले आहे.

**नऊ जुलैनंतर अहवाल ?**

ईडीच्या मुंबई झोनचे सहायक संचालक अभय कुमार यांच्या नेतृत्वाखालील अंमलबजावणी अधिकारी जी. बी. व्ही. सत्यनारायण, अंकुर त्रिपाठी आणि पंकज कुमार या चार अधिकाऱ्यांचे पथक पीएमएलए कायद्याच्या कलम ५० (२) आणि ५० (३) अंतर्गत हा जबाब नोंदवणार आहे. ७ जुलै रोजी मुंबई विशेष न्यायालयात या खटल्याची पुढील सुनावणी होणार असल्याने, ईडी त्यापूर्वीच खरातकडून महत्त्वाचे गुपिते काढून घेण्याच्या तयारीत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# उद्धव ठाकरे यांनी रोज ‘रामरक्षा’ म्हणावी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सल्ला



**चंद्रपूर, ५ जुलै**

उद्धव ठाकरे यांना श्रीराम आठवले, याचा मला आनंद आहे. ते श्रीरामापासून दूर गेले होते म्हणून त्यांच्या पक्षाची ही अवस्था झाली. मात्र त्यांनी केवळ आजच्या दिवसापुरते नव्हे, तर रोज ‘रामरक्षा’ म्हणावी. त्यांचे भले होईल, असा सल्ला मुख्यमंत्र्यांनी यांनी दिला.

अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरातील कथित चोरी प्रकरणावरून उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्यभरात आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. या पृष्ठभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, उद्धव ठाकरे यांना खोचक सल्ला दिला. चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे एका खाजगी धार्मिक कार्यक्रमासाठी ते रविवारी फडणवीस वाड्यावर आले होते. त्यावेळी माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले, उद्धव ठाकरे यांना राम आठवले, याचा मला नक्कीच आनंद आहे. आमची अपेक्षा एवढीच होती की, त्यांना राम आठवले पाहिजेत. यापूर्वी त्यांनी रामाचा मार्ग सोडला होता. त्यामुळेच त्यांच्या पक्षाची अधोगती झाली. आता त्यांनी जर पुन्हा रामाच्या मार्गाने जाण्याचे ठरवले असेल, तर त्यांचे नक्कीच भले होईल, असेही फडणवीस म्हणाले. ◂ (तभा वृत्तसेवा)

### देशातील हिंदूंनी जागे राहावे : उद्धव ठाकरे

**मुंबई : उबाठा गटाने रविवारी ‘रामरक्षा आंदोलन’ केले. दादरच्या ऐतिहासिक हनुमान मंदिरात महाआरती तसेच रामरक्षा स्त्रोत आणि हनुमान चालीसा, मारुती स्त्रोत पठणाने राज्यव्यापी आंदोलनाची सुरुवात झाली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी यावेळी भाषण करताना देशातील हिंदुंनी आता जागे राहावे, असे आवाहन केले. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी देशातील तमाम हिंदूंना जागे केलं होते, विखुरलेल्यांना एक केले होते, तो क्षण आजही डोळ्यासमोर आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.** ■

### जखमी खलाशाचा नौदलाने वाचवला जीव

**मुंबई :** खराब हवामान आणि मुंबईच्या किनाऱ्याजवळ जारी केलेल्या रेड अलर्टच्या परिस्थितीत, भारतीय नौदलाने एमटी देश शक्ती या कच्च्या तेलाच्या टँकरमधून एका जखमी खलाशाला यशस्वीरित्या हवाई मार्गाने बाहेर काढून त्याचा जीव वाचविला. नौदलाच्या आयएनएस शिक्रावरून उड्डाण करणाऱ्या सी किंग हेलिकॉप्टरने रेड अलर्ट, मुसळधार पाऊस, कमी दृश्यमानता आणि मुंबईच्या किनाऱ्याजवळील खवळलेले समुद्र यांसारख्या आव्हानात्मक परिस्थितीत जहाजावर जखमी झालेल्या खलाशाला सुखरूप उपचारासाठी रुग्णालयात हलवले. ■



**दिवे घाट परिसरावर पावसाने हिरवाईची उधळण केली असून डोंगरकड्यांवरून कोसळणारे लहान-मोठे झरे निसर्गसौंदर्याला अधिक खुलवत आहेत. मस्तानी तलावात पाण्याची आवक सुरू झाल्याने परिसर नव्या उत्साहाने न्हाऊन निघाला आहे. धुक्याची चादर, हिरवागार नजारा आणि दूरवर दिसणाऱ्या पुण्याचे विहंगम दृश्य पर्यटकांचे मन मोहून टाकत आहे. (छाया : सुशील राठोड)**




### खडगे आणि किरेन रिजिजू यांच्यातील साम्य

**राज्यसभेवर** अविरोध निवडून आल्यावर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी राज्यसभा सदस्य म्हणून शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर लगेच त्यांची राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून निवड झाली. २०२१ मध्ये खडगे पहिल्यांदा राज्यसभेवर आले आणि गुलाम नबी आझाद यांच्या जागेवर त्यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड झाली. विशेष म्हणजे खडगे यांच्या शपथग्रहण समारंभाला सभागृहाचे नेते जे.पी. नड्डा, सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल, काँग्रेस सांसदीय पक्षाच्या अध्यक्ष श्रीमती सोनिया गांधी, काँग्रेस महासचिव प्रियांका वढेरा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राज्यसभेत निवडून आल्यावर खडगे विरोधी पक्षनेते झाले, त्याआधी लोकसभेत काँग्रेसचे गटनेते होते. शपथग्रहण समारंभानंतर अशाच अनौपचारिक गप्पा सुरु असतांना रिजिजू यांनी खडगे कधीपासून संसदेत आहे, असा प्रश्न विचारला. यावर खडगे यांचा संसदसदस्य म्हणून हा चौथा कार्यकाळ आहे, आधी दोनवेळा ते लोकसभेत होते, आता राज्यसभेतील हा त्यांचा दुसरा कार्यकाळ आहे, असे उत्तर मेघवाल यांनी दिले. यावर संसदेत येण्याच्या आधी खडगे ९ वेळा कर्नाटक विधानसभेचे सदस्य होते, याकडे सभागृहाचे नेते नड्डा यांनी लक्ष वेधले. यावर २००९ मध्ये काँग्रेसने माझा पराभव केला नसता तर लोकसभा सदस्य म्हणून यावेळचा माझा पाचवा कार्यकाळ असता, असे किरेन रिजिजू म्हणाले. २००९ मध्ये पश्चिम अरुणाचल लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचे तकाम संजोय यांनी फक्त १३१४ मतांनी रिजिजू यांचा पराभव केला होता. रिजिजू २००४ मध्ये पहिल्यांदा लोकसभेवर निवडून आले. २००९ मध्ये त्यांचा पराभव झाला, मात्र त्यानंतर २०१४, २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ते विजयी झाले. संसदसदस्य म्हणून खडगे आणि रिजिजू यांचा हा चौथा कार्यकाळ आहे.

••

### अबतक ५६ नाही अबतक ६०

**केंद्रीय वन** आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव मागील आठवड्यात अलवर येथे व्याघ्र संरक्षणासंदर्भातील एका परिसंवादात सहभागी झाले. रणथंबोरमधील प्रसिध्द वाघीण मछलीवर एक वृत्तपट बनवण्यात आला आहे. आता पुढील दोन वर्षात सारिस्का व्याघ्र अभयारण्यावर एक वृत्तपट बनवण्यात येणार असल्याची घोषणा यादव यांनी यावेळी केली. सारिस्का व्याघ्र अभयारण्यात आधी एकही वाघ नव्हता, गेल्या १८ वर्षात येथील वाघांची संख्या ‘अब तक ५६’ झाली असल्याचे यादव यांनी अभिमानाने सांगितले. ५६ या क्रमांकावर बऱ्याच लोकांचा आक्षेप असतो, असा टोला त्यांनी मारला. मुंबईतील गाजलेल्या अंडरवर्ल्डवरील ‘अब तक ५६’ हा रामगोपाल वर्माचा चित्रपट होता, नाना पाटेकर यांची यात प्रमुख भूमिका होती. मुंबई पोलिसमधील एन्काऊंटर स्पेशलिस्ट दया नायक यांच्यावर हा चित्रपट बेतला होता. या चित्रपटातील नाना पाटेकरांच्या तोंडी असलेला ‘अब तक ५६’ हा गाजलेला संवाद आहे. त्याचा वापर वाघांची वाढलेली संख्या सांगण्यासाठी भूपेंद्र यादव यांनी केला. मोदी यांचा उल्लेखही ५६ इंची छातीवाले म्हणून केला जातो, या पार्श्वभूमीवर यादव यांचा हा टोला होता. या वर्षाच्या अखेरीस या अभयारण्यातील वाघांची संख्या ६० वर जाईल आणि पुढील काही वर्षात ती शंभरावर पोहोचेल, याकडे यादव यांनी लक्ष वेधले. सारिस्का व्याघ्र अभयारण्यावर वृत्तपट बनवण्याची जबाबदारी केंद्रीय वन मंत्रालयाने ख्यातनाम सिनेमॅटोग्राफर आणि वृत्तपट निर्माते नल्लामुथू यांच्यावर सोपवली आहे. रणथंबोर व्याघ्र प्रकल्पातील मछली वाघावरील गाजलेला वृत्तपटही नल्लामुथू यांनीच बनवला होता.

••

### असाही होता एक जाहिरातदार

**ऑर्गनायझरला** ८० वर्ष पूर्ण झाली, यानिमित्त दिल्लीत एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. संघ प्रेरित विचारधारेची दैनिक आणि साप्ताहिकांना काही वर्षापूर्वी आर्थिक अडचणींचा सामना कसा करावा लागत होता, याचा उल्लेख राधाकृष्णन यांनी आपल्या भाषणात केला, काही वर्षापूर्वी या सगळ्या प्रकाशनात मंगलोर गणेश बीडीची एकच जाहिरात दिसत होती. सामान्यपणे कोणताही जाहिरातदार आपला व्यवसाय वाढावा, आपल्याला जास्तीत जास्त ग्राहक मिळावे म्हणून जाहिरात देत असतो. पण संघप्रेरित दैनिकात तसेच साप्ताहिकात दिलेल्या या जाहिरातीचा मंगलोर गणेश बीडीला कधी व्यावसायिक फायदा झाला असेल, असे मला वाटत नाही, कारण मी कधीच कुण्या स्वयंसेवकाला बीडी पितांना पाहिले नाही, असे राधाकृष्णन म्हणाले. तरी सुध्दा संघावर असलेल्या निष्ठेमुळे ही कंपनी आपल्या फायद्याचा विचार न करता जाहिरात देत राहिली. त्यामागे राष्ट्रवादी विचारांचा प्रचार आणि प्रसार व्हावा, अशीच त्या कंपनीची राष्ट्रहिताची भूमिका होती, याचा गौरवपूर्ण उल्लेख राधाकृष्णन यांनी केला. या कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे, भारत प्रकाशन मर्यादितचे प्रबंध संचालक अरुणकुमार गोयल, दिल्ली प्रांत संघचालक डॉ. अनिल अग्रवाल आणि ऑर्गनायझरचे संपादक प्रफुल्ल केतकर उपस्थित होते.

••

### के. सी. त्यागींकडे आली नवी जबाबदारी

सामान्यपणे पक्षाच्या सांसदीय मंडळाचा अध्यक्ष हा पक्षाचा अध्यक्षच असतो. मात्र राष्ट्रीय लोकदलाने पक्षाच्या सांसदीय मंडळाचे अध्यक्ष म्हणून तीन महिन्यांपूर्वीच जदयुतून आलेले ज्येष्ठ नेते के. सी. त्यागी यांची नियुक्ती केली. रालोदचे अध्यक्ष जयंत चौधरी यांनी उत्तरप्रदेश विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन ही निवड केल्याचे समजते. जयंत चौधरी यांना आपल्या पक्षाचा विस्तार राज्याबाहेर करायचा आहे. दिल्ली, हरयाणा, राजस्थानमध्ये आपल्या पक्षाचे काम वाढवायचे आहे, त्यामुळे या राज्यातील नेत्यांना चौधरी यांनी सांसदीय मंडळात स्थान दिले आहे. त्यागी अनेक वर्ष जदयुत होते, जदयुत मुख्य प्रवक्ता आणि मुख्य महासचिव म्हणून त्यांनी अनेक वर्ष जबाबदारी सांभाळली. जदयुतर्फे ते लोकसभा आणि राज्यसभेतही होते. त्यागी हे तसे मुळ उत्तरप्रदेशचे पण अनेक वर्ष ते बिहारच्या राजकारणात सक्रिय होते. जदयुच्या नेतृत्वाशी मतभेद झाल्यानंतर त्यागी यांनी रालोदमध्ये प्रवेश केला. विशेष म्हणजे नितीशकुमार यांना भारतरत्न देण्याची मागणी त्यागी यांनी पक्षातून राजीनामा देण्याच्या काही दिवस आधी केली होती. जनता दल आणि समाजवादी पक्षातही ते होते. त्यागी यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीचा प्रारंभ चौधरी चरणसिंह यांच्यासोबत केला होतो. त्यामुळे जयंत चौधरी यांनी त्यागी यांच्यावर विश्वास दाखवला, असे म्हणायला हरकत नाही.

**दिल्लीवाला**

# ‘लालपरी’च्या पंखांवर लाखो विद्यार्थ्यांची ज्ञानयात्रा

## सुरक्षिततेसह मोफत प्रवासाची हमी; ग्रामीण भागाचा आधार



**मुंबई, ५ जुलै**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) ओळख असलेली ‘लालपरी’ आता केवळ प्रवाशांची ने-आण करणारे वाहन राहिले नसून, ती राज्यातील लाखो शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, सुरक्षिततेची आणि उज्ज्वल भविष्याची विश्वासू जीवनवाहिनी बनली आहे. दुर्गम आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवण्याचे मोठे सामाजिक दायित्व एसटी महामंडळ अनेक दशकांपासून समर्थपणे पेलत असल्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला एसटी महामंडळाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. शालेय वेळेत विद्यार्थ्यांची गर्दी लक्षात घेता, बसस्थानकांवर विशेष पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे कर्मचारी विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बसमध्ये चढण्यास व उतरण्यास मदत करतात. याशिवाय, प्रवासात कोणतीही अडचण आल्यास तातडीने मदत मिळावी म्हणून एसटीने स्वतंत्र ‘टोल-फ्री’ मदत केंद्रही सुरू केले आहे. राज्यात दररोज सुमारे ३० हजार १७७ शालेय फेऱ्यांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि नियमित प्रवासाची सुविधा दिली जात असून, यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांचा एसटीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

**‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्ड देण्याची प्रक्रिया वेगात**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातच एसटीने २५.१३ लाख ‘अहिल्याबाई होळकर पास’ आणि २७.९८ लाख ‘विद्यार्थी मासिक पास’ वितरित केले आहेत. यासोबतच, विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुलभ, आधुनिक आणि पारदर्शक व्हावा यासाठी ‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्ड देण्याची प्रक्रियाही वेगाने सुरू आहे. शिक्षणातील समान संधीचे स्वप्न साकार करण्यासाठी ‘मानव विकास योजने’ अंतर्गत राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून, याअंतर्गत ९६६ बसेसद्वारे ७३ हजार ६२१ मुलींना मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

» विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडथळा येऊ नये, यासाठी एसटी महामंडळाकडून विविध प्रवासी सवलतींच्या योजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत. ‘अहिल्याबाई होळकर योजने’ अंतर्गत ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थिनींना १०० टक्के मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय, मासिक विद्यार्थी पासवर प्रवासभाड्यात ६६.६७ टक्के सवलत दिली जाते. तसेच शैक्षणिक सहली, उन्हाळी सुट्टी, परीक्षा, शैक्षणिक शिबिरे किंवा आजारी पालकांना भेटण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रवासासाठी ५० टक्के सवलत दिली जाते. कौशल्य सेतू अभियानांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही प्रवासभाड्यात ६६.६७ टक्के सवलत महामंडळाकडून देण्यात येत आहे. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# संरक्षण निर्यातीत चीनचा दबदबा

## | विविध देशांसोबत चार अब्ज डॉलर्सचे संरक्षण करार | पाकिस्तान, लिबिया सर्वांत मोठे खरेदीदार





चिनी लष्करी शस्त्रांचे प्रदर्शन

**वॉशिंग्टन, ५ जुलै**

पश्चिम आशिया आणि आफ्रिकन देशांना लष्करी शस्त्रास्त्रांचा पुरवठा करण्यात चीन आघाडीवर आहे. संरक्षण बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यासाठी चीन पाकिस्तानचा प्रवेशद्वार म्हणून वापर करत आहे. चीनने एका वर्षात विविध देशांसोबत चार अब्ज डॉलर्सचे संरक्षण करार केले असून, पाकिस्तान आणि लिबिया सर्वात मोठे भागीदार असल्याची माहिती एका अहवालातून समोर आली.

अमेरिकेतील 'मिडल ईस्ट फोरम' या थिंक टँकच्या एका अहवालानुसार, चीन आपले सामरिक हितसंबंध पुढे नेण्यासाठी पाकिस्तानचा एक माध्यम म्हणून वापर करत आहे. पाकिस्तान आणि लिबियन नॅशनल आर्मी यांच्यासोबत चीनने अलीकडेच संरक्षण उपकरणांच्या विक्रीसाठी करार केले. यात १६ जेएफ-१७ लढाऊ विमाने, प्रशिक्षण विमाने आणि इतर लष्करी उपकरणांचा समावेश आहे. याशिवाय आफ्रिकन देशांसोबत देखील करार करण्यात आले. एकूण कराराची किंमत चार अब्ज डॉलर्स आहे. अनेक देशांचे चीनसोबत झालेले संरक्षण करार संयुक्त राष्ट्रांच्या शस्त्रबंदी धोरणाला धोका पोहोचविणारे आहे. संपूर्ण प्रदेशात भूराजकीय तणाव वाढण्याची शक्यता अहवालातून व्यक्त करण्यात आली.

अहवालात म्हटले आहे की, अलिकडच्या काही महिन्यांत चीनने इराक, बांगलादेश, इंडोनेशिया, सौदी अरेबिया, लिबिया, मोरोक्को, नायजेरिया, सुदान आणि इथिओपिया यांसारख्या देशांसोबत संरक्षण संरक्षण करार वाढवले आहेत. चिनी शस्त्रास्त्रांची गुणवत्ता, अमेरिकन संरक्षण प्रणालींशी सुसंगतता आणि आर्थिक बाबींच्या आधारावर अनेक देशांनी चीनची लष्करी उपकरणे खरेदी करण्यात नकार दिला आहे. दरम्यान चीन पाकिस्तानच्या माध्यमातून पश्चिम आशियाई संरक्षण बाजारपेठेत आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानचे चीनवरील अवलंबित्व वाढले

थिंक टँकनुसार, अलिकडच्या वर्षांत पाकिस्तान आणि चीन यांच्यातील संरक्षण, सुरक्षा आणि गुप्तचर सहकार्यात लक्षणीय वाढ झाली आहे. स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या आकडेवारीचा हवाला देत, अहवालात म्हटले आहे की २०२१ ते २०२४ दरम्यान पाकिस्तानच्या एकूण शस्त्र आयातीपैकी ८० टक्क्यांहून अधिक वाटा चीनचा होता. हे पाकिस्तानचे वाढते अवलंबित्व आणि त्याच्या संरक्षण क्षेत्रात चीनचा वाढता प्रभाव दर्शवते.

### जागतिक स्तरावर शस्त्रांना प्रोत्साहन

अहवालानुसार, पाकिस्तान अजूनही अमेरिकन बनावटीची एफ-१६ फायटिंग फाल्कन लढाऊ विमाने वापरतो आणि अमेरिकेकडून अधूनमधून लष्करी मदत घेतो. असे असूनही, त्याच्या लष्करी क्षमतेचा मोठा भाग आता चिनी शस्त्रांवर आधारित आहे. पाकिस्तान आंतरराष्ट्रीय बाजारात चीनसोबत संयुक्तपणे विकसित केलेले जेएफ-१७ लढाऊ विमान, चिनी ड्रोन, एचक्यू-९ हवाई संरक्षण प्रणाली आणि इतर संरक्षण उपकरणांना सक्रियपणे प्रोत्साहन देत आहे.

# एका हल्ल्यात इराणचे अस्तित्व नष्ट करू शकतो

## खामेनेईंच्या अन्त्यविधीप्रसंगी ट्रम्प यांचा इशारा

**वॉशिंग्टन, ५ जुलै**

अमेरिकेने मनात आणले तर, एकाच हल्ल्यात इराणचा समूळ नाश होऊ शकतो. त्यांचे अस्तित्व जगात राहणार नाही. जगाचे नुकसान होऊन नये आणि मध्यपूर्वेत शांतता नांदावी यासाठी आम्ही कराराचा मार्ग निवडला, अशा शब्दांत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पुन्हा इशारा दिला आहे.

इराणमध्ये दिवंगत सर्वोच्च नेते अली अयातुल्ला खामेनेई यांच्या मृतदेहावर अन्त्यसंस्कार करण्याची तयारी सुरू असताना ट्रम्प यांनी इराणमध्ये एकत्र जमलेले कोट्यवधी नागरिक आणि सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करण्याचा इशारा दिला. अमेरिकेने मनात आणले तर एकाच हल्ल्यात इराणच्या उर्वरित नेतृत्वाला संपवू शकतो. मात्र तसे आम्ही करणार नाही, कारण मध्यपूर्वेत आम्हाला शांतता प्रस्थापित करायची आहे. त्यासाठी इराणसोबत चर्चा करण्याचा मार्ग निवडला. इराणने अमेरिकेला कमकुवत समजण्याची चूक करू नये. खामेनेईंच्या मृतदेहासमोर रडणाऱ्या लोकांची त्यांनी खिल्ली उडवली. अन्त्यलविधी सोहळ्यात इराणचे सत्ताधारी आणि नेतृत्व उपस्थित आहे. अशावेळी त्यांना संपवणे आमच्यासाठी कठीण नाही. एकाच हल्ल्यात त्यांना आम्ही संपवू शकतो, मात्र जागतिक शांततेचा विचार करून अमेरिकाच टोकाचे पाऊल उचलणार नाही. या सोहळ्याला लाखो लोक उपस्थित असून हल्ला झाल्यास मोठी जीवितहानी होऊ शकते असेही त्यांनी नमूद केले.

तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीनंतरही इराण शरण आल्याने अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर आता टीका होऊ लागली आहे. इराणने आपल्या अटींवर युद्धबंदी केली असून यामध्ये अमेरिकेला नुकसान तर सहन करावेच लागले पण जगात नामुष्कीलाही सामोरे जावे लागले. मध्यपूर्वेतील नाश आणि संहार टाळण्यासाठी शांततेचे धोरण स्वीकारले असल्याचे ट्रम्प म्हणत असले तरी इराणच्या प्रतिकारामुळे अमेरिकेला माघार घ्यावी लागली, अशी टीका रिपब्लिकन पक्षाचे खासदार करू लागले आहे. ट्रम्प यांचे मध्यपूर्वेतील धोरण पूर्णपणे फसल्याचे द्योतक म्हणजे अमेरिका-इराण शांतता करार असल्याचे बोलले जात आहे. असे असले तरी ट्रम्प अद्याप माघार घ्यायला तयार नसून आम्हीच युद्ध जिंकल्याचे जगाला सांगत आहेत. (वृत्तसंस्था)

### युरोपच्या स्थलांतर धोरणांवर टीका



युरोपच्या स्थलांतर धोरणावर टीका करताना ट्रम्प म्हणाले, युरोपियन देश सध्या तिसऱ्या जगाचे प्रतिनिधित्व करत आहे. विकसनशील देशांतील गुन्हेगारांना आश्रय दिल्याचे परिणाम संपूर्ण युरोप भोगत आहे. याची जाणीव होईल तेव्हा वेळ निघून गेलेली असेल. तिसऱ्या जगातील देशांमधून होणारे मोठ्या प्रमाणावरील स्थलांतर अमेरिकेचे भविष्य पूर्णपणे उद्ध्वस्त करू शकते. जर तुम्ही परदेशातून लोकांना आणले, तर लवकरच तुम्ही स्वतःही एक देश बनाल आणि मग तुम्ही काहीही करू शकणार नाही.

# ११ वर्षांच्या मुलावरही खटला

**कराची, ५ जुलै**

शहरात यावर्षीच्या जानेवारी महिन्यात भीषण आग लागून झालेल्या दुर्घटनेत ७२ नागरिकांचा मृत्यू झाला होता. आरोपपत्रात ११ वर्षीय मुलाचे नाव टाकण्यात आले. १७ जानेवारी २०२६ रोजी गुल प्लाझा या शॉपिंग मॉलमध्ये आग लागली होती. घटनेनंतर या मुलाचे वडील आणि अन्य चार जण फरार आहेत. मुलासह चौघाही जणांविरोधात गुन्हे दाखल करून त्यांच्यावर आरोप निश्चित करण्यात आले आहेत. या मॉलमध्ये अकरा वर्षीय मुलाच्या वडीलाचे फुलाचे दुकान होते. आगपेटीतील काड्यांचा खेळ खेळत असताना आग लागल्याचे एका प्रत्यक्षदर्शीने सांगितल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# होर्मुझमध्ये प्रवेशासाठी आकारणार शुल्क

## चीनमधील इराणच्या राजदूताची माहिती, मित्रदेशांना मिळणार सवलत



**बीजिंग, ५ जुलै**

ओमानच्या सहकार्याने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर सेवा शुल्क आकारण्याची चीनची योजना आहे. शुल्क दिल्याशिवाय जहाजांना हा जलमार्ग पार करता येणार नाही. सुरक्षा हवी असल्यास शुल्क द्यावेच लागेल, मित्र देशांना शुल्कातून वगळण्यात येणार असल्याची माहिती चीनमधील इराणच्या राजदूत अब्दोलरेझा रहमानी फझली यांनी दिली.

होर्मुझच्या सामुद्रधुनीत सेवा कर आकारण्याची इराणची योजन आहे आणि जहाजांवर लवकरच शुल्क आकारणे सुरू केले जाईल. अमेरिकेविरुद्धच्या युद्धात इराणला पाठिंबा देणाऱ्या देशांच्या जहाजांवर शुल्कातून सवलत दिली जाईल, असे फझली यांनी बीजिंगमधील जागतिक शांतता मंचावरून बोलताना सांगितले. ते म्हणाले, होर्मुझ यापुढे मुक्त राहणार नाही. इराण आता ओमानच्या सहकार्याने या जलमार्गावरील वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याची योजना आखत आहे. होर्मुझची सामुद्रधुनी इराणच्या प्रादेशिक सागरी हद्दीत येते. त्यामुळे, अर्थातच, आम्ही सेवा शुल्क आकारू. या सेवा कराचा उपयोग जहाजांवर देखरेख ठेवण्यासाठी आणि सागरी वाहतुकीच्या पर्यावरणीय परिणामांना सामोरे जाण्यासाठी केला जाईल. युद्धादरम्यान इराणला पाठिंबा देणाऱ्या देशांना यातून सवलत मिळेल. (वृत्तसंस्था)



अब्दोलरेझा रहमानी फझली

### अमेरिकेला आव्हान देण्याची तयारी

२८ फेब्रुवारी रोजी युद्ध सुरू होण्यापूर्वी, होर्मुझ सामुद्रधुनी पूर्णपणे खुली होती. इराणने त्यावर कोणताही कर लादण्याबद्दल चर्चाही केली नव्हती. तथापि, अमेरिकेच्या हल्ल्यानंतर, इराणने सामुद्रधुनी बंद केली आणि जगात इंधन टंचाई निर्माण झाली. यानंतर इराणमध्ये कर लादण्याबद्दलची चर्चा तीव्र झाली. युद्धादरम्यान इराणला होर्मुझचे महत्त्व कळले. स्वतःचे संरक्षण करण्यासाठी इराणने होर्मुझचा ढालीसारखा वापर करण्यास सुरुवात केली. इराणने शुल्क आकारणे सुरू केल्यास हा अमेरिकेसाठी मोठे आव्हान असेल.

# मृत्यूनंतर शिक्षकाला परत मिळाली नोकरी

## गुजरात हायकोर्टाने रद्द केला सरकारचा आदेश

**गांधीनगर, ५ जुलै**

एका शिक्षकाची नोकरी त्याच्या मृत्यूनंतर १७ वर्षांनी आणि सेवेत दाखल झाल्यापासून ३३ वर्षांनंतर बहाल करण्याचे आदेश गुजरात उच्च न्यायालयाने दिले. निर्णय देताना प्रशासनाने शिक्षकाला निलंबित केल्याचा प्रशासनाचा आदेश न्यायालयाने रद्द केला.

गुजरात सरकारने हर्षद भावसागर या मृत शिक्षकाची नियुक्ती रद्द केली होती. त्यामुळे भावसार यांच्या विधवा पत्नीला मिळणारी पेन्शन बंद झाली होती. प्रशासनाच्या निर्णयाला मृत शिक्षकाच्या पत्नीने उच्च न्यायालयात आव्हान दिले. एवढ्या दीर्घ काळ नोकरी केल्यानंतर कुणाची नियुक्ती रद्द करता येत नाही, असे स्पष्ट करत प्रशासनाचा आदेश रद्द करत नोकरी बहाल करण्याचा निर्णय दिला.

हर्षद भावसार आणि इतर पाच जणांना सुज्ञान एज्युकेशन ट्रस्टकडून चालविण्यात येणाऱ्या एका शाळेत १९८८ मध्ये शिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले होते. पदासाठी आवश्यक निकष पूर्ण केल्यानंतर १९८९ मध्ये त्यांची नियुक्ती नियमित करण्यात आली होती. दरम्यान, २००४ मध्ये हर्षद भावसार यांचा मृत्यू झाला. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'खाशाबा' वादाच्या भोवऱ्यात

**मुंबई :** दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या बहुप्रतक्षित 'खाशाबा' या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित होताच तो वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.



या टीझरमधील पाच दृश्ये लेखक संजय दुधाणे यांच्या पुस्तकातील असल्याचा दावा करण्यात आला असून या प्रकरणाने आता न्यायालयीन वळण घेतले आहे. पुणे दिवाणी न्यायालयाने या कॉपीराइट वादाची सुनावणी १० जुलैपर्यंत पुढे ढकलली आहे. लेखक संजय दुधाणे यांनी आरोप केला आहे की त्यांच्या 'ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव' या पुस्तकावर चित्रपटातील काही दृश्ये आधारित आहेत आणि त्यासाठी त्यांची कोणतीही परवानगी घेतली नाही. त्यांनी १० ऑक्टोबर २०२४ रोजी दिग्दर्शक नागराज मंजुळे, निर्मात्या ज्योती देशपांडे, जिओ स्टुडिओ आणि आटपाट प्रॉडक्शन्स यांच्याविरोधात कॉपीराइटचा दावा दाखल केला होता.

### 'इठा'च्या शीर्षकावरून वाद आणि समाधानही

**मुंबई :** प्रदर्शित होण्यापूर्वीच 'ईठा' हा सिनेमा वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. हा वाद सिनेमातील मजकूर, गाणी किंवा कोणत्याही प्रसंगामुळे नसून, थेट त्याच्या शीर्षकावरून निर्माण झाला आहे. या चित्रपटाला 'ईठा' हे नाव देऊन तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांचा अपमान करण्यात आल्याचा आरोप काही आक्षेपकर्त्यांनी केला असून, चित्रपटाचे नाव बदलण्याची जोरदार मागणीही करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत अनिश्चितताा निर्माण झाल्याची चर्चा सुरू असतानाच विठाबाई नारायणगावकर यांचे नातू मोहित विठाबाई नारायणगावकर यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. शीर्षकाबाबत सुरुवातीला कुटुंबातही काही चिंता असल्याचे त्यांनी मान्य केले. तथापि, निर्मात्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणानंतर त्या शंका दूर झाल्या असल्याचे मोहित यांनी सांगितले.



### सुमोना चक्रवर्ती दमदार 'एंट्री'साठी सज्ज

**मुंबई :** प्रसिद्ध अभिनेत्री सुमोना चक्रवर्ती गेल्या काही महिन्यांपासून प्रसिद्धी झोतातून दूर होती. सोशल मीडिया तसेच सार्वजनिक कार्यक्रमांमध्येही ती दिसली नव्हती. आता त्यांनी इंस्टाग्रामवर एक सविस्तर पोस्ट शेअर करत या दूर राहण्यामागचे कारण स्पष्ट केले आहे. या पोस्टमधून सुमोनाने आपला दीर्घकाळ सुरू असलेला आरोग्य संघर्ष, मानसिक स्थिती आणि जीवनाकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन याबाबत मनमोकळेपणाने भाष्य केले आहे. सुमोनाने २०२१ मध्ये प्रथमच आपल्याला 'एंडोमेट्रियोसिस' असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर अनेक वर्षे ती या आजाराशी झुंज देत होत्या. यासाठी त्यांना शस्त्रक्रियाही करून घ्यावी लागली. आता पूर्णपणे ठीक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



# रेल्वेचे तीन लाचखोर अधिकारी अटकेत

## सीबीआयची कारवाई

**नवी दिल्ली, ५ जुलै**

केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (सीबीआय) एका कथित लाचखोरी प्रकरणात उत्तर रेल्वेचे मुख्य सामग्री व्यवस्थापक (सीएमएम), वरिष्ठ लिपिकासह तीन अधिकाऱ्यांना अटक केली. लाचखोरीच्या आरोपाखाली एफआयआर दाखल केल्यानंतर सीबीआयने राजधानी दिल्लीतील बडोदा हाऊस येथील उत्तर रेल्वेच्या मुख्यालयावर छापा टाकला. याप्रकरणी नरेंद्र सिंग आणि लेनिन शर्मा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

उत्तर रेल्वे मुख्यालयातील अधिकारी एका खासगी कंपनीच्या प्रतिनिधींसोबत संगनमत करून भ्रष्टाचारात सहभागी होते. लाचेच्या बदल्यात रेल्वेची कंत्राटे मिळवण्यासाठी खासगी कंपनीला अवाजवी लाभ दिल्याचा आरोप त्यांच्यावर असल्याची माहिती सीबीआयने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. लाच मिळाल्यानंतर रेल्वे अधिकाऱ्यांनी खरेदीशी संबंधित विहित नियम आणि कार्यपद्धतींचे उल्लंघन करून एका खासगी कंपनीला कंत्राट दिल्याची माहिती समोर आली. (वृत्तसंस्था)



भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन सध्या उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. रविवारी उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांच्या लखनौतील निवासस्थानी झालेल्या बैठकीला उपस्थित मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य

# कुसंस्कारांच्या जाहिरातींवर बंदी घाला : मुनगंटीवार

**मुंबई, ५ जुलै**

महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणार्या जाहिराती, डिजिटल फलक, समाज माध्यमे आणि संकेतस्थळांवर अशा प्रकारच्या अश्लील साहित्याला प्रसिद्ध करण्यास पूर्णपणे प्रतिबंध घालणारे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत मांडले. हे विधेयक सभागृहाच्या विचारात घेतले जावे, असा प्रस्ताव मांडताना त्यांनी बदलती कुटुंब व्यवस्था, सोशल मीडियाचे दुष्परिणाम आणि कायद्यातील पळवाटांवर अभ्यासपूर्ण व भावुक भाष्य केले. पूर्वी आजी, आई आणि काकू या कौटुंबिक व्यवस्था बालमनावर कुसंस्कार होऊ नये म्हणून काम करायच्या. (वृत्तसंस्था)

# भारतीय नौदलाने दाखवले अमेरिकेत सामर्थ्य

## आयएनएस सुदर्शनीने हडसन नदीवर फडकवला तिरंगा

**न्यू यॉर्क, ५ जुलै**

भारतीय नौदलाच्या आयएनएस सुदर्शनीने, अमेरिकेच्या २५० व्या स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्याचा भाग म्हणून न्यू यॉर्कमध्ये आयोजित भव्य 'परेड ऑफ सेल' मध्ये सहभाग घेतला. 'लोकायन २०२६' मोहिमेचा भाग म्हणून १३,००० सागरी मैलांचा प्रवास करून अमेरिकेत पोहोचलेल्या भारताच्या स्वदेशी युद्धनौकेने हडसन नदीवर तिरंगा फडकवून भारताचे सागरी सामर्थ्य आणि मुत्सद्देगिरीचे प्रदर्शन केले.

अमेरिका आपला २५० वा स्वातंत्र्य दिन साजरा करत आहे. या निमित्ताने न्यू यॉर्कमध्ये 'युनायटेड स्टेट्स इंटरनॅशनल नेव्हल रिव्ह्यू २५०' आणि 'सेल २५०' आयोजित करण्यात आले. या सोहळ्यात भारतीय नौदलाने सहभाग घेतला. हडसन नदीवर आयोजित भव्य 'परेड ऑफ सेल' सहभागी झालेल्या स्वदेशी आयएनएस सुदर्शनीने तिरंगा फडकवत भारताच्या सामर्थ्याचे प्रदर्शन केले. अमेरिकेतील भारतीय दूतावासाने हा अभिमानाचा क्षण समाज माध्यमावर शेअर केला. दूतावासाने सांगितले की, आयएनएस सुदर्शनी ४ जुलै रोजी न्यू यॉर्क आणि न्यू जर्सीच्या बंदरात दाखल झाली. या युद्धनौकेने 'परेड ऑफ सेल' दरम्यान विशेष लक्ष वेधून घेतले. जगभरातील नौदल जहाजांमध्ये भारतीय जहाज उठून दिसत होते. हा सहभाग भारत आणि अमेरिका यांच्यातील मजबूत होत असलेल्या नौदल संबंधांचे प्रतीक आहे. ही युद्धनौका आंतरराष्ट्रीय स्तरावर परस्पर सहकार्य आणि मैत्रीचा संदेश देत आहे. (वृत्तसंस्था)



अमेरिकेच्या २५० व्या स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्यात सहभागी झालेली भारतीय नौदलाची आयएनएस सुदर्शनी

### लोकायन मोहिमेची वैशिष्ट्ये

- आयएनएस सुदर्शनी सध्या 'लोकायन २०२६' या मोहिमेवर आहे, जी महासागरांना व्यापणारी एक लांब आंतर महासागरीय मोहीमेचा भाग आहे
- मोहिमेची सुरुवात कोची येथून झाली. गेल्या पाच महिन्यांत, जहाजाने १३,००० सागरी मैलांपेक्षा जास्त अंतर कापले आहे.
- मोहिमेचा उद्देश जगभरातील नौदलांमध्ये परस्पर विश्वास वाढवणे हा आहे, मध्य अटलांटिकमधून ती अमेरिकेत पोहोचली.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# विद्या 'विनयेन' शोभते...

देश-विदेशातील समृद्धतेने नटलेल्या ज्ञानपरंपरेचा प्रामाणिक प्रसार व्हावा, सांस्कृतिक ठेवा म्हणून ज्यांची ओळख असते, त्या अमूल्य ग्रंथसंपदेचे जतन, संवर्धन व्हावे आणि 'सकल जनांसि' शहाणे करून सोडणाऱ्या वाचनसंस्कृतीचा वसा जपण्याच्या परंपरेच्या वारीमध्ये अधिकाधिक लोकांस सहभागी करून घ्यावे, या व्रतापासून काहीसे भरकटल्याची गेल्या काही वर्षांपासून मुंबईतील 'एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई' या नामांकित संस्थेच्या कारभाराबाबत व्यक्त होणारी खंत आता दूर झाली आहे. ज्ञानप्रसार, ज्ञानसंवर्धन, संपूर्ण समाजाचे सांस्कृतिक नेतृत्व, संशोधनातील उत्कृष्टता आणि सार्वजनिक बौद्धिक जीवनाच्या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याच्या ध्यासाचे नवे पर्व या संस्थेत सुरू होऊ घातले आहे. तब्बल सुमारे सव्वादोनशे वर्षांपूर्वी, एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी स्थापन झालेल्या, मुंबईचा मानबिंदू मानल्या जाणाऱ्या या संस्थेने ज्ञानप्रसाराची पालखी खांद्यावर वाहिली, पण पुढच्या वैचारिक वाटचालीत काळाच्या प्रत्येक पावलासोबत त्या पालखीतील नामवंतांच्या पाऊलखुणा मात्र काळवंडत गेल्या. 'एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई' या ऐतिहासिक संस्थेच्या कारभारावर चढलेली एकांगीपणाची, आर्थिक बेशिस्तीची पुटे आणि समाजापासून स्वतःस दूर राखून आपले वैचारिक वेगळेपण जपण्याच्या मूठभरांच्या मानसिकतेची जळमटे आता दूर होणार आहेत. गेल्या काही महिन्यांपासून वेगवेगळ्या माध्यमांचा आधार घेत आणि प्रसंगी न्यायालयाचे उंबरठे झिजवत संस्थेवरील मक्तेदारी शाबूत ठेवण्याचे हरतऱ्हेचे प्रयत्न करणाऱ्या काही ठरावीकांच्या कंपूने, ज्ञान ही एका विशिष्ट विचारसरणीची मक्तेदारी असल्याच्या आविर्भावात अन्य विचारसरणींच्या प्रवेशबंदीसाठी केलेल्या मोर्चेबांधणीचे कुंपण तोडून ही संस्था आता विचारस्वातंत्र्याच्या मुक्त पुरस्कारासाठी सिद्ध झाली आहे. 'एशियाटिक सोसायटी वाचवा' असा टाहो फोडत, आपली संस्थेवरील पकड टिकविण्याचे जिवापाड प्रयत्न करताना अन्य विचारसरणींना अक्षरशः अस्पृश्य ठरविणाऱ्या तथाकथित पुरोगामित्वाचा बुरखादेखील आता टराटरा फाटला आहे आणि येथील ज्ञानभांडार आता सहजपणे सर्वसामान्यांसाठी खुले होणार या जाणिवेने या समृद्ध संस्थेमधील ग्रंथसंपदा सुखावली आहे. संस्थेच्या कारभारावरील पकड सुटण्याच्या भीतीने वैचारिक अस्पृश्यतेचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पुरस्कार करणाऱ्या आणि संस्था उजव्या विचारसरणीच्या ताब्यात जाण्याची अनाकलनीय भीती समाजात रुजविण्याकरिता उपलब्ध सर्व प्रसारस्रोतांचा आधार घेणाऱ्या कथित पुरोगामी कंपूने संस्थेचे राजकीयीकरण होत असल्याचा कांगावा करीत संस्थेला वाचविण्याचा घेतलेला पवित्रा किती बेगडी होता, हे निवडणुकांच्या काळातील न्यायालयीन लढ्यात वेळोवेळी उघड होत गेले होते. आपले वैचारिक वर्चस्व टिकविण्यासाठी आणि एकाच विचाराची पालखी मिरविण्याच्या अट्टहासापोटी गेल्या काही महिन्यांत एशियाटिक सोसायटीच्या निवडणुकीच्या निमित्ताने जे काही घडले, त्यामुळे मुंबईचेच नव्हे, तर महाराष्ट्राचे बौद्धिक वातावरण पुरते गढुळले होते.

वाचनसंस्कृतीचा प्रामाणिक प्रसार करावयाचा असेल, समृद्ध ज्ञानपरंपरेचा वारसा प्रत्येक पिढीपर्यंत पोहोचवायचा असेल, तर या व्रतापासून वंचित राहिल्यामुळे दूर असलेल्या अनेकांस सोबत घ्यावे लागते. एशियाटिक सोसायटी नावाच्या या संस्थेस मात्र, हा समृद्ध वारसा लोकांपर्यंत पोहोचूच नये अशा अलिप्त मानसिकतेचा विळखा वर्षानुवर्षे पडून राहिल्याने, असंख्य ज्ञानपिपासूंना संस्थेचा उंबरठादेखील ओलांडताच येत नव्हता, असा आरोप केला जातो. कदाचित त्यामुळेच, संस्थेच्या सदस्यांची संख्या एका गोतावळ्यापलीकडे पोहोचणारच नाही याची खबरदारी घेण्याची प्रथा रुजली आणि कालपरवापर्यंत या प्रथेचे पालन करणाऱ्या पाईकांनी संस्थेच्या कारभारात अनेक बेकायदा कृत्यांचा आधार घेतल्याचेही अनेकदा उघडकीस आले. 'एशियाटिक बचाव' हा या निवडणुकीच्या निमित्ताने दिला गेलेला अशा काही पाईकांचा नारा होता, पण प्रत्यक्षात मात्र, एशियाटिकमधील अस्तित्व वाचविण्याची ती धडपड होती, असेही वेगवेगळ्या वेळी उघड होत गेले. अखेर या एकांगी मक्तेदारीच्या हट्टापायीच एशियाटिक सोसायटी नावाच्या या संस्थेला आपल्या उद्याच्या मुक्त अस्तित्वभयाची जाणीव झाली असावी. त्यामुळेच, कालपरवापर्यंतची 'कब्जा राखण्याची' धडपड आता इतिहासजमा झाली असून 'एशियाटिक टुमॉरो' नावाच्या गटाच्या झेंड्याखाली एकत्र आलेल्या तळमळीच्या कार्यकर्त्यांनी या संस्थेची मुक्तता केली आहे. कोणत्याही समाजाचे बौद्धिक सामर्थ्य मोजायचे असेल, तर त्या समाजातील ग्रंथालये, ग्रंथसंग्रह आणि वाचनसंस्कृती याकडे पाहावे लागते. ग्रंथालय म्हणजे केवळ इमारत नसून समाजाच्या सभ्यतेचे चिन्ह असते. म्हणूनच ग्रंथांचे जतन ही केवळ सांस्कृतिक जबाबदारी नाही, तर भावी पिढ्यांना वैचारिकदृष्ट्या सुसंस्कृत व समृद्ध करण्याकरिता असलेली ऐतिहासिक आणि नैतिक बांधिलकी असते. केवळ नवीन पुस्तके प्रकाशित करून ही बांधिलकी पूर्ण होत नाही, तर दुर्मिळ ग्रंथांचे वैज्ञानिक संवर्धन, हस्तलिखितांचे डिजिटायझेशन, सार्वजनिक ग्रंथालयांचे आधुनिकीकरण ही आजच्या काळाची मुख्य गरज आहे. कारण ग्रंथालये ही केवळ पुस्तकांची गोदामे नाहीत. ती समाजाच्या बौद्धिक आरोग्याची केंद्रे आहेत. म्हणूनच, एशियाटिक सोसायटीला पुन्हा एकदा समाजाभिमुख करण्याची आणि सांस्कृतिक संपन्नतेचे चिन्ह असलेल्या या संस्थेच्या समृद्धीच्या सहवासाकरिता आतुरलेल्या सर्वांकरिता या संस्थेचे दरवाजे मुक्तपणे खुले करण्याची गरज होती. 'एशियाटिक टुमॉरो' नावाच्या गटातील कार्यकर्त्यांनी ही गरज नेमकी ओळखली आणि त्यासाठी जिवापाड मेहनत घेतली. संस्थेच्या भविष्याचा एका सुनियोजित आराखडा तयार केला, मतदारांसमोर प्रामाणिकपणे मांडला आणि संस्थेच्या सावलीत फोफावलेल्या वैचारिक अस्पृश्यतेला तिलांजली देण्याची ग्वाही देत हे कार्यकर्ते सज्ज झाले. विद्या आणि ज्ञान हे आढ्यताखोरांच्या अंमलाखाली राहिले, तर समाजापासून फटकून राहते, असे म्हणतात. पण ते समाजाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले, तर त्याची शोभा अधिक वाढते ही संस्कृतीची शिकवण आहे. म्हणूनच, 'विद्या विनयेन शोभते' असा सुंदर सुविचार संस्कृतात रूढ आहे. 'एशियाटिक'मधील परिवर्तनाची प्रक्रिया सुरू असताना याचा प्रत्यय ज्यांना आला, त्या मतदारांनी परिवर्तनाच्या बाजूने कौल दिला आहे, असा एशियाटिक सोसायटीच्या भविष्याच्या वाटचालीचा अर्थ आहे.

आज आपण आर्थिक विकास, तांत्रिक प्रगती आणि जागतिक स्पर्धेबद्दल बोलतो; पण या सर्वांचा पाया ज्ञान आहे. ज्ञानाचा पाया वाचन आहे आणि वाचनाचा पाया ग्रंथ आहेत. त्यामुळे ग्रंथांचे संरक्षण, ग्रंथालयांचे संवर्धन आणि वाचनसंस्कृतीचा प्रसार हे कोणत्याही राष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणाचे केंद्रबिंदू असले पाहिजेत. राजकीय पक्षांच्या प्रभावापासून अलिप्त राहून संस्थेच्या सर्वांगीण परिवर्तनाची ग्वाही देत संस्थेचा कार्यभार नव्याने हाती घेणाऱ्या या कार्यकर्त्यांसमोर हे एक आव्हान आहे. कारण त्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती आणि अंमलबजावणीसाठी शक्य ते सारे पणाला लावण्याची तयारी गरजेची आहे. संस्थेची सुंदर इमारत आणि त्या इमारतीच्या दरवाजापर्यंत घेऊन जाणारी प्रत्येक पायरी म्हणजे केवळ सेल्फी पॉइंट किंवा चित्रपट-मालिकांमधील प्रेमप्रसंगांच्या पृष्ठभूमीचा देखावा नव्हेत, तर ज्ञानप्राप्तीच्या प्रकाशवाटा आहेत. त्या अधिक उजळाव्यात आणि संस्थेचे पावित्र्य अधिक तेजस्वीपणे समाजाला दिशा देत रहावे, याकरिता कार्यबद्ध राहण्यासाठी नव्या चमूस शुभेच्छा! ■

## प्रासंगिक

**नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

# भारताची एकता आणि प्रगतीसाठी समर्पित जीवन



आज सहा जुलै, राष्ट्रवाद आणि निःस्वार्थ सेवेचा आदर्श मानणाऱ्या, त्यांची जपणूक करणाऱ्या सर्व लोकांसाठी आजचा दिवस विशेष आहे. आज डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची १२५ वी जयंती आहे. भारत मातेच्या सेवेप्रति कटिबद्धता आणि धैर्य यांचे ते कालातीत मूर्तिमंत उदाहरण आहेत. आधुनिक भारताच्या इतिहासात, असे अगदी कमी लोक आहेत, ज्यांच्यात बुद्धिमत्ता, सार्वजनिक सेवाभाव आणि नैतिक दृढनिश्चय यांचा संगम आढळतो, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी त्यांच्यापैकीच एक आहेत.

श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा जन्म अशा परिस्थितीत झाला होता, जिथे, त्यांना सहज एक आरामदायी आणि सुरक्षित आयुष्य मिळू शकले असते. त्यांचे पिता, सर आशुतोष मुखर्जी, त्या काळातील एक आघाडीचे शिक्षणतज्ज्ञ आणि प्रखर बुद्धिवादी होते. नियतीने त्यांना, एक अत्यंत उच्चभ्रू, सुखासीन आयुष्य दिले असले, तरी त्यांच्यातील विवेकाने, त्यांना देशसेवा आणि त्यागाचा मार्ग दाखवला. त्या काळातील अत्यंत अस्थिर परिस्थितीत आपण केवळ बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही, असा कौल त्यांच्या मनाने त्यांना दिला. मग ती वसाहतवादी शक्तींशी लढाई असो, जातिवाद, धर्मभेद किंवा मग मानवतेसमोरची आव्हाने असोत, अथवा इतर काही. त्यांच्या या प्रवासात त्यांना वैयक्तिक आयुष्यात अनेक संकटे, दुःखाचा सामना करावा लागला, यात अगदी त्यांचं बाळ आणि नंतर त्यांच्या पत्नीचे झालेले देहावसान, अशा अपार दुःखाच्या प्रसंगांचा त्यांना सामना करावा लागला. मात्र अशा सगळ्या दुःखांनी, त्यांचा दृढनिश्चय अधिक वाढवला आणि देशाची सेवा करण्याची कटिबद्धता अधिक दृढ केली.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या सार्वजनिक जीवनातील एक आदर्श, जो या सगळ्या गुणांच्या वर होता, असे सांगायचे झाले, तर तो आदर्श गुण ठरेल, अखंड भारताप्रति त्यांची निष्ठा! फाळणीच्या गदारोळात, हिंसाचारातही, पश्चिम बंगाल हा भारताचा अविभाज्य घटक राहील, यासाठी ते पाय घट्ट रोवून उभे राहिले. काही वर्षांनी, त्यांच्या याच अखंडतेच्या ध्यासाने, ते जम्मू आणि काश्मीरला गेले. तिथे झालेला तुरुंगवासही त्यांना त्यांच्या ध्येयापासून परावृत्त करू शकला नाही. मात्र, याच तुरुंगवासात त्यांचा अकाली मृत्यू झाला. तुरुंगावासात, अशा ठिकाणी... एकटेपणात... ज्या लाखो लोकांचं आयुष्य त्यांनी स्वतःचे आयुष्य बनवले होते, अशा सगळ्या मोलाच्या माणसांपसून दूर. इतिहासात असे काही क्षण येतात, जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या सर्वोच्च बलिदानामुळे ती व्यक्ती राजकारणाच्या पलीकडे जाते आणि त्यांचे कर्तव्य, एका राष्ट्रीय स्मृती ठरतात. आचार्य विनोबा भावे एकदा असे म्हणाले होते की, ज्या तत्त्वावर श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा दृढविश्वास होता, त्यासाठी त्यांनी आपल्या स्वतःचे बलिदान दिले. या घटनेनंतर अनेक वर्षांनी, कलम ३७० आणि अनुच्छेद ३५ (अ) हटवणे (२०१९ चा कायदा), ही त्यांच्या बलिदानाला दिलेली सर्वोच्च मानवंदना होती.

डॉ. मुखर्जी यांनी, कायमच भारताला आणि भारतीय मूल्यांना अग्रस्थानी ठेवले. त्यासाठी त्यांनी त्या काळातील प्रचलित विचारसरणींना छेद देणाऱ्या संस्था उभारून आणि सक्षम व्यवस्था घडवून हे सिद्ध केले. ते कलकत्ता विद्यापीठाचे सर्वांत तरुण कुलगुरू बनले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैलीद्वारे त्यांनी देशभक्तीची प्रेरणा देणारे आणि भविष्याची दृष्टी असलेले सकारात्मक बदल घडवून आणले. शिक्षणतज्ज्ञांच्या एका परिषदेला संबोधित करताना डॉ. मुखर्जी यांनी अतिशय समर्पक शब्दांत म्हटले होते की, शैक्षणिक संस्थांकडे संभाव्य कारकून आणि अल्प वेतनावर काम करणारे कर्मचारी तयार करणारे कारखाने म्हणून पाहणे चुकीचे आहे. नगरपालिका, प्रांतीय आणि केंद्रीय विधिमंडळे यांसारख्या आपल्या स्वशासित संस्थांना नेतृत्व देण्यास सक्षम असलेले, तसेच वित्तीय, व्यापारी आणि औद्योगिक अशा जीवनाच्या विविध क्षेत्रांतील कामकाजाचे संचालन करू शकणारे विद्यार्थी घडविणे आवश्यक आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली कलकत्ता विद्यापीठाने ग्रंथालयाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, विज्ञान विषयातील संशोधनाला चालना देणे, पुरावस्तूंच्या अध्ययनाला प्रोत्साहन देणे तसेच कृषी विषयातील अभ्यासक्रम सुरू करणे, अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी केली. त्यांनी क्रीडा, शिक्षक प्रशिक्षण आणि विद्यार्थी कल्याण यांसारख्या क्षेत्रांकडेही विशेष लक्ष वेधले. विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठाबद्दल अभिमानाची भावना निर्माण व्हावी, यासाठी त्यांनी २४ जानेवारी हा दिवस विद्यापीठाचा स्थापना दिन म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू केली. विद्यापीठासाठी गीत रचण्याची विनंती त्यांनी थेट गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनाच केली होती.

त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी भारतीय जनसंघाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला, त्यातूनही हीच भावना दिसून येते. त्या काळात काँग्रेस पक्षाचे सगळीकडे वर्चस्व असताना, भारताच्या प्रगतीसाठी आपल्या सांस्कृतिक मुळांशी जोडलेले राहून पर्यायी आवाज उभा राहणे अधिक आवश्यक असल्याचे त्यांना वाटत होते. कदाचित म्हणूनच त्या पक्षाचे निवडणूक चिन्ह मातीचा दिवा होते. एक दिवा दिसायला साधा वाटू शकतो; मात्र स्वतःच्या मर्यादेपेक्षा कितीतरी अधिक अंधार दूर करण्याची क्षमता त्याच्यामध्ये असते. जनसंघाने आपल्या कार्यरत असलेल्या काळात आणि त्यानंतरही नेमके हेच कार्य केले.

भारताचे पहिले उद्योग आणि पुरवठा मंत्री म्हणून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा कार्यकाळ हा विकासाविषयी अत्यंत व्यापक आणि मानवतावादी दृष्टिकोन असलेल्या एका नेत्याचे दर्शन घडवतो. नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्राचा सन्मान, संधी आणि आत्मविश्वास पुनर्स्थापित करण्याचे साधन म्हणून त्यांनी उद्योगांकडे पाहिले. संपत्तीची निर्मिती आणि मूल्यवर्धन यांचा त्यांनी आदर केला. दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन, सिंद्री खत प्रकल्प आणि भक्कम औद्योगिक धोरण यासारख्या अग्रणी उपक्रमांद्वारे आधुनिक औद्योगिक भारताचा पाया रचत असतानाच, भारताच्या पारंपरिक सामर्थ्याकडे दुर्लक्ष होणार नाही, याचीही त्यांनी खात्री केली. हातमाग, कुटीर उद्योग, कारागीर आणि वस्त्रोद्योगातील कामगार यांनाही त्यांच्यामध्ये तितकाच कटिबद्ध पुरस्कर्ता लाभला.

या ठिकाणी मला एक वैयक्तिक अनुभव सांगायचा आहे. आत्मनिर्भरतेच्या स्पष्ट दृष्टिकोनातून डॉ. मुखर्जी यांनी प्रयत्नपूर्वक उभारलेल्या सिंद्री खत प्रकल्पाकडे अनेक दशके देशाचे नेतृत्व करणाऱ्यांनी दुर्लक्ष केले. मला याचा अभिमान वाटतो की, आमच्या सरकारला या परंपरेच्या पुनरुज्जीवनात योगदान देण्याची संधी मिळाली. त्या कार्यक्रमात उपस्थित राहणे हा खरोखरच सर्वांत विशेष क्षणांपैकी एक होता.

भारताच्या सांस्कृतिक परंपरेने फार पूर्वीपासून संवाद आणि चर्चांना महत्त्व दिले आहे. डॉ. मुखर्जी यांनी याच लोकशाही मूल्यांचे प्रतिनिधित्व केले होते. सुरुवातीच्या काळात राष्ट्र उभारणीचे कार्य राजकीय मतभेदांच्या पलीकडचे आहे, असा विश्वास बाळगून ते पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात सामील झाले. त्यांनी प्रामाणिकपणे आणि विधायक भावनेने काम केले; परंतु जेव्हा त्यांना वाटले की राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नांसाठी वेगळ्या मार्गाची आवश्यकता आहे, तेव्हा त्यांनी सन्मानाने पदाचा त्याग केला आणि राष्ट्राला आवश्यक असलेल्या राजकीय कार्यासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले.

७५ वर्षांपूर्वी, पंडित नेहरूंनी पहिले घटनादुरुस्ती विधेयक आणले, जे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर थेट आघात करणारे होते. डॉ. मुखर्जी हे त्याच्या सर्वांत कट्टर विरोधकांपैकी एक होते. काँग्रेस काय करू शकते, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. आणि पुढील घडामोडींनी त्यांची भूमिका योग्य असल्याचे सिद्ध केले. ज्यांनी ७५ वर्षांपूर्वी पहिले घटनादुरुस्ती विधेयक आणले, त्यांनीच १९७५ मध्ये आणिबाणी लादली आणि त्यानंतर ५० वर्षांपूर्वी ४२वी घटनादुरुस्ती करून उदारमतवादी लोकशाही मूल्यांच्या मुळावरच घाव घातला.

डॉ. मुखर्जी मानवतावादी कार्यासाठीही ओळखले जातात. १९४३ मध्ये जेव्हा बंगालमध्ये भीषण दुष्काळ पडला, तेव्हा डॉ. मुखर्जींनी स्वतःला पीडितांच्या सेवेत झोकून दिले. लोकांना अन्न मिळावे, यासाठी त्यांनी अनेक उपाहारगृहे आणि मदत केंद्रे उघडली जातील याची खात्री केली. एकीकडे ते आपल्या लोकांच्या दुर्दशेने अत्यंत व्यथित झाले होते, तर दुसरीकडे वसाहतवादी शासकांच्या असंवेदनशीलतेमुळे ते दुःखी झाले होते. त्यांनी 'पंचशेर मनवंतर' नावाचे एक पुस्तकही लिहिले, ज्यात त्यांनी आपली व्यथा मांडली. १९४२ मध्ये जेव्हा मेदिनीपूरला महाचक्रीवादळाचा तडाखा बसला, तेव्हा परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची सर्वत्र प्रशंसा झाली.

कोलकाता येथील एका महाविद्यालयात बोलताना डॉ. मुखर्जी यांनी तरुणांना आवाहन केले, "तुम्ही जे काही काम हाती घ्याल, ते गांभीर्याने, सखोलपणे आणि उत्तमरीत्या करा; ते कधीही अर्धवट किंवा अपूर्ण सोडू नका आणि जोपर्यंत तुम्ही तुमचे सर्वोत्तम योगदान देत नाही, तोपर्यंत समाधानी राहू नका."

भारत देश 'विकसित भारता'च्या ध्येयाकडे वाटचाल करत असताना, त्यांनी ज्या मजबूत, एकसंध, आत्मविश्वासी आणि करुणामय भारतावर दृढविश्वास ठेवला होता, तो घडवण्यासाठी दररोज प्रयत्न करणे, हीच त्यांच्या स्मृतीला वाहिलेली सर्वोत्तम आदरांजली आहे. आजच्या तरुण पिढीवर माझा पूर्ण विश्वास आहे की ते या आवाहनाला समर्थन देतील. ■

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# आता 'भीती' शिकवावी का ?

घराघरातून नव्या पिढीवर चांगले संस्कार व्हावेत, नवी पिढी अधिक चारित्र्यवान, सुशिक्षित आणि धाडसी प्रवृत्तीची घडावी, अशी सार्थ अपेक्षा प्रत्येकालाच असते. यापैकी पहिल्या तीन गुणांचे संवर्धन पालक आणि शिक्षक मिळून करतातच. पण, चौथा गुण अर्थात धाडस हा बहुतांश वेळी अंगभूत असतो. अर्थात, काही मुले-मुली परिस्थितीनुरूप धाडसी किंवा भित्रे बनतात. पण, आज आपल्या अपत्यांना मग मुलगा असो वा मुलगी, त्यांना धाडसी बना, हे सांगायचे की नाही, असा प्रश्न पालकांकडून केला जातोय.

मुंबईच्या लोकलमध्ये एका तरुणाने दुसऱ्याचा धक्का लागला म्हणून त्याला हटकले तर त्याने त्या तरुणाचा खूनच केला. राजस्थानात एक १३ वर्षीय मुलगी ऑटोने मैत्रिणीकडे जात असताना ऑटोवाल्याने तिला थेट एका हॉटेलमध्ये नेले आणि तिथे तिला विकले. त्या ठिकाणी पाच दिवस ३० जणांनी तिच्यावर अत्याचार केले. तिची कशीबशी सुटका झाली. पण, या निमित्ताने प्रश्न उपस्थित झाला की, आपल्या मुलांना आपण धीटपणे वागायला शिकवायचे की नाही? आता समाज माध्यमांवरही अशा आशयाच्या रील्स येताहेत की, आपल्या मुलांना सांगा, कोणाशीही क्षुल्लक किंवा अन्य कोणत्याही कारणाने भिडण्यात काही अर्थ नाही. कारण कोण व्यक्ती कोणते शस्त्र बाळगून असेल, कोणत्या मानसिकतेत असेल, शुद्धीवर असेल किंवा नसेल, याचा नेम नाही. आपली चूक नसेल तरीही 'सॉरी' हा परवलीचा शब्द बोलून दोन पावलं मागे यावे. हा भित्रेपणा आहे का? तर नक्कीच नाही. हा आजच्या काळात शहाणपणा ठरतोय. कारण यातून किमान पुढील अनर्थ टळू शकतो. सार्वजनिक ठिकाणी वावरणाऱ्या बहुतांश लोकांमध्ये प्रचंड उद्दामपणा दिसतो. कोणालाच झुकायचे नाही, माघार घ्यायची नाही. आपली चूक तर कबूल करायचीच नाही. अशात जर कोणी 'अरे'ला 'कारे' केले तर गहजबच होतो. परिणाम काय घडेल, याचा आपल्याला रोजच्या बातम्यांमधून अंदाज बांधता येईल. पण, मग यावर प्रत्येकवेळी आपली चूक नसताना माघार घेणे, समोरच्याची चूक असूनही आपण बॅकफूटवर येणे, हाच मार्ग चोखाळायचा का? उत्तर कठीण आहे. मुळात, असे कोणतेही चित्र उभे राहूच नये, अशी सामाजिक स्थिती निर्माण होणे गरजेचे आहे. प्रत्येकाने नागरी कर्तव्य म्हणून सर्व नियम पाळले, एकमेकांशी सौहार्द ठेवला तर अशा संघर्षाची वेळच येणार नाही. मग यासाठी सर्वांत आधी गरजेची आहे कायदा, सुव्यवस्था. मानसोपचारतज्ज्ञांच्या मते, जगात सुमारे पाच हजार प्रकारच्या वेगवेगळ्या भीती माणसाला असू शकतात. मरणाची भीती हा मानवी स्वभाव आहे. याही पुढे जात आता माणसामध्ये कायद्याची भीती निर्माण व्हायला हवी. आखातातील काही संपन्न देश असे आहेत जिथे महिलांविषयीच्या गुन्ह्यांसंदर्भातील कायदे अतिशय कठोर आहेत. अशा ठिकाणी गुन्ह्यांचे प्रमाण साहजिकच कमी आहे. कारण तेथील लोकांना कायद्याची भीती वाटते. आपल्या देशात कायद्याची भीतीच उरलेली नाही, असे खेदपूर्वक नमूद करावेसे वाटते. कायदा हा लोकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी नक्कीच नाही. पण, कायदा मोडला तर शासन होईल, हा विश्वास सर्वसामान्यांमध्ये निर्माण व्हायला हवा. कायद्याची सार्थकता यातच आहे की, त्याचा वापर कमी वेळा व्हावा. भीती गुन्हेगारांच्या मनात बसायला हवी. ही जबाबदारी अर्थातच प्रशासकीय व्यवस्थेची आहे.

भीती ही एक नैसर्गिक आणि प्राथमिक भावना आहे, जी धोक्यापासून बचाव करण्यासाठी देह आणि बुद्धीला सतर्क करते. भीतीची भावना जास्त काळ राहिली तर ती माणसाला दुबळे बनवते. आपल्याला नवीन पिढीमध्ये देह आणि बुद्धीला सतर्क करणारी भीती निर्माण करायची आहे, दुबळी करणारी नाही. एक छोटीशी गोष्ट आहे. एकदा यमाने आपल्या दूतांना रागावले की, तुम्हाला मी ५०० माणसांना घेऊन यायला सांगितले तर मग तुम्ही हजार माणसे का आणली? त्यावर दूत म्हणाले, आम्ही ५०० लोकांचेच प्राण घेतले. पण, उर्वरित ५०० नुसत्या भीतीनेच मेले. म्हणून आपल्या मुलांना शिकवायची तर वाईटाची भीती शिकवावी. अनाठायी धाडस नको आणि अवाजवी भीतीही नको, हा धडा नवीन पिढीसाठी त्यातल्या त्यात योग्य ठरेल. ■

७७५५९३८८२२

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# अणवस्त्र : ब्रह्मास्त्र की पांढरा हत्ती ?

भारताने आपल्या भात्यातील १९० अण्वस्त्रांपैकी १२ अण्वस्त्रे 'तैनात' केली असल्याचे वृत्त समोर आले आहे. लवकरच पाकिस्तानही असाच निर्णय घेईल असे मानले जाते. कारण, १९९८ मध्ये भारताने अणुविस्फोट केल्यानंतर काही आठवड्यांत पाकिस्ताननेही अणुविस्फोट करीत आण्विक शक्तीच्या विश्वात पदार्पण केले होते.

भारताने १२ अण्वस्त्रे तैनात केल्याचे जे वृत्त समोर आले आहे ते काही भारत सरकार वा सरंक्षण मंत्रालयाने अधिकृतपणे दिलेले नाही. स्वीडनची राजधानी स्टॉकहोममध्ये असलेल्या स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटने आपल्या वार्षिक अहवालात ही माहिती दिली आहे. भारताजवळ १८० अण्वस्त्रे होती, आता त्यांची संख्या १९० झाली आहे आणि त्यातील १२ आता काही पाणबुड्यांमध्ये तैनात करण्यात आली आहेत असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. अण्वस्त्रांच्या बाबतीत सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे ती आदेश दिला की लगेच वापरता येतील अशी ठेवलेली नसतात. त्याचे काही भाग जोडावे लागतात आणि नंतर त्याचा वापर केला जातो. बटन दाबले की अण्वस्त्र सोडले जाते हा एक केवळ गैरसमज.

**अण्वस्त्रे आता बोथट?** : अण्वस्त्रे ही शत्रूला घाबरविण्यासाठी असतात, जरब बसविण्यासाठी असतात. त्याचा वापर केला जात नसतो असे मानले जाते. पण, याचा फायदा युद्ध टाळण्यासाठी होतो असेही मानले जाते. भारत-पाकिस्तान दोघेही अण्वस्त्रधारी झाल्याने आता दोघांमध्ये परंपरागत शस्त्रांनी युद्ध होणार नाही असे याच आधारावर सांगितले गेले. पण, झाले मात्र उलटेच. भारत-पाकिस्तान दोन्ही देशांनी १९९८ मध्ये अण्वस्त्रे तयार केलीत आणि १९९९ मध्ये दोन्ही देशांत कारगिल युद्ध झडले. ते चांगले दोन महिने चालले. पण, त्यात एकदाही अण्वस्त्रांचा वापर करण्याची धमकी ना भारताने दिली ना पाकिस्तानने.

वर्षभरापूर्वी दोन्ही देशांत पुन्हा चार की पाच दिवसांचा एक मर्यादित संघर्ष झडला. १९९९ व २०२५ या दोन्ही युद्धात फक्त पारंपरिक शस्त्रांचाच वापर करण्यात आला. अण्वस्त्रांचा नाही. त्यामुळे दोन्ही देश अण्वस्त्रसंपन्न झाल्याने आण्विक संघर्ष होण्याच्या शक्यतेने वा भीतीने आता त्यांच्यात युद्ध होणार नाही हा समज की सिद्धांत या दोन्ही युद्धांनी खोटा ठरविला. म्हणजे अण्वस्त्रे एकप्रकारे बोथट झाली आहेत.

**वेगवेगळे धोरण** : भारताने आपल्या अण्वस्त्रांबाबत 'नो फर्स्ट युज' म्हणजे भारत प्रथम अण्वस्त्र वापरणार नाही असे वारंवार म्हटले आहे तर याउलट पाकिस्तानने असे काहीही म्हटलेले नाही. त्याने 'फुल स्पेक्ट्रम युज' हे धोरण स्वीकारले आहे. म्हणजे आपल्या आण्विक भात्यातील कोणतेही शस्त्र केव्हाही वापरण्याचा पर्याय त्याने खुला ठेवला आहे. भारतीय सैन्यासमोर आपण टिकाव धरू शकत नाही याची कल्पना पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांना असल्याने त्यांनी नो फर्स्ट युजचे धोरण स्वीकारले नाही. त्याचप्रमाणे पाकिस्तानचे भौगोलिक आकारमान भारताच्या तुलनेत कमी असल्याने सारा पाकिस्तान भारताच्या हवाई माऱ्याच्या पट्ट्यात येऊ शकतो. ती स्थिती येण्यापूर्वीच पाकिस्तानने अण्वस्त्रे वापरली पाहिजेत या विचारातून त्याने 'फुल स्पेक्ट्रम युज' हा आण्विक सिद्धांत स्वीकारला आहे.



**सर्वाधिक साठा रशियाकडे** : जगात सर्वाधिक अण्वस्त्रांचा साठा रशियाकडे आहे. पण, चार वर्षांपासून सुरू असेलल्या युक्रेन विरुद्धच्या युद्धात रशियाने एकही अण्वस्त्र वापरलेले नाही. राष्ट्रपती पुतिन यांनी प्रारंभीच्या काळात अण्वस्त्रे वापरण्याची धमकी तर दिली पण ते वापरण्याचे साहस ते दाखवू शकते नाहीत. कारण, अण्वस्त्र एवढे संहारक शस्त्र आहे की ते वापरण्याची ताकद कोणत्याही देशाजवळ नाही. फक्त इस्त्रायल-इराणसारखे देशच त्याचा वापर करू शकतात. इस्त्रायलजवळही अण्वस्त्रे असल्याचे मानले जाते. पण, त्यानेही गाझा पट्टी, लेबनॉन, इराण यांच्याविरोधात अण्वस्त्र वापरण्याचे धाडस केलेले नाही.

**तरीही पीछेहाट** : युक्रेन युद्धात समोर आलेल्या ताज्या माहितीनुसार, मागील दोन महिन्यांपासून रशियाची पीछेहाट सुरू आहे. रशियाजवळ तर अण्वस्त्रांचा साठा आहे. युक्रेनजवळ एकही अण्वस्त्र नाही तरीही रशियाची पीछेहाट होत आहे. याचे कारण म्हणजे रशियाजवळ असलेली अण्वस्त्रे एवढी विध्वंसक आहेत की तो त्याचा वापर करण्याचा विचारही करू शकत नाही आणि दुसरीकडे युक्रेनने ड्रोन नावाचे असे नवे शस्त्र तयार केले आहे की त्याने येणाऱ्या काळातील युद्धांचा संदर्भ बदलून टाकला आहे. आणि याच ड्रोनच्या ताकदीवर युक्रेनने रशियाला पीछेहाट करण्यास बाध्य केले आहे.

**ऑपरेशन स्पायडर वेब** : युक्रेनने मागील वर्षी ऑपरेशन स्पायडर वेब नावाने एक हवाई हल्ला करीत रशियाला या युद्धातील सर्वांत मोठा दणका दिला आहे. १ जून २०२५ मध्ये ११७ ड्रोनचा वापर करीत युक्रेनने रशियाच्या खोल आतवर घुसून त्याच्या हवाई तळांवर हल्ले केले. यातील बेलाया हवाई तळ तर युक्रेन-रशिया सीमेपासून ४३०० किलोमीटर होता. म्हणजे ड्रोनच्या साहाय्याने युक्रेनने काय केले याचा हा दाखला होता आणि याउलट जगातील सर्वाधिक अण्वस्त्रे असणारा रशिया काहीही करू शकला नाही.

**मास्कोवर काळोख** : रशियाने युक्रेनवर काही भीषण हल्ले चढविल्यानंतर युक्रेनने थेट मास्कोवर हल्ला करण्यापर्यंतची मजल मारली. मास्कोजवळ असलेल्या तेल शुद्धीकरण कारखान्यांवर ड्रोनने हल्ला चढविण्यात आला आणि युद्ध म्हणजे काय याची कल्पना मास्कोच्या रहिवाशांना आली. साऱ्या मास्कोवर काळोख दाटला होता. सर्वत्र अंधाराचे साम्राज्य. म्हणजे आता युक्रेनने फक्त क्रेमलिनवरच हल्ला करण्याचे बाकी ठेवले आहे. युक्रेनपासून थेट मास्कोपर्यंत जाऊ शकतील असे अत्याधुनिक ड्रोन तयार करण्यात युक्रेनने यश मिळविले आहे.

**नवी महाशक्ती?** : अमेरिकेचे पॅट्रिएट प्रक्षेपणास्त्र जे काम करते, तेच काम युक्रेनचे वाईल्ड हॉर्नेट हे ड्रोन करते. एका पॅट्रिएट प्रक्षेपणाची किंमत जवळपास ३० कोटी रुपये आहे तर वाईल्ड हॉर्नेटसाठी फक्त अडीच लाख रुपये मोजावे लागतात. युक्रेनने ड्रोन तयार करण्याचा जणू सपाटा लावला असून आज ड्रोन तयार करण्याची त्याची वार्षिक क्षमता ५० लाख एवढी झाली आहे. आणि ही संख्या चीन-रशिया यांच्या एकत्रित क्षमतेपेक्षा जास्त आहे. चीन दरवर्षी २० लाख ड्रोन तयार करू शकतो तर रशिया १८ लाख. २०२६ या चालू वर्षात ८० लाख ड्रोन तयार करण्याचे लक्ष्य युक्रेनने ठरविले आहे. यासाठी त्याला आर्थिक साहाय्य करण्यासाठी १६ देशांचा एक गट स्थापन करण्यात आला असून त्यात कॅनडा व ब्रिटन हे प्रमुख भागीदार आहेत. आता तर युक्रेनने ड्रोनची निर्यात करणे सुरू केले आहे. यावरून युक्रेनने ड्रोन उत्पादनात किती मोठी मजल गाठली आहे याची कल्पना करता येईल.

**रशियापेक्षा श्रेष्ठ** : २०२५ मध्ये रशियाने युक्रेनच्या विरोधात ५४ हजार ड्रोन वापरले. 'शाहीद' नावाचे हे ड्रोन इराणने रशियाला पुरविले होते. त्यापेक्षा युक्रेनचे ड्रोन अधिक प्रभावी ठरत आहेत आणि ते जगाला दिसत आहेत. युक्रेनने ड्रोनमध्ये वेगवेगळे प्रकार तयार केले आहेत. त्यात फर्स्ट पर्सन व्ह्यू एफपीव्ही हा सर्वांत सोपा व सैनिकांमध्ये प्रिय ठरला आहे. कारण तो वापरणे सर्वांत सोपे असते.

**ड्रोनयुग?** : अण्वस्त्र तयार करणे हेच एक मोठे काम असते. नंतर त्या अण्वस्त्रांची सुरक्षा, देखभाल, ते वापरण्याची गुंतागुंतीची प्रक्रिया आणि शेवटी ते वापरले जाण्याची शून्य शक्यता हे सारे पाहता अण्वस्त्रे आता पांढरा हत्ती ठरत आहेत काय?

युक्रेन आता ड्रोन 'सुपर पॉवर' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. मग, जगातील सर्वाधिक अण्वस्त्रे असणाऱ्या रशियाचे काय? ड्रोनधारी युक्रेनसमोर अण्वस्त्रधारी रशियाला का नांगी टाकावी लागत आहे? अण्वस्त्रांचे युग संपून आता ड्रोनयुग सुरू झाले असे आता मानावयाचे काय? भविष्यकाळात लढली जाणारी युद्धे या प्रश्नांची उत्तरे देणार आहेत. ■

## वाचक पत्र

### संकटाकडे डोळे उघडून पाहा

जून २०२६ च्या उत्तरार्धात युरोपमध्ये आलेली भीषण उष्णतेची लाट ही हवामान बदलाची एक गंभीर चेतावणी आहे. फ्रान्स, जर्मनी, ब्रिटनसह अनेक देशांत तापमान ४०-४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. यामुळे १३०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. युरोपसारख्या थंड मानल्या जाणाऱ्या प्रदेशाला जर असा तडाखा बसत असेल, तर आपण किती धोक्यात आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. ही घटना भारतासाठी 'वेक-अप कॉल' आहे. युरोपमधील ही परिस्थिती भारतासाठी थेट हवामानशास्त्रीय संकट नसले तरी ती आपल्या भविष्यातील धोक्यांची घंटा आहे. जागतिक तापमान वाढीमुळे हे संकट आता जगभर पसरले आहे, ज्याची तीव्रता भारतातही वर्षानुवर्षे वाढत आहे. उष्णतेमुळे वाढणाऱ्या हृदयविकार आणि श्वसनाच्या समस्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी हे संकट जीवघेणे ठरत आहे. बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी आता आपण अधिक सज्ज होणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करणे, हीच काळाची गरज आहे. ■

**प्रिया बागडदेव**

## महत्वाचे...



## पंढरपूर लायन्स क्लबने साजरा केला डॉक्टर्स, कृषी आणि सीए दिन

**पंढरपूर, दि. ५ जुलै-**

लायन्स क्लब पंढरपूर ड्रीमच्या नूतन वर्षाची सुरुवात झाली. या क्लब कडून डॉंक्टर्स, कृषी आणि सीए दिन साजरा करुन त्या त्या क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. नुकताच १ जुलै या दिवशी डॉक्टर्स दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त येथील डॉ.संग्राम गायकवाड, डॉ.मंदार सोनवणे,डॉ.सूरज तंटक, डॉ. किरण बहिरवाडे, डॉ.अमित इनामदार, डॉ.प्रेरणा देवकते, डॉ. स्नेहल मोहिते, डॉ.कुलदीप कोलपाकवार या वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर डॉक्टरांचा सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या बरोबरच सीए डे निमित्त येथील करसल्लागार अर्थात सीए अमोल भालेराव, अंकुश कौलवार, पवनकुमार झंवर, अतुल कौलवार, शुभम दोमकुंडवार, ध्रुव कौलवार आणि आदित्य कौलवार या करसल्लागार मंडळींचा देखील सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. .कार्यक्रमासाठी लायन्स क्लबचे अध्यक्ष ला.शार्दूल नलबिलवार, मावळते अध्यक्ष ला. मंदार सोनवणे, सचिवा संध्या खिस्ते, खजिनदार गणेश यलमार पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन ललिता कोळवले यांनी केले तर डॉ. अमित इनामदार आभार यांनी मानले.



## रोटरी क्लबच्या नवीन कार्यालयाचे उद्‌घाटन

**सोलापूर, दि. ५ जुलै-**

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत कार्यरत रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटी यांच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन व क्लब असेंब्ली कार्यक्रम संपन्न झाला. हा कार्यक्रम बसवराज बिराजदार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. या कार्यालयाचे उद्‌घाटन रोटे. पारुल जे. पटेल (फर्स्ट लेडी आर.वाय. २०२६-२७ व आदिशक्ती लीडर) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी असिस्टंट गव्हर्नर रोटे. वंदना कोपकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होत्या. यावेळी रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीचे अध्यक्ष बसवराज बिराजदार, सचिव संतोषकुमार सावळगी, खजिनदार महेश साळुंके, उपाध्यक्ष भारत कदम, नागेश शेंडगे, डॉ. अकबरसाहेब नदाफ, सत्यम दुधनकर, डॉ. शिवगंगा मैंदर्गी, मोहम्मद इक्बाल बागबान, अनिल चंडक, योगीनाथ कुडते, स्वाती माणसावाले, सलीम जमादार, विशाल कोंटम, तौफिक काझी, समीर नदाफ उपस्थित होते. सूत्रसंचालन रोटे. डॉ. शिवगंगा मैंदर्गी आणि आभार सचिव रोटे. संतोषकुमार सावळगी यांनी केले.

## संभाजी ब्रिगेडच्या शिष्टमंडळाने उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची घेतली भेट

**सोलापूर, दि. ५ जुलै-**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक पदोन्नतीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला असून, ही प्रक्रिया तातडीने मार्गी लावण्याची जोरदार मागणी शिक्षकांकडून करण्यात येत आहे. अनेक पात्र शिक्षकांची पदोन्नती वर्षानुवर्षे रखडल्याने प्रशासनाने याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. यासंदर्भात संभाजी ब्रिगेडच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. विस्तार अधिकारी (श्रेणी-२ व ३), केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. बैठकीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी पदोन्नती प्रक्रियेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे सकारात्मक आश्वासन दिल्याने उपस्थित शिक्षकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सचिन जगताप, प्रदीप तांडळे, रामराजे मुसळे, शंकर थोरात, इंदलकर यांच्यासह जिल्ह्यातील मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते. पदोन्नतीचा प्रश्न तातडीने मार्गी लागावा आणि पात्र शिक्षकांना त्यांच्या हक्काचा न्याय मिळावा, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.



## चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला व कॉलेजमध्ये गुणवंतांचा सत्कार

**सोलापूर, दि. ५ जुलै-**

चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला व ज्युनिअर कॉलेज येथे इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरवपूर्ण सत्कार सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नॅब संस्थेच्या उपाध्यक्षा अनुगीता पवार होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस नाईक व प्रशालेचे माजी विद्यार्थी अनिल गावसाने उपस्थित होते. यावेळी प्रशाला व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या तसेच नॅब संस्थेच्या सहसचिव सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कै. शाम गोपाळ श्रीगोंदेकर व कै.राज-राम बेंजरपे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके व आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान करताना प्रांगणात आनंद, अभिमान आणि प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले. प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.जोतिबा काटे यांनी केले. सूत्रसंचालन कासिम मुजावर यांनी प्रभावीपणे केले, तर आरती बेंजरपे यांनी आभार मानले.

# ‘देवाभाऊ जनआरोग्य अभियान’चा नाझरा येथून करण्यात आला प्रारंभ

### सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांची संकल्पना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ५ जुलै-**

पालकमंत्री जयकुमार गोरे व माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या पुढाकारातून आणि संकल्पनेतून ‘देवाभाऊ जनआरोग्य अभियान’ राबविण्यात येत आहे. उपक्रमाचा प्रारंभ रविवार दि.५ जुलै रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, नाझरा (ता.सांगोला) येथून करण्यात आला.

चेतनसिंह केदार-सावंत स्वतः या अभियानाचे नेतृत्व करत आहेत. प्रत्येक रविवारी जिल्ह्यातील एका प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील आरोग्य सेवा, शासकीय योजनांची अंमलबजावणी, उपलब्ध सुविधा आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा सखोल आढावा घेणार आहेत. अभियानातील त्रुटींची नोंद घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधला जाणार आहे. सावंत यांनी नाझरा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भेटीदरम्यान वैद्यकीय अधिकारी, जनआरोग्य समिती सदस्य, आशा स्वयंसेविका, आरोग्यसेविका, आणि आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. शासनाच्या सर्व आरोग्य योजना प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, याबाबत सूचना दिल्या. बैठकीस सांगोला पं.स.उपसभापती अजय सरगर, सदस्य सदाशिव दबडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.संदीप देवकते, विस्ताराधिकारी जयंत टकले, सुरेश चौगुले, भाऊ पाटील, सुरेश आदाटे, विजयकुमार जावीर, रमेश पाटील, संजय पाटील, प्रवीण पाटील, रियाज काझी उपस्थित होते.



**सातत्याने करणार पाठपुरावा**

‘देवाभाऊ जनआरोग्य अभियान’ हा ग्रामीण आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान आणि उत्तरदायी बनविण्याचा प्रयत्न आहे. एकही पात्र नागरिक शासकीय आरोग्य योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन सातत्याने पाठपुरावा करणार आहे.

**-चेतनसिंह केदार-सावंत,**
सभापती, जि.प.शिक्षण व आरोग्य समिती



## आयएमएस ग्रुप ऑफ स्कूलमध्ये पॉस्को कायदा व पॉश विषयक कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जुलै-**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबरोबरच कार्यस्थळी सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि भेदभावमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने आयएमएस ग्रुप ऑफ स्कूल्सच्या सर्व शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी पॉस्को कायदा २०१२ तसेच पॉश कायदा २०१३ विषयावर जनजागृती व मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.

या सत्रात कायदेतज्ज्ञ नेहा हसबनीस ह्यांनी पॉस्को कायद्याअंतर्गत बालकांचे हक्क, शाळेची जबाबदारी, संशयास्पद घटना ओळखणे, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया तसेच कायदेशीर तरतुदी याविषयी माहिती दिली. तसेच पॉश कायद्याअंतर्गत कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंध, अंतर्गत तक्रार समितीची (आयसीसी) भूमिका, एसएसई पोर्टल संबंधी माहिती देऊन कर्मचाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि सुरक्षित कार्यसंस्कृती निर्माण करण्याचे महत्त्व यावर फ्लॉक्स लीगल ॲडव्हायझरी टीमच्या शिल्पा पाठक यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे संचालक अमोल जोशी व सायली जोशी यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले. विक्रम देशमुख यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# मुंबईचा जगन्मय पाणिग्रही अजिंक्य, सोलापूरचा उमेश बडगेर उपविजेता

### वरिष्ठांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा : राजीव देसाई यांचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जुलै-**

वरिष्ठांच्या पाचव्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत ३० वर्षावरील पुरुषांच्या एकेरीच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या प्रथम मानांकित जगन्मय पाणिग्रही ने सोलापूरच्या बिगर मानांकित उमेश बडगेरचा अत्यंत अतीतटीच्या टायब्रेक लढतीत ६-२, ३-६, ११-०९ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. तर, ६५ वर्षांवरील पुरुष गटात सोलापूरच्या राजीव देसाई,अरुण अगरवाल यांनी आगेकूच केली.

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली

एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल आणि इलिझियम क्लबच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत ४५ वर्षांवरील पुरुष गटात उपांत्य फेरीत अव्वल मानांकित नरेंद्र सिंग चौधरी याने बोसकिरण नल्लामोठु यांचा ६-२, ६-१ असा तर, तिसऱ्या मानांकित

संदीप बेडेकरने दुसऱ्या मानांकित नितेश रुंगताचा ६-४, ६-४ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. ६० वर्षांवरील पुरुष गटात सोलापूरच्या राजीव देसाईने छत्रपती संभाजीनगरच्या गोपाल देववर ६-०, ६-० असा एकतर्फी विजय मिळवित उपांत्य फेरी गाठली. दुसऱ्या सामन्यात अरुण अगरवाल याने अमित सांगलवर ६-४, ६-४ असा संघर्षपूर्ण विजय मिळवला.



**आजचे निकालः**
**७५ वर्षांवरील पुरुषः**

रामकृष्ण सुदगणी (भारत) वि.वि.शिवामोनी मूर्ती (भारत) ६-२, ६-२; आर गंगाधरण (भारत) वि.वि.राजेंद्र अगरवाल ४ (भारत) ६-२, ६-३; शैलेंद्र खंडेलवाल (भारत) वि.वि.दर्शन मारिया (भारत) ६-३, ५-७, १०-१; हरीश कुमार (भारत) वि.वि. नुन्ना कुमार (भारत) ६-४, ३-६, १०-५; ताहीर अली (भारत) वि.वि.विजय शर्मा (भारत) ६-०, ६-०; गोविंद कुमार (भारत) वि.वि.मुकेश बजाज (भारत) ६-१, ६-२.

# दिवसा घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक; दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जुलै -**

शहर गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने एका सराईत चोरट्याला अटक करून शेळगी भागात तीन दिवसांपूर्वी घरफोडी करून चोरलेले दोन लाख रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने हस्तगत केले आहेत.

हर्षद गुलाब पवार (वय ३२, रा. फ्लॅट नं. १६, बांदल हाईटस् बिल्डींग, पिरंगुट, ता. मुळशी, जि. पुणे ) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे. शेळगी भागातील गौरी अपार्टमेंटमधून दि.२४ ते २६ जून रोजी दुपारी दरम्यान अज्ञात चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून कपाटामधील सुमारे ३७ ग्रॅम सोन्याचे व ४० ग्रॅम चांदीचे दागिने चोरले होते. याबाबत जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता .

शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांना शहरातील वेगवेगळया ठिकाणचे सी.सी.टी.व्ही फुटेज, तांत्रीक विश्लेषण व गोपनिय बातमीदारांकडून माहिती प्राप्त करण्याबाबत मार्गदर्शन केले होते. त्याप्रमाणे गुन्हे शाखेकडील फौजदार मनोज मोरे व त्यांचे तपास पथकाने घटनास्थळी भेट दिली होती. त्यांनी गुन्ह्याचे घटनास्थळावरील व आजुबाजुच्या परिसरातील सुमारे २०० सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी केली असता पोलीस अंमलदार अजिंक्य माने यांनी सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या आधारे आरोपीची ओळख पटविली. दिनांक २९/०६/२०२६ रोजी नमूद तपास पथकास गोपनिय बातमीदार मार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की नमूद गुन्ह्यातील आरोपी हा हैदराबाद रोडवरील मार्केट यार्डचे पुढील बाजुस, जनावरांच्या दवाखान्यासमोर येथील परिसरामध्ये फिरत आहे. त्याप्रमाणे पोलिसांनी संबंधित ठिकाणी जावुन वरील आरोपीस ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्यामध्ये गौरी अपार्टमेंट, बलदवा नगर, शेळगी, सोलापूर येथून चोरी केलेले ३७ ग्रॅम सोन्याचे व ४० ग्रॅम चांदीचे दागिने व गुन्हा करण्याकरिता वापरलेले हत्यार (कटावणी) मिळुन आल्याने ते पंचासमक्ष जप्त करण्यात आले आहे.

अशा प्रकारे शहर गुन्हे शाखेकडील पोलिसांनी सी.सी.टी.व्ही. फुटेज, तांत्रिक माहितीच्या आधारे दिवसा घरफोडीचा गुन्हा अवघ्या ३ दिवसात उघडकीस आणला. सुमारे ३७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व ४० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने असा एकूण २ लाख ८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कामगिरी शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक मनोज मोरे व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार जावेद जमादार, अजिंक्य माने, धिरज सातपुते, सुभाष मुंढे, वसिम शेख, काशिनाथ वाघे, अभिजित धायगुडे, सैपन सय्यद व सायबर पोलीस स्टेशन कडील पोलीस अंमलदार प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, चालक चालक सतिश सतिश काटे, शाम सुरवसे, मारुती घोरपडे यांनी पार पाडली आहे.

# कादर विजापूर व हेमंत हबीब संघांची विजयी घोडदौड

### लिटिल चॅम्प १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा : राजेश शिंदे, वरद चिपडे सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जुलै-**

लिटिल चॅम्प बारा वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यात कादर विजापूर आणि हेमंत हबीब संघांनी शानदार कामगिरी करत अनुक्रमे ८ आणि ७ विकेट्सने दणदणीत विजय मिळवले.

जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर झालेल्या पहिल्या सामन्यात रामभाऊ देगावंकर संघाने प्रथम फलंदाजी करताना १७.१ षटकांत ९ बाद ८० धावा केल्या. ८१ धावांचे माफक लक्ष्य कादर विजापूर संघाने केवळ १०.१ षटकांत २ गडी गमावून पूर्ण केले आणि दमदार विजयाची नोंद केली. कादर विजापूर संघाचा गोलंदाज राजेश शिंदे याने ४ षटकांत २१ धावा देऊन ३ महत्त्वाचे बळी घेतले. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.



दुसऱ्या सामन्यात अंबादास पवार संघाने प्रथम फलंदाजी करताना २२.५ षटकांत सर्वबाद ७८ धावा केल्या. प्रत्युत्तरात हेमंत हबीब संघाने संयमी आणि आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन करत १२.४ षटकांत ३ बाद ७९ धावा करत सहज विजय मिळवला.

या सामन्यात वरद चिपडे याने अष्टपैलू कामगिरी केली. त्याने गोलंदाजीत ३ षटकांत ६ धावा देत ३ बळी घेतले आणि फलंदाजीत २८ चेंडूत ३ चौकारांसह नाबाद २१ धावा केल्या. त्याच्या या अष्टपैलू कामगिरीबद्दल त्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

**महावितरण** — **वीज उपकेंद्रासाठी जागा पाहिजे.**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, बार्शी तर्फे निवेदन करण्यात येते की, खालील ठिकाणी नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. या उपकेंद्रासाठी किमान ३५ ते ४० आर क्षेत्रफळ व शक्यतो चौकोनी आकार असलेली तसेच सार्वजनिक रस्त्या लगत असणारी जमीन आवश्यक आहे. अशा प्रकारच्या जागा देऊ इच्छिणाऱ्या जमीन मालकांनी आपल्या जागेच्या प्रमाणित कागद पत्रासह जाहिरात दिलेल्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, बार्शी आझाद चौक (पॉवर हाऊस), बुरुड गल्ली, बार्शी येथे जमिनीच्या अपेक्षित दरासह संपर्क साधावा.

| अ. क्र. | प्रस्तावित ३३/११ के. व्ही. उपकेंद्राचे नाव | योजना |
|---|---|---|
| १ | निमगाव (टे) ता. माढा जि. सोलापूर | ADB |
| २ | कासारी ता. बार्शी जि. सोलापूर | RDSS-MSKVY 2.0 |
| ३ | वडशिवणे ता. करमाळा जि. सोलापूर | ADB |

PRO/BMTZ/60/2026-27

**कार्यकारी अभियंता, महावितरण, विभागीय कार्यालय बार्शी**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यु. पल. हद्दीतील गट नं. ११७७/१/२/अ पैकी प्लॉट नं. २१ याचे क्षेत्र ११२.00 चौ.मी. यासी चतुःसिमा पुर्वेस - प्लॉट नं. १६, दक्षिणेस - प्लॉट नं २२, पश्चिमेस ९ मीटर चा रोड व उत्तरेस - प्लॉट नं. २० येणे प्रमाणे चतुःसिमा पुर्वक मिळकत आतील तदंगभुत वस्तुहक्कासह वहीवाटीचे हक्कासह व सर्व अधिकारासह श्री. कालिम अलिम पिंजरी रा. बार्शी, ता. बार्शी याचे खरेदी मालकी कब्जे वहीवाटीहची आहे. श्री कालिम अलिम पिंजरी यांनी घर बांधकामासाठी आमचे अशील सांगली अर्बन को-ऑप. बँक लि. सांगली, शाखा - बार्शी या बँकेकडे कर्जाची मागणी केली व त्यांना १८,००,०००/- चे कर्ज मंजूर केले आहे. वर नमुद मिळकत ही सदर कर्जास तारण देत आहेत सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असलेला निर्वाळा विद्यमान मालक कर्जदार यांनी दिलेला आहे. सदर कर्जास सदर मिळकत ही कर्जदार म्हणुन गहाणखत करुन देण्याची श्री कालिम अलिम पिंजरी यांनी घेतलेल्या कर्जा करीता तारण देण्याची तयारी दर्शविली आहे.

सबब वर नमुद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, साठेखत खरेदीखत, कर्ज बोजाचे, बक्षिस वा इतर तत्सम व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासुन आठ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमची खात्री करुन दयावी मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेध निजोखमी आहे असे समजुन आमचे अशील पुढील व्यवहार पुर्ण करतील. कोणतीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली आहे. ता. ०५/०७/२०२६

**सही/-**
**श्री. प्रसाद जा. कुलकर्णी**
**पॅनल ॲडव्होकेट**
**सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी**

## SHRI MAHAVIR URBAN CO. OP BANK LTD., SOLAPUR

Head Office: 60/61, East Mangalwar Peth, Solapur 413002
PH: (0217) 2622933/44

**FORM "Z"**

**(See Rule 107 Sub Rule 11(D-1)**

**POSSESION NOTICE FOR IMMOVABLE PROPERTY**

Whereas, the undersigned being the Special Recovery and Sale Officer namely Krishnahari Yallappa Maisur C/o Shri Mahavir Urban Co-op bank Ltd., Solapur under the authority vested in him under The Maharashtra Co-operative Societies Rules 1961 for negligence to pay debts plus costs by Judgment Debtors / Arrears. The notice for possession of following immovable property of respective Arrears/Judgment Debtors which are stated in following index are hereby noticed that there immovable properties authorized are seized.

Judgment Debtors had not paid their respective debts plus costs therefore, this declaration notice to Debtors and all public in general is given by undersigned officer that he has taken Symbolic Possession of the following Properties in exercise of powers conferred on him under Rule 107 sub rule 11 (D1) of Maharashtra Co-operative Societies Rules 1961. The under mentioned properties which are in symbolic possession of the Bank. Especially for Judgment Debtors/Arrears and all public hereby cautioned that not to deal with the said properties and any dealing with said property will be subject to the charge of Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur for an amount stated in below table and future interest + principal + court fees+ other expenses thereon. This is to be noted by everyone.

| Sr. No. | Recovery Certificate No and Date | Debtors Name | 31.05.2026 Due Amt + Furture Int. + Prin. + Court Fee + Other Exp. | Village / City Name | CTS No / Gat No Area | Date Demand Notice & Symbolic Possession |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mahavir Bank / 101/1046/2025-26 Date 10.03.2026 | Yunus A Gafur Shaikh Prop. Yunus A Gafur Shaikh | Rs. 22,24,424/- | Hajra Yunus Shaikh D Sub D Solapur Tal. North Solapur within the limit of SMC, North Kasba | 1. CSNo.1334/2, Area 22.33 Sq. Mtrs 2. CSNo.1335/1B Area 13.70 Sq. Mtrs | 27.03.2026 02.07.2026 |

All the above are informed that within 15 days from the date of publication of this notice said Judgement Debtors should sign the deed of actual possession of their respective immovable properties and hand it over to the said special recovery and sales officer mentioned below. Otherwise on failure to do so it will result in legal process of taking actual possession of said property by the order of Hon'ble Collector and future sale properties. It should be noted that you will be solely responsible for all future sale of said properties. Also be noted that you will be solely responsible for all future consequences.

**Date:** 04/07/2026
**Place:** Solapur

**Sd/-**
**Special Recovery and Sales Officer**
**Shri. Mahavir Urban Co op Bank Ltd., Solapur**





# एमबाप्पेचा विजयी गोल; फ्रान्स उपांत्यपूर्व फेरीत

## पॅराग्वेवर १-० ने मात, आता गाठ मोरोक्कोशी

**फिलाडेल्फिया, ५ जुलै**

फिलाडेल्फिया स्टेडियमवर कडक उन्हात ६८,३२४ प्रेक्षकांच्या उपस्थितीत झालेल्या फिफा विश्वचषक अंतिम-१६ च्या सामन्यात किलियन एमबाप्पेने पेनॉल्टीवर नोंदविलेल्या एकमेव महत्त्वपूर्ण गोलच्या बळावर फ्रान्सने पॅराग्वेवर १-० असा विजय नोंदविला. या विजयाबरोबरच फ्रान्सने उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविले आणि एमबाप्पेने सात गोलांसह स्पर्धेत सर्वाधिक गोल नोंदविणाऱ्या खेळाडूंच्या यादीत अर्जेंटिनाच्या लिओनेल मेस्सीशी संयुक्तपणे अव्वल स्थान मिळविले. आता उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात फ्रान्सचा सामना मोरोक्कोशी होणार आहे.



विजयाचा आनंद साजरा करताना किलियन एमबाप्पे व संघाचे खेळाडू

या सामन्यात पॅराग्वेच्या संघाने फ्रान्स संघावर दबाव टाकण्याचे प्रयत्न केले व बराच काळ ते यशस्वीही ठरले. मात्र, अखेरीस फ्रान्सच्या खेळाडूंचा दर्जा दिसून आला. ७० व्या मिनिटाला डेझायर डौए याला पाडल्यानंतर मिळालेल्या पेनॉल्टीवर एमबाप्पेने गोल केला.

फ्रान्सने याआधीच्या सामन्यांमध्ये ज्याप्रमाणे आक्रमक खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले होते, तसे काही या सामन्यात पाहायला मिळाले नाही; परंतु पॅराग्वेने त्यांना तशा प्रकारे खेळूच दिले नाही.

या सामन्यादरम्यान बहुतांश वेळ चेंडूवर फ्रान्सचे वर्चस्व होते, तर पॅराग्वेला ९० व्या मिनिटापर्यंत एकदाही गोलच्या दिशेने अचूक फटका मारता आला नाही.

**एमबाप्पेची मेस्सीशी बरोबरी**

वैयक्तिक पातळीवर एमबाप्पेची शानदार कामगिरी या सामन्यातही कायम राहिली. सात गोलसह त्याने लिओनेल मेस्सीची बरोबरी करत स्पर्धेत संयुक्तपणे सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत स्थान मिळवले.

रिअल माद्रिदच्या या स्ट्रायकरच्या नावावर आता एकूण १९ विश्वचषक गोल (१९ सामन्यांत) जमा झाले आहेत. याचा अर्थ, मेस्सीच्या २० गोलच्या एकूण विक्रमापेक्षा तो आता केवळ एका गोलने मागे आहे.

आता दिदिएर देशॉम्प्स यांचा संघ बॉस्टन येथील आपल्या तळावर परतणार आहे. तिथे ते पुढील गुरुवारी फॉक्सबरो येथे मोरोक्कोविरुद्ध होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्याची तयारी करतील. मोरोक्कोने याआधी कॅनडाचा ३-० असा पराभव केला होता. ◂ (वृत्तसंस्था)

# सह-यजमान कॅनडाची कटू सांगता

## मोरोक्को उपांत्यपूर्व फेरीत

**ह्युस्टन, ५ जुलै**

ह्युस्टन येथे मोरोक्कोकडून ३-० अशा पराभवासह, पुरुष फिफा विश्वचषकातील कॅनडाची ऐतिहासिक वाटचाल संपुष्टात आली आहे. स्पर्धेचे सह-यजमानपद भूषवणाऱ्या तीन देशांपैकी कॅनडा हा स्पर्धेतून बाहेर पडणारा पहिला देश ठरला. कॅनडा, अमेरिका आणि मेक्सिकोने संयुक्तपणे या फिफा विश्वचषकाचे आयोजन केले आहे. मेक्सिकोचा इंग्लंडशी, तर अमेरिकेचा बेल्जियमशी अंतिम-१६ चे सामने होणार आहे.

अझेदिन ओनाहीने मोरोक्कोसाठी दोन गोल केले, तर स्टार खेळाडू अश्रफ हकिमी आणि ब्राहिम डियाझ यांनी प्रत्येकी एका गोलसाठी 'असिस्ट' (गोल करण्यात मदत) केले. मोरोक्कोच्या तिसऱ्या गोलसाठीही डियाझने सुफियान रहीमीला मदत केली.



सामन्याच्या शेवटी चाहत्यांना अभिवादन करताना कॅनडाचे खेळाडू

या सामन्यात कॅनडाचा संघ हाच "सरस संघ" होता; मात्र, दुसऱ्या सत्रात मोरोक्कोने केलेल्या तीन गोलना त्यांना रोखता आले नाही किंवा त्यावर उत्तर शोधता आले नाही, असे प्रशिक्षक जेसी मार्श यांनी सांगितले. या विश्वचषकात कॅनडाने अंतिम-१६ फेरीपर्यंत मजल मारून व यादरम्यान अनेक ऐतिहासिक कामगिरींची नोंद करून अपेक्षांपेक्षा अधिक चांगली कामगिरी केली, असे म्हणता येईल. आता मोरोक्कोचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना ९ जुलै रोजी बॉस्टन येथे फ्रान्सशी होईल; फ्रान्सने शनिवारी पॅराग्वेचा १-० असा पराभव केला होता. जगातील अव्वल १० संघांपैकी एकावर त्यांनी पहिल्या सत्रात वर्चस्व गाजवले. पण आपल्या वर्चस्वाला सार्थ ठरवण्यासाठी फक्त एका गोलची कमतरता होती. पण कॅनेडियन संघाला ती संधी काही सापडली नाही, कारण मोरोक्कोच्या चिवट बचावफळीने त्यांचा हल्ला निष्प्रभ ठरवला. कॅनडानेही मोरोक्कोला संधी मिळू दिली नाही, पण त्यांनी मिळालेल्या संधींचे सोने केले. इतिहासात पहिल्यांदाच बाद फेरीत धडक मारल्याचा आणि 'अंतिम-३२' मध्ये दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून बाद फेरीतील पहिला सामना जिंकल्याचा कॅनडाला नक्कीच अभिमान वाटेल. ◂ (वृत्तसंस्था)

**आजचे उप-उपांत्यपूर्व सामने**

**पोर्तुगल वि. स्पेन**
**वेळ :** रात्री १२.३० वाजतापासून
**स्थळ :** डॅलस स्टेडियम, डॅलस

**अमेरिका वि. बेल्जियम**
**वेळ :** पहाटे ५.३० वाजतापासून
**स्थळ :** सिएटल स्टेडियम, सिएटल

# स्पेनसमोर पोर्तुगालचे आव्हान

**न्यूयॉर्क, ५ जुलै**

स्पेन आणि पोर्तुगाल यांच्यातील आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील सर्वात तीव्र प्रतिस्पर्धेची पुनरावृत्ती सोमवारी होणार आहे. हे दोन्ही प्रतिस्पर्धी संघ विश्वचषक स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीतील एका मोठ्या सामन्यात आमने-सामने येतील. या सामन्यात स्पर्धेतील एक प्रमुख दावेदार संघ लवकरच स्पर्धेतून बाहेर पडणार हे निश्चित आहे.

अंतिम-३२ फेरीच्या सामन्यात ऑस्ट्रियावर ३-० असा सहज विजय मिळवल्यामुळे प्रशिक्षक लुईस दे ला फुएंते यांच्या स्पेन संघाचा आत्मविश्वास वाढला आहे. स्पेन विजेतेपदाच्या प्रमुख दावेदारांपैकी एक आहे.

स्पेन संघाने चार सामन्यांमध्ये आठ गोल केले आहेत, ज्यात मिकेल ओयार्झाबालने चार गोलांचे योगदान दिले आहे. तसेच, बाद फेरीमध्ये एकही गोल न स्वीकारणारा हा एकमेव संघ आहे. गोलरक्षक उनाई सायमनने आता विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत ५१९ मिनिटे एकही गोल होऊ न देण्याचा विक्रम केला आहे.

स्पेनला पोर्तुगालच्या ब्रुनो फर्नांडिस, बर्नार्डो सिल्वा आणि



राफेल लिओ यांसारख्या आक्रमक खेळाडूंनाही रोखावे लागेल, तर लेफ्ट बॅक नुनो मेंडेस लॅमिन यामालची बचावात्मक कसोटी घेण्याची शक्यता आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# चंद्रिका, जयश्रीची दमदार सुरुवात

## १९ वर्षांखालील व २३ वर्षांखालील आशियाई मुष्टियुद्ध

**जकार्ता, ५ जुलै**

इंडोनेशियातील जकार्ता येथे सुरू झालेल्या १९ वर्षांखालील आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताने दमदार सुरुवात केली. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी 'जागतिक मुष्टियुद्ध फ्युचर्स चषक'मधील सुवर्णपदक विजेती चंद्रिका पुजारी



आणि रौप्यपदक विजेती जयश्रीने वर्चस्वपूर्ण विजय मिळविले.

प्राथमिक फेरीत खेळताना, चंद्रिकाने महिलांच्या ५१ किलो वजनी गटात मंगोलियाच्या लखाम त्सेंडबातारचा ५-० अशा एकमताने पराभव केला. त्यानंतर जयश्रीनेही तितकेच प्रभावी प्रदर्शन करत महिलांच्या ५४ किलो वजनी गटात चीन तैपेईच्या चेन निंग होंगविरुद्ध दुसऱ्या फेरीत 'रेफरी स्टॉप्ड कॉन्टेस्ट' द्वारे विजय मिळवून पुढील फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

भारतीय मुष्टियुद्ध महासंघाने १९ वर्षांखालील आणि २३ वर्षांखालील अशा दोन्ही गटांत एक मजबूत संघ उतरवला असून, प्रत्येक वयोगटात २० मुष्टियोद्धे सहभागी होत आहेत. आशियातील सर्वोत्तम खेळाडूंसमोर स्वतःची क्षमता तपासण्यासाठी ही स्पर्धा भारतीय खेळाडूंच्या पुढील पिढीसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरत आहे. अलीकडील यशाची मालिका कायम राखत आशियाई स्तरावर आपले वर्चस्व टिकवून ठेवण्याचा भारताचा प्रयत्न आहे. सोमवारी भारताची मोहीम पुढे चालू राहील. या २३ वर्षांखालील पुरुष गटातील चार खेळाडू रिंगमध्ये उतरतील. आशियाई विजेता विश्वनाथ सुरेश (५० किलो) उझबेकिस्तानच्या अमीरबेक इस्मोइलोव्हविरुद्ध लढतीने दिवसाची सुरुवात करेल; त्यानंतर गंगा (५५ किलो) मंगोलियाच्या अमगलनबातार बुलगनखूचा सामना करेल. त्यानंतर सागर जाखर (६० किलो) जपानच्या कोइची नाकायामाशी भिडेल. ◂ (वृत्तसंस्था)

# अमेरिका-बेल्जियम सामन्याच्या तिकिटांचे दर घसरले

**सिएटल :** सिएटलमधील फिफा २०२६ च्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यासाठी तिकिटाचा दर जवळपास ४,००० डॉलर्सपर्यंत पोहोचला होता, परंतु तो आता १,५४९ डॉलर्सपर्यंत घसरला आहे. अमेरिका विरुद्ध बेल्जियम या अत्यंत अपेक्षित 'अंतिम-१६' फेरीच्या सामन्याच्या तिकिटांचे दर ३० टक्क्यांहून अधिक प्रमाणात घसरले आणि त्यानंतर सायंकाळच्या सुमारास त्यात थोडी सुधारणा झाली. बोस्निया अँड हर्जेगोव्हिनावर २-० असा विजय मिळवून अमेरिकेने 'अंतिम-१६' मधील आपले स्थान निश्चित केल्यावर तो दर वाढून २,८३६ डॉलर्सवर गेला. मात्र, त्यानंतरच्या दिवसांत या किमान दरात सातत्याने घट झाली. दुपारी हा दर १,४२३ डॉलर्सपर्यंत खाली आला. सायंकाळी तो पुन्हा वाढून १,६३५ डॉलर्सवर पोहोचला. रविवारी मेक्सिको सिटीमध्ये होणाऱ्या मेक्सिको विरुद्ध इंग्लंड सामन्याचा किमान दर ३,५७४ डॉलर्स इतका आहे.



# बुमराहची दौऱ्यासाठी तयारी सुरू

**नवी दिल्ली, ५ जुलै**

भारताचा प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह अहमदाबादमधील सराव सत्रात लाल चेंडूने गोलंदाजी करताना दिसला; यावरून आगामी आव्हानात्मक दौऱ्यासाठी त्याची तयारी सुरू असल्याचे संकेत मिळतात.

वेगवान गोलंदाजीचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या बुमराहने रविवारी आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर तीव्र सरावाचे फोटो शेअर केले. यात तो लाल 'एसजी' चेंडूने गोलंदाजी करताना दिसत होता आणि गुजरातच्या स्थानिक संघातील त्याचे सहकारी हे दृश्य पाहत होते. आयपीएलनंतरच्या अल्प विश्रांतीनंतर, गत काही दिवसांपासून बुमराह गुजरात कॉलेजच्या मैदानावर चिंतन गजासारख्या स्थानिक सहकाऱ्यांसोबत सराव करत आहे.



आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी बुमराहला विश्रांती देण्यात आली आहे, परंतु १४ जुलैपासून बर्मिंगममध्ये सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेत तो खेळणार आहे. त्यानंतर कार्डिफ (१६ जुलै) आणि लॉर्ड्स (१९ जुलै) येथे सामने होणार आहेत. २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यानंतर पहिल्यांदाच बुमराह इंग्लंडमधील एकदिवसीय मालिकेत ५० षटकांच्या फॉरमॅटमध्ये खेळताना दिसणार आहे. त्यानंतर, कामाचा ताण व्यवस्थापित करण्याच्या कारणास्तव बुमराह एकदिवसीय सामन्यांना मुकला होता. जूनमध्ये अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव घरगुती कसोटी आणि तीन एकदिवसीय सामन्यांतूनही त्याला विश्रांती देण्यात आली होती, परंतु सप्टेंबरमध्ये जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या टी-२० क्रिकेट सामन्यांमध्ये तो सहभागी होणार आहे. १५ ते २७ ऑगस्ट दरम्यान श्रीलंका दौऱ्यावर होणाऱ्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत बुमराहच्या सेवेची भारताला अत्यंत गरज भासणार आहे. ◂ (वृत्तसंस्था)




# नॅट सायव्हर-ब्रंटची दमदार फलंदाजी

**लंडन, ५ जुलै**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत लॉर्ड्स् मैदानावर खेळल्या जात असलेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंतिम सामन्यात कर्णधार नॅट सायव्हर-ब्रंटने केलेल्या दमदार फलंदाजीच्या बळावर यजमान इंग्लंड संघाने शेवटचे वृत्त आले, तोपर्यंत १५ षटकांत ४ बाद १०५ धावा काढल्या होत्या, त्यावेळी ब्रंट नाबाद ३७ धावांवर, तर फ्रेया केम्प नाबाद २२ धावांवर खेळत होती. नॅट सायव्हर ब्रंटने ३८ चेंडूंत ३ चौकारांच्या मदतीने नाबाद ३७ धावांची खेळी केली, तर फ्रेयाने १३ चेंडूंत ३ चौकारांसह नाबाद २२ धावांची खेळी केली ह होती.

सहा वेळच्या विश्वविजेत्या ऑस्ट्रेलिया संघाची कर्णधार सोफी मोलिनेक्सने नाणेफेक जिंकून नॅट सायव्हर-ब्रंटच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवीत ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनी जबरदस्त कामगिरी करीत इंग्लंडला प्रारंभीच दोन



जबरदस्त हादरे दिले. लुसी हॅमिल्टनने ॲमी जोन्स (६) व सदरलँडने डॅनी व्याट-हॉजला (८) लवकरच तंबूत परत पाठविले. त्यामुळे इंग्लंडने ४.५ षटकांत ३२ धावांत दोन मोहरे गमावले. मात्र त्यानंतर नॅट सायव्हर-ब्रंटने ॲलिस कॅप्सीच्या साथीने संघाची पडझड थांबविली, मात्र सोफी मोलिनेक्सने ॲलिस कॅप्सचा त्रिफळा उडविला. कॅप्सीने २० चेंडूंत २ चौकार व एका षटकारसह २३ धावांची भर घातली व तिसऱ्या गड्यासाठी ३५ धावांची भागीदारी केली. पुढे ब्रंटच्या मदतीला आलेल्या हिदर नाईटला (२) किम गार्थने पायचित केले. त्यामुळे इंग्लंडची १०.५ षटकांत ४ बाद ७० धावा अशी अवस्था झाली. मात्र नॅट सायव्हर-ब्रंटने एक टोक सांभाळीत फ्रेया केम्पच्या मदतीने संघाला शंभर धावांचा टप्पा गाठून दिला. ◂ (वृत्तसंस्था)

**जय शाह यांच्याकडून अभूतपूर्व यशाचे कौतुक**

**इंग्लंड व ऑस्ट्रेलिया यांच्यातील अत्यंत चुरशीच्या अंतिम सामन्यापूर्वी, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष जय शाह यांनी चालू असलेल्या महिला टी-२० विश्वचषकाला 'विक्रम मोडणारे यश' असल्याचे म्हटले आहे. प्रत्यक्ष मैदानावर उपस्थित राहणाऱ्या प्रेक्षकांच्या संख्येच्या आणि टीव्ही व डिजिटल माध्यमांवरील प्रेक्षकसंख्येच्या बाबतीत ही स्पर्धा आतापर्यंतची सर्वात मोठी आवृत्ती ठरली आहे, असे त्यांनी नमूद केले.**

# 'भारत अ' संघाचा मालिका विजय

## गुरनूर ब्रारची भेदक गोलंदाजी ; श्रीलंकेचा 'अ' वर १० गड्यांनी मात

**गॅले, ५ जुलै**

गुरनूर ब्रारने 'श्रीलंका अ' संघाच्या फलंदाजीला खिंडार पाडत आपली वाढती प्रतिष्ठा अधिक उंचावली. त्याच्या या कामगिरीमुळे 'भारत अ' संघासमोर विजयासाठी केवळ ३३ धावांचे सोपे लक्ष्य उभे राहिले व ते त्यांनी सहज गाठत गॅले येथे झालेली दोन सामन्यांची अनधिकृत कसोटी मालिका १-० अशी जिंकली. पहिल्या डावात चार बळी घेतल्यानंतर गुरनूर ब्रारने दुसऱ्या डावातही सहा बळी टिपलेत. त्यामुळे १७७ धावांच्या पिछाडीवर असलेला 'श्रीलंका अ'चा संघ दुसऱ्या डावात २०९ धावांत गारद झाला. १४५ धावांत १० बळी ही गुरनूर ब्रारच्या अल्पशा प्रथम श्रेणी कारकिर्दीतील आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी ठरली.




दिवसाची सुरुवात 'भारत अ'च्या पहिल्या डावातील ८ बाद ५४१ अशा धावसंख्येने झाली. बी. साई सुदर्शनची १६८ धावांची खेळी आणि देवदत्त पडिक्कल, ध्रुव जुरेल व सारांश जैन यांची अर्धशतके यात समाविष्ट होती.

सारांश, यश ठाकूरसोबत फलंदाजी करत होता. त्यानंतर लवकरच यश ठाकूर हा डावखुरा फिरकीपटू केशरा नुवान्थाचा पाचवा बळी ठरला आणि डाव संपला; तिसऱ्या दिवशी दुखापतीमुळे निवृत्त झालेला ऋतुराज गायकवाड फलंदाजीसाठी पुन्हा मैदानात उतरला नाही.

# मॅडिसन कीजचे 'सेंटर कोर्ट'वर खेळण्याचे स्वप्न पूर्ण

**लंडन, ५ जुलै**

प्रतिष्ठेच्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेत अमेरिकेच्या मॅडिसन कीजने आपल्याच सहकारी खेळाडू अमांडा अनिसिमोव्हाविरुद्ध ३-६, ६-२, ६-३ असा विजय मिळवत स्पर्धेची चौथी फेरी गाठली. हा विजय नोंदविताच मॅडिसनने आनंद व्यक्त केला, कारण हा सामना टेनिसमधील अत्यंत प्रतिष्ठित अशा 'सेंटर कोर्ट'वर खेळला गेलेला तिचा पहिलाच सामना होता.

२६-व्या मानांकित कीजने यापूर्वी विम्बल्डनमध्ये ११ वेळा सहभाग घेतला होता, पण या खेळातील सर्वात प्रसिद्ध अशा या कोर्टवर तिला कधीच खेळण्याची संधी मिळाली नव्हती.

मात्र, तिची ही प्रतीक्षा सार्थ ठरली. विम्बल्डनमधील आपल्या सर्वोत्तम कामगिरीची बरोबरी करण्याच्या उद्देशाने मॅडिसन कीज सोमवारी झेक प्रजासत्ताकच्या



नवव्या मानांकित लिंडा नोस्कोव्हाचा सामना करेल.

सेंटर कोर्टवर खेळणे, हे अविश्वसनीय आहे. हे माझ्या पूर्ण करायच्या इच्छांच्या यादीत होते व अखेरीस ती गोष्ट माझ्या यादीतून पूर्ण करता आली, याचा मला आनंद आहे, असे ३१ वर्षीय माजी ऑस्ट्रेलियन ओपन विजेती मॅडिसन कीज म्हणाली. ◂ (वृत्तसंस्था)

**अलेक्झांड्रा इलाकडून गतविजेत्या इगा स्वियातेकचा पराभव**

गतविजेती पोलंडची इगा स्वियातेक हिच्यावर ७-६(९), ६-२ असा शानदार विजय मिळवून, फिलिपिन्सच्या २१ वर्षीय अलेक्झांड्रा इलाने आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरीची मालिका चौथ्या फेरीपर्यंत वाढवली.



विम्बल्डन २०२६ मधील आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठा विजय मिळवल्यानंतर इला आनंदाश्रू ढाळत गुडघ्यावर बसली. तिच्या या भावूक क्षणाने 'सेंटर कोर्ट'वरील प्रेक्षकांना उभे राहून दाद देण्यास भाग पाडले. जागतिक क्रमवारीत ३२ व्या स्थानावर असलेल्या इलाला त्या क्षणाच्या भावनेने इतके भारावून टाकले. आता चौथ्या फेरीत तिचा सामना १३ व्या मानांकित आणि माजी उपविजेत्या जास्मिन पाओलिनीशी होणार आहे; 'ग्रँड स्लॅम' स्पर्धेच्या दुसऱ्या आठवड्यात तिची ही पहिलीच वेळ असेल.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### बार्शीतील दुय्यम कारागृह झाले कायमचे बंद

**बार्शी, दि.५ जुलै -**

शासन निर्णयानुसार रविवार दि. ५ जुलै रोजी सकाळी बार्शी दुय्यम कारागृहातील सर्व ५१ बंदीजनांना सुरक्षितपणे कळंबा कारागृह, कोल्हापूर येथे स्थलांतरित करण्यात आले. त्यानंतर बार्शी दुय्यम कारागृह अधिकृतरीत्या कायमस्वरुपी बंद केले आहे. राज्यातील एकूण ११६ दुय्यम कारागृहांपैकी केवळ ३६ कार्यरत होती, तर ८० कारागृहे यापूर्वीच बंद होती. आधुनिक कारागृह व्यवस्था, वाढलेले सुरक्षा निकष आणि जिल्हा व उपकारागृहांची उपलब्धता लक्षात घेऊन शासनाने जुनी व्यवस्था बंद केली आहे. बार्शीतील दुय्यम कारागृह न्यायालयीन कामकाजासाठी आरोपींना अल्पकाळ ठेवणे, तात्पुरत्या कोठडीची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी होते. मात्र, बदलत्या प्रशासकीय गरजा आणि आधुनिक कारागृह व्यवस्थेत या कारागृहाची आवश्यकता कमी झाली होती. तहसीलदार एफ.आर. शेख बार्शी यांच्या आदेशानुसार कारागृहातील सर्व ५१ आरोपींना पोलीस बंदोबस्तात कळंबा कारागृहात रवाना केले. बार्शी दुय्यम कारागृहाचा प्रवास संपला असला, तरी अनेक अधिकारी, कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकांनी येथे बजावलेली कर्तव्यनिष्ठ सेवा कायम स्मरणात राहणार आहे.



### विमल कन्या प्रशाला, श्री शिवाजी मराठी विद्यालयात कृतज्ञता सोहळा

**सोलापूर, दि.५ जुलै -**

श्री गणपती शिक्षण प्रसारक संस्था, सोलापूर संचलित विमल कन्या प्रशाला व श्री शिवाजी मराठी विद्यालय येथे नुकताच कृतज्ञता सोहळा झाला. सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे समाजसेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. शिरीष दंतकाळे यांच्या सौजन्याने दोन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, शिष्यवृत्ती परीक्षा व स्पर्धा परीक्षेची मार्गदर्शक पुस्तके, तसेच वर्गांसाठी पंखे आदी शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव उज्वला ढमाळ होत्या. प्रमुख अतिथी म्हणून विमल कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक ईरण्णा गोब्बूर उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री शिवाजी मराठी विद्यालयाचे सहशिक्षक सुरेश पाटील यांनी केले. फलक लेखन सहशिक्षिका आयरे यांनी केले. आभार सहशिक्षक प्रकाश जाधव यांनी मानले. सहशिक्षिका दिपीका उपाध्ये आणि शिक्षकेतर कर्मचारी सागर शिंदे, नितिन येडवे, श्रीमंत खांडेकर, सहशिक्षक गुरुनाथ वमने, शिक्षकेत्तर कर्मचारी प्रभाकर कारंडे, मोठ्या संख्येने पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# चंद्रभागा वाळवंट स्वच्छतेसाठी यंदा विशेष मोहीम

## पालकमंत्री जयकुमार गोरे; 'उजनी'तून चंद्रभागा नदीपात्रात वारीच्या तीन दिवस अगोदर पाणी येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जुलै-**

आषाढी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर चंद्रभागा नदीपात्र व वाळवंटाची स्वच्छता करण्याची विशेष मोहीम प्रशासनाने हाती घेतली आहे. नदीपात्राच्या दोन्ही बाजूला असलेली झुडपे, राडारोडा व कचरा पूर्णपणे काढून सपाटीकरण करावे, नदीकाठाच्या दोन्ही बाजूंची स्वच्छता करावी. तसेच वारीपरी संपूर्ण वाळवंट स्वच्छ करण्याबरोबरच संपूर्ण यात्रा कालावधीत व त्यानंतरही वाळवंटात भाविकांची गर्दी असेपर्यंत स्वच्छता मोहीम सुरू ठेवावी, अशा सूचना ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री मंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

नदीपात्रात प्लास्टिक व इतर कचरा गोळा करण्यासाठी मोठ्या कचरा कुंड्यांची व्यवस्था करावी, तसेच वाळवंटाच्या सफाईसाठी स्वतंत्र ५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. वाळवंटाच्या प्रत्येक भागात पाच कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून वाळवंट कायम स्वच्छ राहील, याची दक्षता



घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. स्वच्छता कर्मचाऱ्यांना विविध भाग वाटून देण्यात आले असून, सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. सध्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून चंद्रभागा नदीपात्रातील वाळवंटाची स्वच्छता करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त सफाई कर्मचारीही या मोहिमेत सहभागी झाले आहेत. वारीपूर्वी वाळवंटाची झालेली स्वच्छता पाहून पालकमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.

तसेच लाखो भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. त्यावेळी ते चंद्रभागेत पवित्र स्नान करण्यासाठी येतात. स्वच्छ वाळवंट पाहून त्यांना आनंदाने स्नान करता येईल. तसेच आषाढी वारीसाठी उजनी धरणातून पाणी सोडण्याची कार्यवाही सुरू असून वारी पूर्वी तीन दिवस अगोदर चंद्रभागा नदी पात्रात पाणी पोहोचेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

वाळवंटात वारकरी भाविकांसाठी चेंजिंग रूम, हिरकणी कक्ष, तात्पुरती मुबलक शौचालये व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था मोठ्या प्रमाणात उपलब्ध करण्यात येणार आहे. वारकऱ्यांच्या सुविधेसाठी नवीन दर्शन मंडपाचे काम सुरू असून, यंदाच्या आषाढी वारीत येणाऱ्या भाविकांसाठी जनक महाराज अपशिंगेकर यांच्या खासगी मालकीच्या जागेत मंदिर समितीकडून नव्याने दर्शन रांगेसाठी शेडची उभारणी करण्यात आली आहे. पालकमंत्री श्री. गोरे यांनी या ठिकाणची पाहणी करून दर्शन रांगेतील भाविकांसाठी सुलभ शौचालय आदी आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात, अशा सूचना दिल्या. यावेळी आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उप विभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहआयुक्त नगरपालिका प्रशासन आशिष शेलार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, व्यवस्थापक प्रविणकुमार घम उपस्थित होते.

**आषाढीला ३० ते ३२ लाख भाविकांची शक्यता**

यंदाच्या संपूर्ण आषाढी वारी कालावधीत ३० ते ३२ लाख भाविक-वारकरी येण्याची शक्यता आहे. आषाढी यात्रा सोहळा सुखकर व निर्विघ्नपणे पार पाडावा, अशी प्रशासनाची भूमिका आहे. वारी कालावधीत वारकऱ्यांना रहदारीचा त्रास होऊ नये, यासाठी पंढरपूर शहरातील अतिक्रमणे काढण्यात प्रशासनाला यश आले असून, ही अतिक्रमणविरोधी मोहीम सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पंढरपूर शहर व परिसर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## भंडारकवठे सोसायटीच्या चेअरमनपदी प्रवीण बिराजदार

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ५ जुलै-**

भंडारकवठे येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन म्हणून प्रवीण बिराजदार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष मुकेश व्हनकोरे यांनी अध्यक्षपदाचा एक वर्षाचा कार्यकाळ संपताच राजीनामा दिला होता. यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदावर बिराजदार यांची निवड झाली.

सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत माजी सरपंच भीमाशंकर बबलेश्वर यांच्या गटाची सत्ता आल्यानंतर दरवर्षी सोसायटीचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदावर सर्वांना संधी देणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार पाचवे अध्यक्ष म्हणून बिराजदार यांना संधी दिली आहे. यावेळी माजी सरपंच भीमाशंकर बबलेश्वर, महादेव बगले, मावळते अध्यक्ष मुकेश व्हनकोरे, महादेव



पॅनल प्रमुख भीमाशंकर बबलेश्वर आणि सर्व संचालकांनी मिळून माझ्यावर विश्वास दाखवला. माझ्या अध्यक्षपदाच्या काळात शेतकरी हिताचे निर्णय घेत सर्व संचालकांना विश्वासात घेऊन कारभार करणार आहे.

**- प्रवीण बिराजदार,**
नूतन अध्यक्ष, सोसायटी भंडारकवठे

हत्ताळे, इरप्पा कोरे, आमसिध्द बुधाळे, कमलाबाई मुक्काणे, बाळासाहेब मैंदर्गी, राजेश्री पाटील, आमसिध्द घोडके, पुत्रप्पा बबलेश्वर शिरीष शहा आदी संचालकांसह हणमंत पुजारी, मायप्पा जंगलगी, बसवराज मुक्काणे, यतीन शहा, अशोक मुक्काणे, आमसिध्द मुक्काणे, सुरेश धुरपे, गोपाल बनपूरे, सोमनाथ भरले, विनायक कमळे, सोमनिंग कमळे, राजकुमार बिजर्गी, महादेव लायाणे, अनिल पाटील, धरेप्पा तेली उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी दयानंद सुरवसे, सुनील माने व सहाय्यक म्हणून सचिव सिद्धाराम बिराजदार यांनी काम पाहिले.



## सुशिला मनगिरे यांच्या स्मरणार्थ मोक्षरथचे लोकार्पण; बार्शीत समाज सेवेचा आदर्श

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ जुलै-**

सुशिला मनगिरे यांच्या स्मरणार्थ सर्व समाजासाठी उपलब्ध करुन दिलेल्या आधुनिक शववाहिकेचे लोकार्पण रविवारी न्यू हायस्कूल प्रांगण, लोखंड गल्ली, बार्शी येथे झाले.

श्री.ष.ब्र. श्री १०८ श्रीगुरु राचंलिंग शिवाचार्य परंडकर महाराज (परंडकर मठ संस्थान, बार्शी) तसेच श्री.ष.ब्र. श्री १०८ श्रीगुरु प्रभुदेव शिवाचार्य माढेकर महाराज (माढेकर मठ संस्थान, माढा) यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते शववाहिकेचे पूजन करुन लोकार्पण केले. बार्शीच्या नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, विजय मनगिरे, प्रकाश मनगिरे, गटनेते नागेश अक्कलकोटे, बाळासाहेब आडके, विलास रेणके, प्रशांत कथले, गिरीश बरीदे, नागजी लामतुरे, आण्णा पेठकर, अमित आपटे, नितीन देशमुख, मल्लिनाथ गाढवे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

शववाहिकेसाठी 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर केवळ रुपये ७०० इतके शुल्क आकारणार आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही कुटुंबावर अतिरिक्त भार पडू नये आणि सन्मानपूर्वक अंत्यविधीसाठी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, हा उद्देश रावसाहेब मनगिरे यांनी सांगितले. उपक्रमाचे आयोजन रावसाहेब मनगिरे, अरुणा मनगिरे व समस्त मनगिरे परिवार तर्फे करण्यात आले. यावेळी श्रीगुरु राचंलिंग शिवाचार्य परंडकर महाराज यांनी मनगिरे परिवाराच्या या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले. मान्यवरांच्या हस्ते बार्शी येथील अखिल लिंगायत युवक बहुउद्देशीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडे ही शववाहिका देखभाल करण्यासाठी सुपूर्द करण्यात आली.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात वसंतराव नाईक जयंतीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ५ जुलै-**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातर्फे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी केली. यावेळी मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी वसंतराव नाईक यांच्या धोरणांमुळे महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळाल्याचे सांगितले.

कार्यक्रमास प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. नाईक यांच्या काळात औद्योगिक विकासालाही मोठी चालना मिळाली. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक न्याय आणि दुर्बल घटकांच्या कल्याणासाठीही त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतल्याचेही मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले. प्रास्ताविक प्राचार्य एस. आर. लोखंडे यांनी केले. आभार कार्यक्रम अधिकारी प्रा. राजशेखर पवार यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. हर्षदा गायकवाड, जनाबाई चौधरी, शितल फुटाणे उपस्थित होते.

**कृषी दिनानिमित्त शेतकऱ्यांचा सत्कार**

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जन्मदिन कृषिदिनानिमित्त किणी गावातील शेतकरी दयानंद घिवारे, विजयकुमार घिवारे व उल्हास घिवारे यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाला.

## 'उजनी'त मध्यस्थी करणाऱ्या चुलत्याचा खून

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. ५ जुलै-**

किरकोळ मस्करी आणि सायकलचा धक्का लागल्याच्या वादातून उजनी (मा) ता.माढा येथे एकाचा दगड मारून खून करण्यात आला. ही घटना दि.३ जुलै रोजी उजनी (मा) ता.माढा येथे रा.१० वाजण्याच्या सुमारास घडली.

संदीप निकम (वय ४८) रा.उजनी (मा) ता. माढा असे मयताचे नाव आहे. भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करायला गेले असता त्यांच्यावर हा जीवघेणा हल्ला झाला. याप्रकरणी रुपेश बाबासाहेब लोकरे व प्रवीण बाबासाहेब लोकरे दोघे रा.उजनी (मा) ता.माढा या दोन सख्ख्या भावांवर कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात मयताचा पुतण्या समाधान निकम यांच्या फिर्यादीवरुन खूनाचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीचे वडिल हनुमंत निकम व संशयित आरोपीचे वडिल बाबासाहेब लोकरे हे दोघे मित्र आहेत. त्यांची कोणत्या ना कोणत्या कारणावरून मस्करी चालू असते. दि. २ जुलै रोजीही अशीच मस्करी करत ते थांबले होते. त्यावेळी हनुमंत निकम यांच्या सायकलचा धक्का लागून बाबासाहेब लोकरे हे खाली पडले व त्यांच्या गुढग्याला मार लागला. याच कारणावरून फिर्यादी निकम आणि लोकरे कुटुंबात वाद झाला होता. याच वादाचा राग मनात धरून ३ जुलै रोजी रात्री १० वाजता आरोपी भावांनी फिर्यादीला छत्रपती शिवाजी महाराज चौकात गाठून बेदम मारहाण केली. यावेळी फिर्यादीचे चुलते संदीप निकम हे भांडण सोडवण्यासाठी मध्ये पडले. याचा राग आल्याने आरोपी रुपेश लोकरेने मोठा दगड संदीप निकम यांच्या छातीवर जोरात मारला आणि दोन्ही संशयित आरोपी त्यांच्या अंगावर जाऊन बसले.

या हल्ल्यात संदीप निकम हे जागीच बेशुद्ध पडले. त्यांना तातडीने कुर्डुवाडी येथील रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मयत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक अतुल मोहिते, सहा.पो. निरीक्षक अरविंद गटकूळ यांच्यासह पो. शि. सोलनकर, पो.ह मोरे, पो.ह.गोरे, पो.ह.हराळे ,पो.ह गोरे व पथकाने घटना स्थळाला भेट दिली. तपास चक्र फिरवत अवघ्या दोन तासात रा.१२ वाजण्याच्या सुमारास जवळच असलेल्या उसाच्या शेतातून लपलेल्या दोन्ही आरोपी भावांना अटक केली. दोघांना माढा न्यायालयाने ७ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. तपास सहा पो.नि. अरविंद गटकुळ हे करत आहेत.

## ३१ जुलैपूर्वी प्रधानमंत्री पीक विमासाठी नोंदणी करा; जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी भोसले

**गैरप्रकार करणाऱ्या शेतकऱ्यांचे लाभ होणार बंद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जुलै-**

शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तींमुळे शेतीमालाच्या उत्पादनात होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, या उद्देशाने राज्य शासनाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. ३१ जुलैपूर्वी शेतकऱ्यांनी नोंदणी करावी. यंदाच्या पिक विमा योजनेत गैरप्रकार करणाऱ्या शेतकऱ्यांचे कृषी विभागाकडून मिळणारे लाभ बंद केले जाणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

विविध योजनांसाठी बळीराजाला डिजिटल सर्वेक्षण बंधनकारक केल्याचेही सांगितले.

या बाबतचा सुधारित शासन निर्णय जारी केला आहे. त्यानुसार अधिसूचित महसूल मंडलांमध्ये अधिसूचित पिकाचे चालू वर्षातील सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास संबंधित शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाईचा लाभ मिळणार आहे. खरीपासाठी भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस आणि कांदा या चौदा पिकांचा योजनेत समावेश आहे.

या योजनेत सहभागासाठी अन्नधान्य, कडधान्य व तेलबिया पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या केवळ दोन टक्के विमा हप्ता भरावा लागणार आहे. कापूस आणि कांदा या व्यापारी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या पाच टक्के हप्ता भरावा लागेल. योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक बंधनकारक आहे. शेतकऱ्यांकडे जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक तसेच आधारशी संलग्न बँक खाते आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी पिकाचा डिजिटल क्रॉप सर्वे करणे अनिवार्य आहे. डिजिटल क्रॉप सर्वेत नोंदविलेल्या पिकाची माहिती आणि विम्यासाठी अर्जात नमूद पिकात तफावत आढळल्यास डिजिटल क्रॉप सर्वेतील नोंद अंतिम मानली जाईल. तफावत सिद्ध झाल्यास संबंधित विमा अर्ज रद्द होईल. शासनाने पारदर्शकता वाढ आणि शासकीय योजनांचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी डिजिटल पीक सर्वेक्षण बंधनकारक केले आहे. पीकविमा, पीएम-किसान, नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई तसेच इतर कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळेत डिजिटल नोंदणी करणे बंधनकारक असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## निधन वृत्त...



### सुमन मोरे

**टेंभुर्णी, दि. ५ जुलै-**

कन्हेरगाव (ता. माढा) येथील सुमन लिंबाजी मोरे (वय ७२) यांचे आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, चार मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्या कन्हेरगाव येथील श्री गणेश सहकारी पाणीपुरवठा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष लिंबाजी मोरे यांच्या पत्नी होत. टेंभुर्णीच्या सरपंच सुरजा बोबडे, भाजप महिला आघाडीच्या माजी जिल्हाध्यक्षा धनश्री खटके-पाटील, तालुका कृषि अधिकारी देवराव चव्हाण यांच्या पत्नी शलाका चव्हाण तसेच कन्हेरगाव ग्रामपंचायतीचे माजी सदस्य प्रसाद मोरे यांच्या त्या मातोश्री होत.



### मलकारी सोनकडे

**सोलापूर, दि. ५ जुलै-**

होटगी (ता. दक्षिण सोलापूर) येथील धनगर समाजाचे पंच मलकारी बरगळी सोनकडे (वय ७१) यांचे अल्पशा आजाराने दि. ५ जुलै रोजी निधन झाले. त्यांची अत्यंयात्रा दि. ६ जुलै रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरातून निघणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. होटगी गावचे तंटामुक्त अध्यक्ष मंगेश सोनकडे यांचे ते वडील होत.

# जीर्णोध्दार पूर्ण झालेल्या मंदिरांत मूर्तींची प्राणप्रतिष्ठा

## दर्शनासाठी सर्व मंदिरे केली खुली; गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ जुलै-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्यांतर्गत जीर्णोद्धार व संवर्धनाची कामे पूर्ण झालेल्या श्री व्यंकटेश मंदिर, श्री महालक्ष्मी मंदिर, श्री काशी अन्नपूर्णा मंदिर तसेच कचेरीजवळील श्री मारुती मंदिर येथील मूर्तींची प्राणप्रतिष्ठा दि. ४ व ५ जुलै रोजी उत्साहात झाली. त्यानंतर ही सर्व मंदिरे भाविकांच्या दर्शनासाठी खुली केली आहेत.

मंदिरांतील नित्योपचार पूर्ववत सुरू केल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते संकल्प सोडण्यात आला. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे तसेच ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर) उपस्थित होते. तसेच व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांच्या हस्ते सपत्नीक पूजा झाली. प्राणप्रतिष्ठेनंतर श्री व्यंकटेश, श्री महालक्ष्मी, श्री काशी अन्नपूर्णा तसेच श्री मारुती मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले केले. सर्व मंदिरांमध्ये पूर्वापार परंपरेनुसार नियमित नित्योपचार सुरू केले आहेत. यावेळी विभाग प्रमुख भिमाशंकर सारवाडकर, सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी तसेच पांडुरंग दशपुत्रे उपस्थित होते. या संवर्धनामुळे मंदिरांचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा अधिक भक्कम झाला असून भाविकांना अधिक पवित्र, सुरक्षित आणि प्रसन्न वातावरणात दर्शन घेण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

**मूळ वास्तुशिल्पीय, धार्मिक स्वरूपाचे जतन**

कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले की, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्यांतर्गत केलेल्या संवर्धन व जीर्णोद्धाराच्या कामांमुळे श्री व्यंकटेश मंदिर, श्री महालक्ष्मी मंदिर, श्री काशी अन्नपूर्णा मंदिर तसेच कचेरीजवळील श्री मारुती मंदिर यांचे मूळ वास्तुशिल्पीय आणि धार्मिक स्वरूप जतन करून पुनर्स्थापित केले आहे.



## महत्वाचे...



### जैनेस्को व सागर सिमेंटतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**सोलापूर, दि. ५ जुलै-**

जैन सिनिअर सिटीजन ऑर्गनायझेशन, सोलापूर (जैनेस्को), सागर सिमेंट आणि अशोक मेहता यांच्या संयुक्त विद्यमाने आज रावजी सखाराम हायस्कूल येथे गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटपाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमांतर्गत रावजी सखाराम प्राथमिक प्रशाला तसेच नरसिंह विद्यालय, कार्देहळी येथील विद्यार्थ्यांना वह्या, शालेय दप्तर आणि अन्य आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी जैनेस्कोचे अध्यक्ष सुभाष लोणावत, कार्याध्यक्ष केतन शहा, उपाध्यक्ष नंदकुमार कंगळे, माजी अध्यक्षा डॉ. सरिता कोठाडिया, जयश्री लोणावत, अर्हम युवा ग्रुपचे सदस्य आशिष छांजेड व अमोल संचेती, प्राचार्य भारत खाबे, प्राथमिक मुख्याध्यापिका कल्पना सर्वगोड, कार्देहळी येथील देशमुख उपस्थित होते.



### आस्था संस्थेला सावित्री रत्न पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. ५ जुलै-**

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आस्था सामाजिक संस्थेला 'सावित्री रत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. सावित्रीमाई फुले शिक्षण व बहुउद्देशीय संस्था आणि साप्ताहिक श्री संकेत यांच्या ११ व्या वर्धापनदिनानिमित्त जुळे सोलापूर येथील द्वारकाधीश मंदिरात झालेल्या कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप फेटा, शाल, सन्मानपत्र आणि ट्रॉफी असे होते. महादेव कोगनुरे, रामप्पा चिवडशेट्टी, अशोक भांजे, महादेव जंबगी आणि काशिनाथ भतगुणगी यांच्या उपस्थितीत सुहास छंचुरे व वेदांत तालिकोटी यांनी संस्थेच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. या गौरवाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी पुरस्कार स्वीकारणाऱ्यांचे अभिनंदन केले

# कांद्याला वाढीव दर : उत्पादकांना लाभ, बाजारपेठांना आधार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जुलै -**

▶▶ केंद्राकडून खरेदी दरात करण्यात आली १३ टक्क्यांची वाढ

▶▶ बफर साठ्यासाठी प्रतिक्विंटल १,८७५ ऐवजी २,१२५ रुपये

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून, बफर साठ्यासाठी कांद्याच्या खरेदी दरात १३ टक्क्यांची वाढ जाहीर केली आहे. यानुसार प्रतिक्विंटल खरेदी दर १,८७५ रुपयांवरून २,१२५ रुपये करण्यात आला आहे. नवे सुधारित दर तात्काळ लागू करण्यात आला असून, या निर्णयामुळे कांदा उत्पादकांना त्यांच्या मालाला अधिक चांगला मोबदला मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच बाजारातील दराला आधार मिळून भावातील अनिश्चितता कमी होण्यासही मदत होणार असल्याचे मानले जात आहे.

केंद्र सरकार दरवर्षी कांद्याच्या किमतींमध्ये होणारे चढ-उतार नियंत्रित करण्यासाठी बफर साठा उभारते. या साठ्यासाठी राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड) आणि राष्ट्रीय



सहकारी ग्राहक महासंघ (एनसीसीएफ) यांच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांकडून कांद्याची खरेदी केली जाते. यंदा खरेदी दरात वाढ करून सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या काही महिन्यांत बाजारात कांद्याचे दर अपेक्षेप्रमाणे वाढले नसल्याने अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते.

उत्पादन खर्च वाढत असताना बाजारभाव कमी असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. अशा परिस्थितीत सरकारी खरेदी दरात वाढ झाल्याने शेतकऱ्यांना काही प्रमाणात आर्थिक दिलासा मिळणार आहे. विशेषतः दर्जेदार कांदा साठवून ठेवलेल्या उत्पादकांना या निर्णयाचा अधिक फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यंदा देशात कांद्याचे उत्पादन चांगले झाले आहे. बाजारात पुरवठा मुबलक असला तरी सरकारी खरेदीमुळे अतिरिक्त साठ्याला बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. परिणामी खुल्या बाजारातील भावालाही आधार मिळण्याची शक्यता आहे.

कृषी क्षेत्रातील जाणकारांच्या मते, सरकारी खरेदीचा दर वाढल्याने व्यापाऱ्यांनाही त्यानुसार खरेदी दर वाढविण्याचा दबाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे आगामी काही आठवड्यांत कांद्याच्या बाजारभावातही सुधारणा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. निर्यात, बाजारातील आवक आणि मागणी यावर पुढील दरवाढ अवलंबून राहणार असली, तरी केंद्राच्या या निर्णयामुळे बाजारात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे कांदा उत्पादकांना मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारी खरेदीला गती मिळण्याबरोबरच खुल्या बाजारातील दरांनाही आधार मिळेल, अशी अपेक्षा कृषी क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

**ठळक बाबी**

- बफर साठ्यासाठीचा नवीन खरेदी दर २,१२५ प्रति क्विंटल लागू.
- वाढीव दरामुळे सरकारी खरेदीत अधिक फायदा मिळण्याची शक्यता.
- नाफेड आणि एनसीसीएफच्या खरेदी केंद्रांबाबत स्थानिक कृषी विभाग किंवा बाजार समितीकडून माहिती घ्यावी.
- बाजारभाव आणि सरकारी खरेदी दराची तुलना करून विक्रीचा निर्णय घेतल्यास अधिक लाभ मिळू शकतो.




### ड्रेनेज लाईन दुरुस्ती; पावसाळ्यात गैरसोय

**ड्रेनेज लाईन दुरुस्तीच्या कामासाठी एस.टी.स्टॅन्ड मुख्य प्रवेशद्वार ते हॉटेल अॅम्बेसिडर हा रस्ता बंद करण्यात आला. ऐन पावसाळ्यात हा मुख्य रस्ता बंद असल्याने वाहनधारकांची मोठी गैरसोय होत आहे.**

## शौचालय अनुदान घोटाळा प्रकरणी

# विस्तार अधिकाऱ्यासह चार जणांची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जुलै-**

वैयक्तिक शौचालय बांधकाम अनुदान घोटाळा प्रकरणी तत्कालीन ग्राम विस्तार अधिकारी आर.एम. कमळे यांचेसहित अधिकारी व्ही.आर. पाटील, एस.जी. पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी के.एम. शेख या चार जणांनी २ लाख ६७ हजार ५०० रुपये इतक्या रकमेचा कथित अपहार केल्याप्रकरणी सोलापूर येथील विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

याची हकीकत अशी की, सन १९९६-९७ साली राज्य शासनाची ग्राम पंचायत स्तरावर वैयक्तिक शौचालय बांधकाम योजना सुरू होती. त्यासाठी प्रत्येकी एका शौचाल्यास रु. ४,०००/- खर्चापैकी रु. २,५००/- इतके अनुदान होते. मौजे कुरुल येथील रहिवासी आर. एन. गुरव, यांनी दि. २८/१२/१९९९ रोजी लोकायुक्त, मुंबई यांच्याकडे तक्रार केली की, शौचालय बांधकाम अनुदानात गैरप्रकार होत असून, त्यांचे नावे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, यांनी रु. २,५००/- इतकी अनुदानाची रक्कम अनाधिकाराने मिळविलेबाबत सदर कार्यालयाने त्या तक्रारीची दखल घेऊन, सदर प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे चौकशी करून कारवाई करण्यासाठी पाठविण्यात आले होते.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील सहा. पोलीस आयुक्त यांनी चौकशी केली, चौकशी अंती त्यांनी प्रकरणात संबंधित व्यक्तींविरुद्ध दि.१५/०२/२००१ रोजी गुन्हा दाखल केला. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुढील तपास करून दि.१७/०८/२००७ रोजी एकूण आठ आरोपी विरुध्द आरोपपत्र दाखल केले होते. सदर खटल्याची सुनावणी लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखालील सोलापूर येथील विशेष न्यायालयात झाली. सदरचा खटला चालू असताना एकूण चार आरोपी मयत झाले. उर्वरित वरील चार आरोपी विरुध्द खटला चालू राहिला. त्यामध्ये सरकार पक्षाने एकूण ३१ साक्षीदार तपासले.

अंतिम सुनावणीवेळी सरकार पक्षाने असा युक्तिवाद मांडला की, शौचालय बांधकाम अनुदानामध्ये अपहार केल्याबद्दल आरोपीविरुध्द भक्कम पुरावा आलेला आहे. त्यामुळे त्यांना दोषी धरून शिक्षा देण्यात यावी, असा युक्तिवाद सरकारी वकील अॅड.डी.एम. पवार, अॅड.पी.एस. जन्नू यांनी केला. आरोपीतर्फे युक्तिवाद करताना अॅड. शशि कुलकर्णी यांनी सांगितले की, आरोपी ग्रामविस्तार अधिकारी आर.एम. कमळे यांनी सदर प्रकरणात फक्त त्यांचेकडे सोपवलेल्या तक्रारीची चौकशी अधिकारी म्हणून काम केले आहे व त्याप्रमाणे त्यांनी चौकशी करून योग्य अहवाल प्रामाणिकपणे दिलेला आहे, त्यामुळे त्यांचा या प्रकरणात, तथाकथित अपहाराचा, कोणताही संबंध येत नाही, कोर्टासमोर कोणताही योग्य व आवश्यक पुरावा आला नाही, आरोपी विरुध्दचा आरोप कोणत्याही प्रकारे सिध्द होत नाही. तसेच इतर आरोपी तर्फे सुध्दा वरीलप्रमाणेच युक्तिवाद मांडण्यात आला.

त्यावर न्यायालयाने प्रकरणात कोर्टासमोर योग्य व आवश्यक पुरावा आला नाही, आरोपी विरुध्दचा आरोप सिध्द होत नाही, असे मत नोंदवून न्यायालयाने चारही आरोपींना निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश दिले. सदरकामी आरोपी ग्राम विस्तार अधिकारी आर.एम. कमळे यांचेतर्फे अॅड.शशि कुलकर्णी, अॅड.स्वप्निल सरवदे, अॅड.प्रणव उपाध्ये यांनी तर इतर आरोपीतर्फे अॅड.बाबासाहेब जाधव व अॅड.धानय्या कपाळे यांनी काम पाहिले. सरकार पक्षातर्फे अॅड.डी.एम. पवार, अॅड.पी.एस. जन्नू यांनी काम पाहिले.

# सोलापूरच्या श्रेयाची अवकाशयात्री म्हणून दमदार कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.५ जुलै-**

आकाशाला गवसणी घालण्याची स्वप्ने पाहणाऱ्यांसाठी कोणतीही सीमा अशक्य नसते, याची प्रचिती सोलापूरच्या श्रेया जयकुमार माने हिने आपल्या कर्तृत्वातून दिली आहे. गुजरातमधील धोलावीरा येथे आका स्पेस संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेले लुनार अनलॉग मिशन यशस्वीपणे पूर्ण करून श्रेयाने नवोदित अवकाशयात्री म्हणून आपल्या कारकिर्दीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून, संपूर्ण जिल्ह्याचा गौरव वाढला आहे.

चंद्रावरील वास्तव्यासारख्या वातावरणाची पृथ्वीवर निर्मिती करून भविष्यातील मानवी चंद्र मोहिमांसाठी आवश्यक प्रशिक्षण देणाऱ्या या अत्याधुनिक मोहिमेत श्रेयाने क्रयु सायकॉलॉजिस्ट ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. मोहिमेदरम्यान तिने सहकारी सदस्यांच्या मानसिक आरोग्याचे मूल्यमापन, तणाव व्यवस्थापन, संघभावना वृद्धिंगत करणे, नेतृत्व विकास आणि संकटसमयी योग्य निर्णय घेण्यासाठी आवश्यक मानसशास्त्रीय मार्गदर्शन केले.



ही मोहीम पृथ्वीवरील प्रतिकूल, एकाकी आणि मर्यादित संसाधनांच्या परिस्थितीत चंद्रावरील वास्तव्यासारखा अनुभव देण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. या मोहिमेत सहभागी सदस्यांनी एत (ऍीरींशहळर्लीश्री लींर्ळींळू) ड्ळीश्रींळेप, हॅबिटॅट ऑपरेशन्स, वैज्ञानिक संशोधन, मिशन नियोजन, संसाधन व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. या प्रशिक्षणामुळे सहभागींच्या तांत्रिक, वैज्ञानिक, नेतृत्व, निर्णयक्षमता आणि संघभावना या गुणांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, भविष्यातील अंतराळ मोहिमांसाठी त्यांना अधिक सक्षम बनविण्यात ही मोहीम महत्त्वाची ठरली.

या मोहिमेचे नेतृत्व मिशन कमांडर कीर्ती विप्पर्थी यांनी केले. गीतांजली राजपूत यांनी एव्हिए लीड , श्रेया जयकुमार माने यांनी क्र्यू सायकॉलॉजिस्ट, तर प्रियांदर्शिनी अय्यनार हिने मेडिकल ऑफिसर म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली.

श्रेया जयकुमार माने ही माजी आ. ब्रह्मदेव माने यांची नात तर सोलापूर मनपाचे नगरसेवक जयकुमार माने व प्रिया जयकुमार माने यांची कन्या असून, माजी आमदार दिलीप माने यांची पुतणी आहे.

अवकाश संशोधनासारख्या अत्यंत आव्हानात्मक क्षेत्रात तिने मिळविलेल्या या यशामुळे तिचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. सोलापूरकरांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिची ही कामगिरी राज्यातील तरुणाईसाठी प्रेरणादायी ठरत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि अंतराळ संशोधन क्षेत्रात मोठी स्वप्ने पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी श्रेयाने एक नवा आदर्श निर्माण केला असून, भविष्यात भारताच्या अंतराळ मोहिमांमध्ये तिचे योगदान निश्चितच मोलाचे ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## बनावट दिव्यांग प्रमाणपत्राद्वारे मिळविली शासकीय नोकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जुलै-**

बनावट दिव्यांग प्रमाणपत्राद्वारे शासकीय नोकरी मिळवून फसवणूक केल्याप्रकरणी अहिल्यानगर येथील एका तरुणाविरुध्द सोलापुरातील सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राजेश भाऊसाहेब जाधव (रा.नळेगाव, अहिल्यानगर) असे त्याचे नाव आहे. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयचे अधिष्ठाता डॉ.ऋत्विक जयकर यांनी याबाबत फिर्याद दाखल केली.

यातील आरोपीने जिल्हा शल्य चिकित्सक रुग्णालय अहिल्यानगर येथे आधार कार्डसह अर्ज सादर केला होता. चाचणी अंतर्गत अपात्र ठरले होते. त्यानंतर त्याने सोलापुरातील सिव्हील हॉस्पीटल येथे ऑनलाईन प्रक्रियेने अर्ज सादर करुन बनावट पत्ता असलेले बनावट आधार कार्ड जोडले. याद्वारे सोलापुरातील सिव्हील हॉस्पीटल येथून ४५ टक्के अपंगत्वाचे दिव्यांग प्रमाणपत्र बेकायदेशीर प्राप्त करुन पाटबंधारे विभाग अहिल्यानगर येथील कार्यालयात शासकीय नोकरी मिळविली, असे फिर्यादीत नमूद आहे.



# आसरा रेल्वे पूल तीन वर्ष रखडल्याने अनोखे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जुलै-**

शहरातील अत्यंत महत्त्वाच्या आसरा रेल्वे पूल रुंदीकरणाच्या कामाचे टेंडर निघून तीन वर्षे पूर्ण होऊनही प्रकल्प अद्याप अपूर्ण असल्याच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेडच्या वतीने अनोखे आंदोलन करण्यात आले. सोलापूर शहरातील सर्व लोकप्रतिनिधींचे मुखवटे परिधान करून रखडलेल्या कामाचा प्रतीकात्मक 'तिसरा वाढदिवस' साजरा करत केक कापून प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या निष्क्रियतेचा निषेध करण्यात आला.

या आंदोलनात संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्रचे माजी अध्यक्ष कदम जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, संपर्कप्रमुख छत्रगुण माने, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, शिरीष जगदाळे, अरविंद शेळके, शेखर भोसले, विक्रम वानकर, रमेश जाधव, गणेश बोरेगाव, विजय जावळे, संजय भोसले, राहुल मेरू, संकेत कुलकर्णी, विकास बचुटे, विश्वजीत गंभीरे, लक्ष्मण गंभीरे, विजय बिल्लेगुरु, फिरोज सय्यद, सतीश वावरे, इशरत नागोरे, गुरु हडपड, रमेश चव्हाण, सन्नी पाटू, प्रकाश डोंगरे, अनिता वाघमारे, आफ्रिन पटेल, नेताजी देशमुख, रमेश भंडारे, उद्योग कक्षाचे शहराध्यक्ष संतोष सुरवसे, विजय जावळे आदी सहभाग नोंदविले होते.

# नगरसेवक अनंत जाधव यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

▶▶ आ. विजयकुमार देशमुख यांची सदिच्छा भेट

▶▶ विविध मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ जुलै-**

भारतीय जनता पक्षाचे नेते, प्रभाग क्रमांक ४ चे कार्यकुशल नगरसेवक तथा मराठा समाजाचे नेते अनंत जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व एलसीडी रायटिंग टॅबलेटचे वाटप, वृक्षारोपण, अनाथ आश्रमातील बालकांना भोजन तसेच महिलांसाठी शासकीय योजनांच्या नोंदणी शिबिरासह विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.वाढदिवसानिमित्त



विद्यार्थ्यांना एलसीडी रायटिंग टॅबलेटचे मोफत वाटप करण्यात आले. माजी परिवहन सभापती गणेश जाधव यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण करण्यात आले. रक्तदान शिबिरात अनेक रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. अनाथ आश्रमातील बालकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली, महिलांसाठी महिला सन्मान योजनेच्या कार्ड नोंदणी शिबिराद्वारे विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या रक्तदान शिबिरास आमदार विजयकुमार देशमुख यांनी सदिच्छा भेट देत नगरसेवक अनंत जाधव यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

माजी आमदार दिलीप माने, भाजप शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, सभागृह नेते नरेंद्र काळे, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सामाजिक कार्यकर्ते सुधीर खरटमल, शहर सुधारणा समितीच्या सभापती स्वाती बडगु, मंडई व उद्यान समितीचे सभापती राजशेखर पाटील, जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे, नगरसेवक डॉ. किरण देशमुख, संजय कोळी, शिवानंद पाटील, राजकुमार पाटील, विनायक विटकर, दशरथ कसबे, प्रभाकर काशिद, दिलीप कोल्हे, तात्यासाहेब वाघमोडे, अजित गायकवाड, विनोद भोसले, जयकुमार माने, नागेश खरात, समाधान आवळे, दीपक जमादार, बिपीन धुम्मा, बिज्जू प्रधाने, जॉन फुलारे, श्रीकांत डांगे, राम जाधव, अॅड. योगेश पवार, प्रसाद लोंढे, पंकज काटकर, समर्थ बरडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी नगरसेवक अनंत जाधव यांचा सत्कार करुन पुढील कारकीर्दीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी भारतीय जनता पार्टी, धर्मवीर संभाजी तरुण मंडळाचे कार्यकर्ते, संभाजी राजे तालीम परिसरातील नागरिक, मित्रपरिवार उपस्थित होते. रक्तदान शिबिरासाठी श्री सिद्धेश्वर ब्लड बँकेचे सहकार्य लाभले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

## नळदुर्ग आठवडी बाजारात महिलांसाठी फिरते स्वच्छतागृह उपलब्ध



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ जुलै -**
नळदुर्ग नगरपालिकेने आठवडी बाजारात येणाऱ्या महिला भाजीपाला विक्रेते व व्यापाऱ्यांच्या सोईसाठी प्रथमच फिरते स्वच्छतागृह उपलब्ध करून दिले आहे.

व्यापाऱ्यांच्या म ागणीनंतर नगराध्यक्ष बसवराज धरणे व नगरपालिकेने याबाबत तातडीने कार्यवाही केली. आठवडी बाजार परिसरात स्वच्छतागृह नसल्याने म हिला व्यापाऱ्यांची मोठी गैरसोय होत होती.

या नव्या सुविधेमुळे महिला व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून शहर व्यापारी मंडळाने तसेच नागरिकांनी नळदुर्ग नगरपालिकेचे आभार म ानले आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### नवीन बस गाड्यांचे मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते पुजन

**परंडा, दि.५ जुलै -**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने परंडा बस डेपोमध्ये पाच नवीन बसगाड्या दाखल झाल्या. या बसगाड्यांचे पूजन भाजपा नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर आणि धाराशिव जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती भाऊसाहेब खरसडे यांच्या हस्ते करण्यात आले. नवीन बसगाड्यांमुळे तालुक्यातील ग्राम ीण भागातील नागरिक, विद्यार्थी आणि व्यापारी वर्गाला मोठा लाभ होणार आहे. यावेळी भाजपा पदाधिकारी, प्रवासी संघटनेचे प्रतिनिधी, परिवहन विभागाचे अधिकारी तसेच आगारातील चालक, वाहक आणि कर्मचारी उपस्थित होते.



### निलेगाव येथे २५ शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन बियाण्यांचे वाटप

**इटकळ, दि.५ जुलै -**
तुळजापूर तालुक्यातील निलेगाव येथे महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत जागृती शेतकरी गटातील २५ शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी आबासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात सहाय्यक कृषी अधिकारी राहुल मते यांनी शेतकऱ्यांना पेरणीचे नियोजन, बीजप्रक्रिया, उगवण क्षमता तपासणी तसेच सरी-वरंबा व बीबीएफ पद्धतीबाबत मार्गदर्शन केले. निवड झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याला २५ किलो सोयाबीन बियाण्यांची एक बॅग आणि २५० मिली जैविक संघाचे वाटप करण्यात आले.



### वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना पुस्तक व खाऊचे वाटप

**धाराशिव, दि.५ जुलै -**
स्वराज्य पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश गवळी यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.प्रा. शाळा, आरळी बुद्रुक (ता. तुळजापूर) येथे समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी उपयुक्त पुस्तके व खाऊचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांबाबत जागरूकता निर्माण करणे, वाचनाची आवड वाढवणे आणि शैक्षणिक प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक ग्रामस्थ, पालक उपस्थित होते.

## कडकनाथवाडी-बार्शी रस्ता बनला 'मृत्यूचा सापळा'



### खड्डे, चिखल अन् अपघातांचा कहर...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.५ जुलै -**
वाशी तालुक्यातील कडकनाथवाडीमार्गे बार्शीकडे जाणारा महत्त्वाचा रस्ता खड्डे, चिखल आणि वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. सोलापूर, धाराशिव आणि बीड या तीन जिल्ह्यांना जोडणाऱ्या या मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

कडकनाथवाडी-बार्शी रस्त्यावरील खड्डे आणि चिखल पाहता हा तीन जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग नसून एखादा शेतात जाणारा कच्चा रस्ता असल्याचा भास होत आहे. रस्त्याची अवस्था इतकी खराब झाली आहे की, हा महामार्ग आहे की शेतरस्ता, हेच ओळखणे कठीण झाले आहे. ठिकठिकाणी पडलेले मोठे खड्डे, त्यात साचलेले पावसाचे पाणी आणि मोठ्या प्रमाणात झालेला चिखल यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे परिसरातील अनेक शेतरस्तेही या मार्गापेक्षा चांगल्या स्थितीत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. पावसामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले असून खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना याचा सर्वाधिक फटका बसत असून चिखलामुळे वाहने घसरत असल्याने नागरिकांच्या जीविताला धोका निम ीण झाला आहे.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या आठवडाभरातच या मार्गावर सात ते आठ छोटे-मोठे अपघात घडले आहेत. या रस्त्याची आणखी एक गंभीर समस्या म्हणजे त्याची अरुंद रुंदी. समोरून चारचाकी वाहन आल्यास वाहनांना बाजूला घेण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने अपघाताचा धोका अधिक वाढत आहे.

मागील काही महिन्यांपूर्वी कडकनाथवाडी गावातील तिघा नागरिकांना या रस्त्यावरील अपघातांमध्ये आपला जीव गम ावा लागला होता. मात्र या दुर्दैवी घटनांनंतरही प्रशासनाला जाग आली नसल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

एकीकडे संबंधित विभाग झोपेचे सोंग घेत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात असताना, दुसरीकडे नागरिकांना रोज जीवघेणा संघर्ष करत प्रवास करावा लागत आहे. वाढत्या अपघातांच्या घटना, रस्त्याची दयनीय अवस्था आणि नागरिकांच्या जीविताला निर्माण झालेला धोका पाहता संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## इनोव्हा कारमधून चोरीचा मालाची वाहतूक; ६.५९ लाखांचा चोरीचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जुलै -**
स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने धडक कारवाई करत चोरीचा ६ लाख ५९ हजार ६१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून दोन गुन्ह्यांची उकल केली आहे. या कारवाईत तिघा आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून गुन्ह्यात वापरण्यात आलेली इनोव्हा कारही जप्त करण्यात आली आहे.

दि.३ जुलै २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक म ालमत्तेविषयक गुन्ह्यांचा तपास व पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली. कन्हेरवाडी पाटी येथील सुभाष भिमराव काळे याने आपल्या साथीदारांसह काही दिवसांपूर्वी तेलाचे डबे व इतर साहित्य चोरी करून ते स्वतः च्या पत्र्याच्या शेडमध्ये लपवून ठेवल्याची माहिती पथकाला मि ळाली. त्यानुसार पथकाने येरम ाळा येथे सापळा रचून आरोपींना इनोव्हा कारसह ताब्यात घेतले. आरोपींमध्ये सुभाष भिमराव काळे (वय ३४, रा. कन्हेरवाडी पाटी), अनिल रमेश शिंदे (वय २९, रा. मस्सा) आणि अरुण बबन शिंदे (वय २८, रा. मोहा) यांचा समावेश आहे. आरोपींच्या सांगण्यावरून पोलिसांनी कन्हेरवाडी पाटी येथील पत्र्याच्या शेडवर छापा टाकला. या कारवाईत किर्ती गोल्ड कंपनीसह इतर कंपन्यांचे १३ तेलाचे डबे, निळ्या व लाल रंगाच्या आठ पिशव्या, त्यामध्ये घडी डिटर्जंट व घडी स्मार्ट निरमा पावडर तसेच गुन्ह्यात वापरलेली इनोव्हा कार असा एकूण ६ लाख ५९ हजार ६१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे दोन गुन्ह्यांचा उलगडा झाला आहे.

ही कारवाई सपोनि. सचिन खटके, सपोनि. स्वप्नील वाळके (अं.मु.शाखा), पोह. विनोद जानराव, नितीन जाधवर, अमोल निंबाळकर, बबन जाधवर, मनोज जगताप (अं.मु. शाखा), मपोह. शोभा बांगर चापोह. महेबुब अरब, रोहीत दंडनाईक यांच्या पथकाने केली.

## कळंब आगाराच्या ताफ्यात 'राजमाता जिजाऊ'च्या पाच नवीन बसेस दाखल



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.५ जुलै -**
कळंब तालुक्यातील सार्वजनिक वाहतूक सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने कळंब एसटी आगाराच्या ताफ्यात 'राजमाता जिजाऊ'च्या पाच नवीन बसेस दाखल झाल्या आहेत. या बसेस उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि वेळेवर प्रवासाची सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.

कळंब आगारातील जुन्या बसेस वारंवार नादुरुस्त होत असल्याने अनेक फेऱ्या रद्द होणे किंवा उशिरा धावणे, अशा समस्यांना प्रवाशांना सामोरे जावे लागत होते.

यामुळे विद्यार्थी, शेतकरी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रम ाणात गैरसोय होत होती. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अजित पिंगळे यांनी राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

त्यानंतर कळंब आगारासाठी पाच नवीन बसेस मंजूर करण्यात आल्या. नवीन बसेस सेवेत दाखल झाल्याम ुळे ग्रामीण शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त फेऱ्या वाढविणेही शक्य होणार असल्याने विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुलभ होईल.

याबाबत अजित पिंगळे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आभार मानत, कळंब तालुक्याच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी भविष्यातही सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे सांगितले.

## तुळजाभवानी मंदिर परिसरात 'एकमुखी ब्रह्मदेव' मूर्ती स्थापनेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ जुलै -**
श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात पौराणिक, ऐतिहासिक आणि मूर्तीशास्त्राच्या दृष्टीने दुर्मिळ असलेल्या 'एकमुखी ब्रह्मदेव' म ूर्तीची शास्त्रोक्त पद्धतीने स्थापना करण्यात यावी, अशी मागणी श्री तुळजाभवानी भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अम रराजे कदम यांनी मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



तुळजापूरच्या ऐतिहासिक आणि धार्मिक वारशाला साजेशी ही मूर्ती मंदिराच्या वैभवात भर घालेल. तसेच भाविकांना भारतीय शिल्पकला व सांस्कृतिक परंपरेचा अनुभव मिळेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## जागजी येथील सोलर प्रकल्पातून साहित्य चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ जुलै -**
जागजी शिवारातील मार्तंड ग्रीन पावर एनर्जी प्रा. लि.च्या सोलर प्रकल्पातून अज्ञात चोरट्यांनी वायरिंग हार्निस व तांब्याची आर्थिंग केबल असा सुमारे ७० हजार रुपयांचा माल चोरी केला. तसेच सुमारे २ लाख रुपयांच्या डी.सी. केबल व सौर पॅनलचे नुकसान केल्याची घटना घडली.

याप्रकरणी कौशिक केदार रासुरे यांच्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## शाळांजवळ घातक पेयांना बंदी; पालकांकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ जुलै -**
शाळांच्या ५०० मीटर परिसरात मुलांच्या आरोग्यास घातक ठरणाऱ्या पेयांच्या विक्रीवर राज्य सरकारने बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून या निर्णयाचे पालक व नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे. तसेच या निर्णयाची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाने अलीकडच्या काळात अन्नभेसळ आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित विषयांवर कडक भूमिका घेतली आहे. अन्नातील भेसळीम ुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने विविध ठिकाणी कारवाया सुरू केल्या आहेत. यामुळे भेसळखोरांमध्ये मोठी धास्ती निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या मोहिमेला शासनानेही अधिक बळ देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.




दरम्यान, राज्य सरकारने शाळांच्या ५०० मीटर परिसरात मुलांच्या आरोग्यास अपायकारक ठरणाऱ्या पेयांच्या विक्रीवर बंदी लागू केली आहे. या निर्णयामुळे मुलांच्या आरोग्याचे संरक्षण होण्यास मदत होणार असल्याचे मत पालकांनी व्यक्त केले आहे.

सध्या अनेक लहान मुले विविध प्रकारच्या एनर्जी ड्रिंक्सचे सेवन करताना दिसून येत आहेत. अशा पेयांच्या अतिसेवनामुळे मुलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शालेय परिसरात अशा पेयांच्या विक्रीवर निर्बंध आणण्याचा निर्णय स्वागतार्ह असल्याचे मत नागरिकांनी नोंदविले आहे.

मात्र केवळ निर्णय घेऊन उपयोग नसून त्याची प्रभावी आणि कठोर अंमलबजावणी होणे अत्यावश्यक असल्याचेही पालक व नागरिकांचे म्हणणे आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी शाळांच्या परिसरात आरोग्यास घातक ठरणाऱ्या पेयांची विक्री होत नाही ना, यावर विशेष लक्ष ठेवण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात येत आहे.

## तुळजापूरात इस्कॉनतर्फे हरिनाम संकीर्तन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ जुलै -**
आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) व हरे कृष्ण भक्तांच्या वतीने तुळजापूर येथे हरिनाम संकीर्तन उत्साहात पार पडले.

रविवारी सकाळी श्री महावीर कासार यांच्या घरापासून सुरू झालेल्या संकीर्तनाची सांगता श्री प्रमोद ठेले यांच्या निवासस्थानी प्रसाद वितरणाने झाली. रिमझिम पावसातही भक्त हरिनामाच्या गजरात तल्लीन होऊन नृत्य करत सहभागी झाले. यावेळी श्री माऊली भजनी मंडळाचाही उल्लेखनीय सहभाग होता.

दर महिन्याच्या पहिल्या रविवारी शहरातील विविध भागांत अशा श्रीराम फेरीचे आयोजन करण्यात येते.

## मराठी उद्योजकांनी संघटित होऊन उद्योगवृद्धीसाठी पुढे यावे : आ. सुभाष देशमुख




विश्वमंगल मराठी फाउंडेशनच्या व्यावसायिक स्वयंरोजगार संवाद बैठकीला

**प्रतिभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.५ जुलै -**
विश्वमंगल मराठी फाउंडेशनच्या उद्योग विभागातर्फे आयोजित 'व्यावसायिक स्वयंरोजगार संवाद बैठक' इटकळ (ता. तुळजापूर, जि. धाराशिव) येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. मराठी उद्योजकांचे सशक्त नेटवर्क उभारणे, स्वयंरोजगाराला चालना देणे, शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे आणि स्थानिक उद्योगांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या बैठकीला उद्योजक, व्यावसायिक, स्वयंरोजगार इच्छुक युवक तसेच मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विश्वमंगल मराठी फाउंडेशनचे मुख्य समन्वयक विजय पाटील यांनी संस्थेची ध्येय-धोरणे आणि 'विश्वमंगल मराठी बिझनेस फोरम' या उपक्रमाची माहिती दिली. मराठी उद्योजकांना एकत्र आणून व्यवसायवृद्धीसाठी सक्षम व्यासपीठ निम ीण करणे आणि 'लोकल टू ग्लोबल - ग्लोबल टू लोकल' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यशस्वी उद्योजक मल्लिनाथ जळकोटे यांनी दुग्धव्यवसायातील अनुभव कथन करत तरुणांनी नोकरीपेक्षा उद्योग-व्यवसायाकडे वळून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, असे आवाहन केले. सुदन सुरवसे यांनी शासनाच्या विविध वैयक्तिक लाभ आणि आर्थिक सहाय्य योजनांची माहिती दिली.

प्रा. संगमेश्वर जळकोटे यांनी उद्योगाचे अर्थकारण स्पष्ट करत उद्योगाभोवती अनेक पूरक व्यवसाय निर्माण होतात आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होते, असे सांगितले. तर लोकमंगल मल्टीस्टेटचे व्हाईस चेअरमन बालाजी शिंदे यांनी स्थानिक उद्योजकांनी एकत्र येऊन उद्योगवृद्धीसाठी कार्य करावे, असे आवाहन केले.

प्रमुख मार्गदर्शन करताना विश्वमंगल मराठी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा आमदार सुभाष देशमुख यांनी उद्योजकांनी संकटांमध्ये संधी शोधण्याची वृत्ती जोपासावी, असे सांगितले. सातत्य, नावीन्य, अभ्यास आणि समाजाच्या गरजा लक्षात घेऊन उद्योग उभारल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, शेतीपूरक उद्योग, प्रक्रिया उद्योग, स्थानिक उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देणे तसेच 'एक गाव - एक उत्पादन' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यासाठी फाउंडेशन सातत्याने कार्य करणार आहे. व्यवसाय प्रशिक्षण, मार्केटिंग, आर्थिक सहाय्य, नेटवर्किंग आणि उद्योगवृद्धीसाठी आवश्यक सर्व प्रकारचे सहकार्यही उपलब्ध करून दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. प्रास्ताविक विजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन सुदन सुरवसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन रतन सुरवसे यांनी केले.

यावेळी मल्लिनाथ जळकोटे, प्रा. संगमेश्वर जळकोटे, बालाजी शिंदे, सचिन अडगळे, केशेगावचे सरपंच मल्लिनाथ गावडे यांच्यासह परिसरातील उद्योजक, व्यावसायिक, स्वयंरोजगार इच्छुक युवक आणि नागरिक उपस्थित होते.

## थॅलेसेमियाग्रस्त चिमुकल्या श्रेणीकसाठी १० लाखांची आर्थिक मदत



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ जुलै -**
आई तुळजाभवानी देवीचे पुजारी गणेश अणदुरकर यांचे मुंबई येथील भक्त प्रथमेश शेटे यांनी माणुसकीचा आदर्श घालत पुजारी चेतन शेळके यांच्या पाच वर्षीय मुलाच्या उपचारासाठी तब्बल १० लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे.

चेतन शेळके यांचा पाच वर्षीय मुलगा चि. श्रेणीक याला थॅलेसेमिया हा दुर्मिळ आणि गंभीर रक्तविकार झाला असून त्याच्या उपचारासाठी सुमारे ४० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. मात्र शेळके कुटुंबाची आर्थिक परिस्थिती एवढा मोठा खर्च करण्यास सक्षम नसल्याने त्यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले होते.

ही बाब समजल्यानंतर मुंबई येथील प्रथमेश शेटे यांनी म दतीचा हात पुढे करत श्रेणीकच्या उपचारासाठी १० लाख रुपयांची आर्थिक मदत केली. पुजारी गणेश अणदुरकर व प्रथमेश शेटे यांच्या हस्ते ही मदत चेतन शेळके यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली.

यावेळी शेटे व अणदुरकर परिवाराच्या वतीने आई जगदंबेच्या चरणी चिमुकल्या श्रेणीक लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करण्यात आली.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त...

## विघ्नेश्वर गणेश व केदारेश्वर शिवलिंग मुर्ती स्थापना सोहळा निमित्य शिवकथेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ५ जुलै : संकट मोचन हनुमान मंदिर एस.टी. कॉलनी येथे विघ्नेश्र्वर गणेश मुर्ती व केदारेश्र्वर शिवलिंग मुर्ती,नंदी स्थापना ९ जुलै तर कळशारोहन सोहळा १६ जुलै रोजी संपन्न होणारअसुन त्यानिमित्याने शिवकथेचे आयोजन करण्यात आले आहे.

एस.टी. कॉलनी नळेगाव रोड नविन वसाहत मलकापूर येथील संकंट मोचन हनुमान मंदिर येथे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या स्थानिक विकास निधी व मुलभूत योजनेतून विघ्नेश्र्वर गणेश मंदिर व केदारेश्र्वर शिवालय सभागृहाचे भव्य निर्माण झाले असुन लोकसहभागातून मंदिरचे बांधकाम पुर्ण झाले.विघ्नेश्र्वर गणेश मुर्ती तामिळनाडू येथील महाबलीपुरम येथून आणण्यात आली आहे तर शिवलिंग व नंदी अहमदपूर तालूक्यातील डोंगरगाव येथे बनवण्यात आली आहे.

गुरुवार दि. ९ जुलै २०२६ रोजी केदारेश्र्वर शिवलिंग,नंदी मुर्ती व विघ्नेश्र्वर गणेश मुर्ती स्थापना श्री गुरु हावगी स्वामी मठाचे मठाधिश ष.ब्र.१०८ डॉ.शंभूलिंग शिवाचार्य महाराज,ष.ब्र.१०८ उपमन्यू शिवाचार्य महाराज (हिरेमठ ऐनापूर)यांच्या दिव्य सानिध्यात व ष.ब्र. १०८ डॉ. राजशेखर शिवाचार्य महाराज हिरेमठ मेहकर यांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे.

शुक्रवार दि १० जुलै पासुन दररोज सकाळी ८.३० वाजता व्यासपीठ प्रमुख शि.भ.प. उध्दव महाराज हैबतपुरे यांच्या नेतृत्वाखाली शिवलीलामृत ग्रंथाचे पारायण तर ११वाजता प्रवचन होणार आहे.दुपारी ठिक २ ते ५ स्वातीताई दापकेकर यांची शिवकथा होणार असुन ५.३० रिगंण शिवपाठ संपन्न होणार आहे.

गुरुवार दि.१६ जुलै रोजी सकाळी ठिक ८ वाजता मंदिर ते राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज चौक कलश मिरवणूक निघणार आहे. सकाळी ११ वाजता डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या शुभहस्ते व युवा संत राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूर, आचार्य गुरुराज महाराज यांच्या उपस्थित कळशारोहन कार्यक्रम व नंतर शि.भ.प.उध्व महाराज हैबतपुरे यांचे प्रसादिक किर्तन होणार आहे.दुपारी ठिक १२ वाजता मंदिर सभागृहाचा लोकार्पण सोहळा माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या हस्ते संपन्न होणार असुन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मलकापूरचे सरपंच गुरुनाथ बिरादार हे राहणार असुन प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सिध्देश्र्वर पाटिल आदी उपस्थित राहणार आहेत.

मुर्ती स्थापना व कळशारोहन कार्यक्रमानित्य आयोजित सतसंग कार्यक्रमास भाविक भक्तांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर कमिटीचे अध्यक्ष सुनिल पाटिल,उपाध्यक्ष नामदेवराव मोरे, सचिव महेश तोडकर,कोषाध्यक्ष सुरेश राजपाल, दिगंबर बिरादार,अशोक बिरादार,राजकुमार नळगीरे,नीतिन भेंडे,विष्णू रोडगे, गुंडूराव लाळे, बालाजी बोबडे,भास्करराव जोशी ,जितेंद्र बोडके, बाबुराव माने, विनायक धनबा,महादेव खताळ,शिवरुद्र पाटिल,बाळू मोगले, दिनदयाळ पाटिल,विजयकुमार कापडे, विष्णूकांत पुठ्ठेवाड, संतोष भोसले, गणपतराव रेड्डी,अनंत मोरे,दिलिप पटणे, प्रकाश साखरे, संतोष मजगे,संभाजी डांगे, श्रीकांत स्वामी,बालाजी बिरादार,संतोष स्वामी,प्रविण हलकंचे, नरेश पाटिल, किरण रोडगे, यादव कारभारी, मिथून नरहरे सुर्यकांत आलमले, संत मिराबाई भजनी मंडळ यांच्या सह एस.टी.कॉलनी मलकापूर ग्रामस्तांनी केले आहे.

## पती, सासरा, दिराला तीन दिवसांची पोलिस कोठडी

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ५ जुलै : शहरातील सादरनगर, देगलूर रोड परिसरातील एका ३६ वर्षीय विवाहितेला जिवंत जाळल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली. याप्रकरणी पती, सासरा आणि दीर या तिघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिन्ही आरोपींना शनिवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांनी सांगितले, मृत तसलीम शफी खुरेशी (वय ३६) यांना नवीन दुकानसाठी माहेरहून पैसे आणण्याची मागणी सतत करून तसेच संशय घेऊन मानसिक व शारीरिक छळ केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात

आला आहे. शुक्रवारी पती, सासरा आणि दीर यांनी संगनमत करून तसलीम यांना मारहाण केली. त्यानंतर त्यांना घराच्या वरच्या मजल्यावरील खोलीत नेऊन अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून

दिले. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी मृत महिलेचे वडील युसुफ गुलामअहमद पठाण यांच्या फिर्यादीवरून आरोपी पती शफी मुसा खुरेशी, सासरा मुस्सासाब खुरेशी, दीर समी मुसा खुरेशी देगलूररोड, (सर्वजण रा. सादरनगर, उदगीर) यांच्याविरुद्ध उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात शनिवारी पहाटे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. शनिवारी आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे.

# केशवराज शैक्षणिक संकुलात शिक्षणासोबतच आदर्श नागरिक घडविण्याचे काम केले जाते : उद्धव फड

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ जुलै : येथील श्री केशवराज शैक्षणिक संकुलात शिक्षणासोबतच आदर्श नागरिक घडविण्याचे,राष्ट्र भावना निर्माण करण्याचे काम केले जाते, असे प्रतिपादन प्रेरणादायी वक्ते उद्धव फड यांनी केले.अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री केशवराज शैक्षणिक संकुलातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याच्या पहिल्या सत्रात छ्यचड शिष्यवृत्ती परीक्षा, तसेच राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उद्धव फड आपले विचार व्यक्त करत होते.




याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री केशवराज शैक्षणिक संकुल स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर हे होते. यावेळी मंचावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, विष्णू सोनवणे, केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समितीचे अध्यक्ष (माध्य.) गंगाधर खेडकर, मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, शिवाजी हेंडगे, प्राचार्या सोनाली दर्डा, शिशुवाटिका प्रधानाचार्या अवंती कुलकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना उद्धव फड यांनी साने गुरुजींच्या स्वप्नातील विश्र्वात शोभून दिसणारा भारत विद्यार्थ्यांवरील संस्कारातून निर्माण होईल.विद्यार्थ्यांचा हा सन्मान केवळ गुणांचा नसून त्यांच्यातील सातत्य, जिद्दीचा आहे. या यशात पालकांचा मोठा त्याग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते. विद्यार्थ्यांच्या डोळ्यात पालकांना त्याचे भविष्य दिसत असते. लातूरचा पालक जागरूक असल्याचे सांगून फड यांनी शिस्तीतून देश उभारत असतो. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेत शिस्तीला महत्त्व दिले जाते,असेही सांगितले.पालकांची अपेक्षा आपला पाल्य केवळ यशापुरता मर्यादित न राहता तो संघर्षात टिकावा अशी असावी.यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी संघर्ष करणाऱ्यांची चरित्रे वाचावीत असे सांगून ही शाळा पालकांच्या विश्र्वासार्हतेला तडा न जाऊ देणारी असल्याचे नमूद केले.

अध्यक्षीय समारोपात धनंजय तुंगीकर यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी व्हावे, सन्मानाने जीवन जगावे ही प्रत्येकाची भावना असते. आपल्या विद्यालयात संस्कार चांगले होत असल्याने पालक केशवराजला प्राधान्य देतात, असे सांगितले. चांगल्या विद्यार्थ्यांमुळे परिवार, समाज आणि राष्ट्राचेही कल्याण होते असे सांगून त्यांनी गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक श्री केशवराज प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे यांनी केले.कु. अपूर्वा पाटील हिने वैयक्तिक पद्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वैशाली फुलसे यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती रेखा पुरी यांनी केले. कांचन तोडकर यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन प्रयागराज गरुड यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, धनंजय कुलकर्णी,राम जोशी, गुरूनाथ झुंजारे, कार्यक्रम प्रमुख मोरेश्र्वर देशपांडे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# शिरूर अनंतपाळ तालुक्यात वृक्षतोड सर्रासपणे चालू

## शेतकरीच आपल्या शेताच्या बांधावरील वृक्षतोड कवडीमोल भावाने विक्री करत आहेत

तभा वृत्तसेवा (शंकर मिटकर)

शिरूर अनंतपाळ दि. ५ जुलै : तालुक्यात वृक्षतोड सर्रास पणे चालू आहे.पण शेतकरीच आपल्या शेताच्या बांधावरील वृक्षतोड कवडीमोल भावाने विक्री करत आहेत




वृक्षतोड होत असल्याने आणि पाऊस लांबल्यामुळे माळरानावर उभा टाकून आकाशाकडे डोळे लावणारा शेतकरी दरवर्षी एकच प्रश्न विचारत असतो पाऊस का पडत नाही? विहिरी कोरड्या, डोळे कोरडे. पण या प्रश्नाचे उत्तर त्याच्या स्वतःच्याच बांधावर पडलेल्या झाडाच्या खोडात दडलेले आहे.

गेल्या दोन दशकात आपण प्रगतीच्या नावाखाली, गरजेच्या नावाखाली आणि कधीकधी दारूच्या पैशासाठी बांधावरची अब्जावधी रुपयाची संपत्ती शे- पाचशेला विकून टाकली. आपल्या वाड- वडिलांनी शेताच्या बांधावर लावलेली आंब्याची , चिंचेची, लिंबाची, बाभळीची झाडे जे की तीस ते चाळीस वर्ष आपणास सावली देणारी, जमिनीत ओलावा टिकून धरणारी, पाऊस खेचून आणणारी, निसर्गाचे हिरवे रखवालदार आपणच कापून टाकले व्यसनाधीनतेसाठी किंवा गरजेपोटी कवडीमोल किंमतीमध्ये विकून आपण आपल्या गरजा भागविण्याकरिता झाडांची कत्तल केली. मग आज पाऊस लांबला, विहिरी कोरड्या पडल्या की, आभाळाकडे बोट दाखवण्याचा आपल्याला नैतिक अधिकार उरतो का?

झाड तोडणे म्हणजे पावसाला हाकलून लावणे...

विज्ञान सांगते --झाडे बाष्पोत्सर्जन करतात . एक मोठा वृक्ष दिवसाला चारशे लिटर पाण्याची वाफ हवेत सोडतो. हीच वाफ ढग बनते. बांधावरची दहा झाडे तोडली म्हणजे रोज चार हजार लिटर पाण्याची वाफ आपण हवेतून काढून घेतली. मग पाऊस कुठून येणार? जंगल तोड केल्यावर वाळवंट होते, हा नियम आपल्या शेताच्या बांधालाही लागू पडतो.

यासाठी उपाय एकच झाडाला आपलं पेन्शन समजा.: आजोबांनी लावलेली चिंचेचे झाड दरवर्षी आपल्याला दहा हजाराची चिंच देते. वीस वर्षात दोन लाख रुपये होतात. शिवाय सावली,पशु, पक्षी, पाऊस हे सर्व फुकट. हे पेन्शन आपण पाचशे रुपयांसाठी मोडतो. मग म्हातारपणी पाण्यासाठी वन वन फिरतो. शेतकरी मित्रांनो बांधावरचे झाड तोडण्याच्या अगोदर दहा सेकंद थांबा विचार करा हे झाड तोडल्यावर माझ्या विहिरीचे पाणी एक फूट खाली जाईल. माझ्या मुलाला उन्हात राबावे लागेल. माझ्या नातवांना पाऊस पाहायला मिळणार नाही. पाऊस हा निसर्गाचा आशीर्वाद आहे तो आशीर्वाद घेण्यासाठी आपली लायकी आपल्याला ठेवायला पाहिजे. शे पाचशे रुपयासाठी ज्या हाताने बांधावरचे झाडे विकली, त्या हाताने आभाळाकडे पाहून पावसासाठी याचना करणे हा शुद्ध दांभिकपणा आहे.

बांधावर झाड लावा तरच आकाशाकडे बघण्याचा अधिकार मिळेल नाहीतर दुष्काळ आपली नियती नाही आपणच निवडलेले संकट आहे.

## साहित्यिक विवेक सौताडेकर यांच्याकडून माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांचा सत्कार



लातूर, दि. ५ जुलै : लातूरचे इतिहाससंशोधक आणि प्रख्यात साहित्यिक विवेक सौताडेकर यांनी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांची मजगे नगर येथील कैलास निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

या वेळी सौताडेकर यांनी कव्हेकर यांच्या प्रकृतीची आत्मीयतेने विचारपूस करून उत्तम आरोग्यासाठी आवश्यक ती काळजी घेण्याचा सल्ला दिला. या प्रसंगी जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे दतात्रय माळकर तसेच कासारखेडा येथील महेश शिंदे उपस्थित होते.

भेटीदरम्यान माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर आणि साहित्यिक विवेक सौताडेकर यांच्यात लातूर जिल्ह्याच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि साहित्यिक घडामोडींवर सखोल व सकारात्मक चर्चा झाली. परस्पर विचारांची देवाणघेवाण करत त्यांनी समाजहिताच्या विविध विषयांवरही मनमोकळा संवाद साधला.

## दयानंद कला महाविद्यालयात डिजीटल पत्रकारिता कार्यशाळा संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ जुलै : पत्रकारीतेत पत्रकारांनी सोशल मीडिया, युट्युब, फेसबुक, इंस्टाग्राम, वेब आदी डिजीटल माध्यमाचा प्रभावी वापर करावा असे आवाहन चित्रपट कलादिग्दर्शक व प्रशिक्षक संतोष संखद यांनी लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयात आयोजित डिजीटल पत्रकारिता कार्यशाळेत केले. कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व भारतीय संविधानाच्या पुजन करून करण्यात आली.

लातूर येथे भारतीय पत्रकार संघ, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघ, दयानंद कला महाविद्यालय लातूर आणि आंबेडकराईट फिल्म मेकर्स असोसिएशन च्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ४ जुलै २०२६ रोजी डिजीटल पत्रकारिता कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर विभागीय माहिती कार्यालयाचे सहाय्यक संचालक डॉ. शाम टरके यांची प्रमुख उपस्थिती होती. तर मंचावर लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष रविकिरण सुर्यवंशी मसलगेकर, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे संस्थापक सचिव तथा भारतीय पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय परळकर आदींची उपस्थिती होती.

या कार्यशाळेत प्रसिद्ध कलादिग्दर्शक व प्रशिक्षक संतोष संखद यांनी प्रशिक्षणादरम्यान डिजीटल पत्रकारितेतील कॅमेरा गल, प्रभावी व्हीडिओ निर्मिती, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, युट्यूब व फेसबुक, इंस्टाग्राम, वेब वरील कंटेटची मांडणी, प्रेक्षक संख्या वाढविण्याच्या पध्दती, लाईक, सबस्क्राईब आणि डिजीटल प्लॅटफॉर्म वरील यशस्वी उपस्थितीसाठी आवश्यक तांत्रिक बाबी याविषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित पत्रकार बांधवांना मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यशाळेला पत्रकार राजकुमार गुडाप्पे, सितम सोनवणे, डी. एल. वाघमारे, राम रोडगे, मारोती माने, शिवाजी कांबळे, खंडेराव देडे, शिरीषकुमार शेरखाने, सुनील कांबळे आदींसह लातूर येथील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्युत पोल कोसळल्याने चार गावचा पाणीपुरवठा बंद

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ५ जुलै : तालुक्यात महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे आणि वेळीच दुरुस्त न केल्यामुळे तळेगाव (बोरी), हालकी, डोंगरगाव, उजेड, ही चार गावे गेल्या सहा दिवसापासून भीषण पाणीटंचाईचा सामना करत आहेत. मुख्य वीज वाहिनीचा पोल कोसळल्याने चारही गावातील ग्रामपंचायत अंतर्गत पाणीपुरवठा शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत पंप बंद पडले आहेत. जनावरांसह पिण्याचे पाणी व शेतीसाठी पाणी मिळत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तळेगाव बोरीचे सरपंच अक्षय पाटील हे तरुण भारतशी बोलताना म्हणाले की, सहा दिवसापूर्वी आलेल्या चक्रीवादळाच्या तडाख्यात सापडल्यामुळे महावितरणचा



विद्युत पोल जमिनीवर कोसळला. यामुळे उजेड फीडरवरील थ्री फेस ए.जी. वीज पुरवठा पूर्णपणे खंडित झाला . या फीडरशी जोडलेल्या चार गावांच्या ग्रामपंचायत चा पाणीपुरवठा बंद झाला असून ग्रामस्थांना पाण्यासाठी वन वन भटकावे लागत आहे. डोंगरगाव, हालकी, तळेगाव (बोरी), उजेड या चार गावचा पाणीपुरवठा बंद असुन , केवळ पिण्याच्या पाण्याचाच प्रश्न्न गंभीर झालेला नसून, जनावरासह शेतीचेही मोठे नुकसान होत आहे. सध्या तालुक्यात पाऊस नसल्यामुळे ऊस आणि फळबागांना पाण्याची नितांत गरज आहे. विद्युत पंप बंद असल्याने ऊस आणि फळबागा वाळून जात आहेत. यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होत असून महावितरणने विद्युत प्रवाह सुरळीत चालू करुन आम्हाला सहकार्याची मदत करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

तळेगाव बोरीचे सरपंच अक्षय पाटील यांनी सदरील पोल पडल्याची माहिती त्याच दिवशी महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिली असल्याचे बोलले जात आहे. मात्र सहा दिवस उलटून गेले तरी महावितरणचा एकही अधिकारी घटनास्थळी पोहोचल्याचे निदर्शनास आले नाही. महावितरण ने आम्हाला वेठीस धरले आहे असे सरपंच अक्षय पाटील म्हणतात. पाणी हा मूलभूत अधिकार असुन , सहा दिवस पाणी बंद राहणे ही गंभीर बाब आहे.

जर पुढील चोवीस तासात वीज पुरवठा सुरळीत नाही झाला तर चार गावातील ग्रामस्थांना घेऊन तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही सरपंचाने दिला आहे. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने याकडे गांभीर्याने लक्ष घालून वीज पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी चार गावच्या नागरिकातून जोर धरू लागली आहे.

# जीवन विकास मतिमंद कर्मशाळेत नाईक जयंती उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ५ जुलै : येथील जीवन विकास निवासी मतिमंद मुलांच्या कर्मशाळेत महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम तसेच उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजयभाऊ बनसोडे यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी त्यांना विनम्र अभिवादन केले. त्यांच्या कृषी, ग्रामीण विकास, शिक्षण व समाजकल्याण क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेण्यात आला. उपस्थितांना त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन प्रामाणिकपणे शिक्षण व कौशल्य विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन करण्यात आले.

यानंतर आमदार संजयभाऊ बनसोडे यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना फळे वाटप करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. संस्थेतील बौद्धिक दिव्यांग विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या हस्तकला वस्तूंचे प्रदर्शनही यावेळी आयोजित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रांगणात वृक्षरोपण करण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित जिल्हा परिषद लातूर सदस्य डॉ. दीपकजी सोमवंशी, पवन चव्हाण, मिलिंद वाघमारे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी बाबुराव राठोड, ग्राम रोजगार सेवक उत्तम वाघमारे, मालोजी वाघमारे, बिपिन पवार, मनोज चव्हाण, गोविंद महाराज, सुनील जाधव आदी मान्यवरांनी आमदार संजयभाऊ बनसोडे यांनी मतदारसंघातील शिक्षण, दिव्यांग कल्याण, सामाजिक विकास आणि जनसेवेच्या क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव केला. भविष्यातही त्यांच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकाधिक सहकार्य लाभावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी कर्मशाळेचे व्यवस्थापकीय अधीक्षक राजापटेल, विशेष निदेशक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सहावीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांची प्रतीक्षा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ जुलै : शैक्षणिक वर्ष सुरु होऊन १५ दिवस उलटूनही जिल्ह्यातील इयत्ता तिसरी, चौथी आणि विशेषत : सहावीच्या विद्यार्थ्यांना अद्यापही काही पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत. अभ्यासक्रमात झालेल्या बदलांमुळे पुस्तकांच्या छपाई व पुरवठ्यात विलंब झाल्याने सुमारे ९३ हजार ९६० पाठ्यपुस्तकांचे वितरण रखडले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकाविनाच शिक्षण घ्यावे लागत आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील पहिली ते * आठवीच्या १४ लाख ७३ हजार २४३ पुस्तकांची मागणी करण्यात होती. त्यापैकी आतापर्यंत १३ लाख ७९ हजार २८३ पुस्तकांचा पुरवठा झाला असून उर्वरित प्रतींचे वितरण सुरु आहे. पुढील दोन दिवसांत सर्व पुस्तके विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील, असा दावा शिक्षण विभागाने केला आहे.

# राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (गळीत धान्य) अंतर्गत सम्राट शेतकरी गटाला सोयाबीन बियाणे वाटप




तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ५ जुलै : तालुक्यातील मौजे थेरगाव येथील सम्राट शेतकरी गटाला राष्ट्रीय खाद्य तेल अभियान (गळीतधान्य) सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना बियाण्यांची उगवण क्षमता, पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करण्याचे महत्त्व, रुंद सरी-वरंबा पद्धतीने पेरणी तसेच उताराच्या जमिनीवर आडवी पेरणी करून मृदा व जलसंधारणास पूरक शेती पद्धती अवलंबण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सहाय्यक कृषी अधिकारी यादव यांनी शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करून सोयाबीन पिकाचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्याचे आवाहन केले. तसेच संतुलित खत व्यवस्थापन, योग्य पेरणी वेळ आणि पिकाचे संरक्षण याबाबतही माहिती दिली.

या कार्यक्रमास सम्राट शेतकरी गटाचे अध्यक्ष उत्तम सोनवणे, सचिव शिवराज सोनवणे तसेच गटातील सदस्य विलास जाधव, कमलाकर सोनवणे, अरुण भांगे, राम शिंदे, संग्राम सोनवणे,माधव सोनवणे, सुभाष मिटकर, संभाजी सोनवणे, विशाल बुरगे, यांच्या सह गटातील व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तीन वेळा नगरसेवक राहिलेले फिरोज भाई शेकडो समर्थकांसह भाजपमध्ये

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ जुलै -**

नांदेड शहराच्या राजकारणात रविवारी मोठा राजकीय धक्का बसला. प्रभाग क्रमांक ८ मधील प्रभावी नेतृत्व, तिनवेळा नगरसेवक राहिलेले फिरोज खान (फिरोज भाई) यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश करत शहरातील राजकीय समीकरणांनाच नवे वळण दिले. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

फिरोज भाई हे नांदेडच्या राजकारणातील वजनदार नाव मानले जाते. काँग्रेस, एमआयएम आणि अपक्ष उमेदवार म्हणून जनतेचा कौल मिळवत त्यांनी तीन वेळा नगरसेवकपद भूषविले आहे. प्रभाग क्रमांक ८ मध्ये त्यांचा मजबूत जनाधार, सर्वधर्मीय समाजातील प्रभावी संपर्क आणि कार्यकर्त्यांचे विस्तृत जाळे लक्षात घेता, त्यांचा भाजप प्रवेश हा आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा राजकीय घटनाक्रम मानला जात आहे.




आमदार अमरनाथ राजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नई आबादी, लेबर कॉलनी, लालवाडी, तेहरा नगर, श्रावस्ती नगर, आंबेडकर नगर आणि गोकुळ नगर परिसरातील शेकडो कार्यकर्त्यांनी फिरोज भाई यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये प्रवेश केला. या प्रवेशामुळे संबंधित भागात भाजपची संघटनात्मक ताकद लक्षणीयरीत्या वाढणार असून विरोधी पक्षांसमोर मोठे आव्हान उभे राहिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

या पक्षप्रवेश सोहळ्यास माजी मंत्री डी. पी. सावंत, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, माजी महापौर प्रतिनिधी विजयभाऊ येवनकर, नगरसेवक उमेश चव्हाण, सलाम चावलवाला, अमितभाऊ, माजी नगरसेवक संदीप सोनकांबळे, अमितभाई वाघ यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पक्षप्रवेश करणाऱ्यांमध्ये हाफिज मास्टर, शम्मू काजी, शेख रियाज, शेख खाजा (पोलीस मित्र), मिर्झा आजम बेग, हमीद खान, शेख अन्वर, हकीम भाई, रऊफ भाई, नदीम भाई, बबलू मोहम्मद टेलर, मोहसीन भाई, जलाल टेलर, मोईनुद्दीन काजी, अझर भाई, शोएब खान, शेख आजम खान, नुसरत खान, अशफाक खान, खलील भाई, खदीर भाई, रज्जाक भाई, पाशा मामू, कलाम भाई, आदिल खान, सोहेल खान, मझर भाई, अहमद, रियाज (बेकरीवाले), सुलतान भाई, उमेर भाई, युसूफ भाई, नजीब भाई, मदस्सीर भाई यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांचा समावेश होता.

यावेळी बोलताना फिरोज भाई म्हणाले, अशोकराव चव्हाण साहेब यांच्या नेतृत्वावर आणि भारतीय जनता पक्षाच्या विकासाभिमुख विचारसरणीवर विश्वास ठेवून मी व माझे सहकारी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी, नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आणि पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीने काम करू.

फिरोज भाई यांच्या या निर्णयामुळे नांदेड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांपूर्वी शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, त्यांच्या प्रवेशाने भाजपला मोठे राजकीय बळ मिळाल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने गोविंद शिनगारे यांचा गौरव

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ५ जुलै -**

येथून जवळच असलेल्या बिजूर तालुका बिलोली येथील प्रगतशील शेतकरी गोविंद बाबाराव शिनगारे यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातर्फे सन २०२३ चा प्रतिष्ठेचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्यातील शेती क्षेत्रात नवकल्पना, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, उत्पादनवाढ, शाश्वत शेती आणि इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी कार्य याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार त्यांना जाहीर करण्यात आला. मुंबई येथील वरळीतील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे झालेल्या राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते शिनगारे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी कृषी क्षेत्रातील अनेक मान्यवर, अधिकारी आणि राज्यभरातील प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोविंद शिनगारे यांनी आपल्या मेहनत, सातत्य आणि प्रयोगशील वृत्तीच्या जोरावर शेतीला आधुनिकतेची जोड देत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पारंपरिक शेतीबरोबरच सुधारित तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, उत्पादनवाढ आणि शेतकरीहिताच्या उपक्रमांमुळे त्यांनी परिसरातील अनेक शेतकऱ्यांना नवी दिशा दिली आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव राज्य शासनाने पुरस्काराच्या माध्यमातून केल्याने बिजूर गावासह संपूर्ण बिलोली तालुका आणि नांदेड जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.




पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांच्या सौभाग्यवती सरोजा शिनगारे, कन्या अनुजा शिनगारे, सुपुत्र अजय शिनगारे, तसेच शिवाजीराव कु-हाडे यांच्यासह कुटुंबीयांनी आनंद व्यक्त केला. बिजूर ग्रामस्थ, विविध सामाजिक संस्था, कृषी क्षेत्रातील जाणकार, लोकप्रतिनिधी आणि शेतकरी बांधवांकडून गोविंद शिनगारे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा ओघ सुरू आहे. ग्रामीण भागातील कष्टकरी शेतकरीही जिद्द, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर राज्यस्तरावर मानाचे स्थान मिळवू शकतो, याचे प्रेरणादायी उदाहरण गोविंद शिनगारे यांनी आपल्या कार्यातून निर्माण केले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरातील तरुण शेतकऱ्यांमध्ये नव्या उमेदीने आधुनिक शेतीकडे वाटचाल करण्याची प्रेरणा निर्माण झाली आहे



## तळागाळातील लढवय्या गंगाधर कोत्तेवारची शिवसेनेत दमदार एन्ट्री

**नायगाव** -नायगांव तालुक्यातील होटाळा येथील सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे आणि लहुजी क्रांती सेनेचे जिल्हापाध्यक्ष म्हणून सक्षमपणे जबाबदारी सांभाळणारे गंगाधर दिगांबरराव कोतेवार होटाळकरानी शिवसेनेत जाहीर प्रवेश करून आपल्या सार्वजनिक कार्याला नवे राजकीय व्यासपीठ प्राप्त करून दिले आहे. ठाणे येथे दि.२८ जून रोजी झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यात उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांनी शिवबंधन बांधले.दीर्घ काळ सामाजिक संघटनांमधून कार्य करताना कोतेवार यांनी अनेक सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. वंचित, उपेक्षित आणि गरजू घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी विविध स्तरांवर त्यांनी भूमिका मांडली. त्यांच्या स्पष्टवक्तेपणा, संघटन कौशल्य आणि लोकांशी असलेल्या सातत्यपूर्ण संपर्कामुळे त्यांना परिसरात एक अभ्यासू व धाडसी कार्यकर्ता म्हणून ओळख मिळाली. सामाजिक कार्याचा विस्तार करताना जनतेच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे न्याय मिळवून देण्यासाठी राजकीय व्यासपीठाची आवश्यकता असल्याची भावना त्यांच्या समर्थकांनी अनेकदा व्यक्त केली होती. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी शिवसेनेची वाट निवडत पक्षात प्रवेश केला. या सोहळ्यास इहर्रीरहशल थरज्ञलहर्रीश यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मुकिंदर कुडके,शेख इस्माईल कुंचेलीकर,राजेंद्र अडागळे, रमेश रोकडे तसेच बाबुराव आंबेगावकर यांनीही शिवसेनेत प्रवेश करून कोतेवार यांना साथ दिली. या पक्षप्रवेशामुळे नायगांव तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये नव्या चर्चांना सुरुवात झाली असून, विविध सामाजिक संघटना, मित्रपरिवार आणि नागरिकांकडून गंगाधर कोतेवार होटाळकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी काळात त्यांच्या सामाजिक अनुभवाचा आणि जनसंपर्काचा लाभ शिवसेनेच्या संघटनात्मक विस्तारासह जनतेच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## स्वारातीम विद्यापीठात डिजिटलायझेशनच्या दिशेने पाऊल

**नवीन नांदेड** -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने डिजिटल प्रशासन आणि ई-गव्हर्नन्सच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण झेप घेत 'सेंट्रलाइज पेमेंट गेटवे' (उशर्पीररश्रळूशव झरूाशपीं ऋरीशुरू) या अत्याधुनिक ऑनलाइन शुल्क भरणा प्रणालीचा शुभारंभ केला आहे. या अभिनव सुविधेमुळे विद्यार्थ्यांना आणि संबंधित घटकांना विद्यापीठातील विविध प्रकारची शुल्के एकाच डिजिटल व्यासपीठावरून सहज, सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने भरता येणार आहेत. या प्रणालीचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ए. एम. महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार तसेच वित्त व लेखा अधिकारी डॉ. राजेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. पतंगे, डॉ. बाविस्कर, डॉ. खडके, नॅक संचालक डॉ. सुरेंद्र रेड्डी तसेच नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाचे संचालक डॉ. शैलेष वाढेर यांच्यासह विविध संकुलांचे संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक व प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन केंद्रीय पेमेंट गेटवे प्रणालीमुळे विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क, पदवी प्रमाणपत्र शुल्क, विविध अर्ज शुल्क तसेच विद्यापीठाशी संबंधित इतर सर्व आर्थिक व्यवहार एकाच ठिकाणी करता येणार आहेत. यामुळे विविध शुल्कांसाठी स्वतंत्र प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता राहणार नाही. विद्यार्थ्यांचा मौल्यवान वेळ वाचणार असून, रांगेत उभे राहण्याची गरज कमी होणार आहे. विशेष म्हणजे, या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना नगदी रक्कम बाळगण्याची आवश्यकता राहणार नसून डिजिटल माध्यमातून सुरक्षित व्यवहार करता येतील. सर्व व्यवहारांची तत्काळ नोंद उपलब्ध होत असल्याने आर्थिक व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता, अचूकता आणि विश्वासार्हता निर्माण होणार आहे. तसेच व्यवहारांची गती वाढून प्रशासनिक कार्यक्षमतेतही लक्षणीय सुधारणा होणार आहे.

# मतदार यादीतील एकही पात्र नागरिक वंचित राहू नये : उपजिल्हाधिकारी राजकुमार माने

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ५ जुलै -**

लोकशाहीचा सर्वात महत्त्वाचा आधार असलेल्या मतदार यादीची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने हाती घेतलेल्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण (डखठ-२०२६) मोहिमेला नायगाव तालुक्यात वेग आला आहे. या मोहिमेत कोणताही पात्र नागरिक मतदानाच्या घटनात्मक अधिकारापासून वंचित राहू नये, यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी राजकुमार माने यांनी केले.

शनिवार (दि. ४ जुलै) रोजी त्यांनी कुंटूर, बरबडा आणि नरसी येथे प्रत्यक्ष भेट देत सुरू असलेल्या पुनरीक्षण मोहिमेचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ), मतदार आणि ग्रामस्थांशी संवाद साधून मोहिमेचे महत्त्व, प्रक्रिया आणि नागरिकांची भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड व निवडणूक विभागाचे सुपरवायझर के. एल. नलबलवार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. विशेष पुनरीक्षण मोहिमेंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओ प्रत्येक घराला तीन वेळा भेट देऊन प्रगणन फॉर्मचे वितरण, मतदारांची माहिती संकलन आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून देत प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन माने यांनी केले. प्रशासनाच्या वेळापत्रकानुसार ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार असून ५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत नाव समाविष्ट करणे, वगळणे अथवा दुरुस्तीसाठी दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. त्यानंतर सुनावणी पूर्ण करून ३ ऑक्टोबर पर्यंत निर्णय घेण्यात येईल आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.



मतदानाचा अधिकार हा लोकशाहीतील सर्वात मौल्यवान अधिकार आहे.

त्यामुळे प्रत्येक कुटुंबाने आपल्या सर्व सदस्यांची नावे मतदार यादीत अचूक आहेत का, याची खात्री करून आवश्यक दुरुस्त्या वेळेत करून घ्याव्यात. तसेच ही जनजागृती आपल्या परिसरातही पोहोचवून लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांनी केले. या भेटीदरम्यान बीएलओ जिलानी बागवान, चिंतले, कवटीकवार, चिखले, आडबलवार, गाजलवाड, नंदकिशोर नरसीकर यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नायगांवात एका रात्रीत पाच दुकाने फोडली

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ५ जुलै -**

नायगांव शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेत शनिवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत एका रात्रीत सलग पाच दुकाने फोडल्याची धक्कादायक

घटना घडली.विशेषतःही सर्व दुकाने पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असल्याने शहरातील व्यापारी, नागरिक आणि व्यावसायिकांमध्ये तीव्र अस्वस्थता पसरली असून सुरक्षाव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीनंतर चोरट्यांनी मुख्य बाजारपेठेतील दुकानांचे शटर उचकटून आत प्रवेश केला. काही दुकानांमधील रोकड, तर काही ठिकाणचे मौल्यवान साहित्य आणि विक्रीसाठी ठेवलेल्या वस्तू लंपास करण्यात आल्या. पहाटे दुकानदार दुकाने उघडण्यासाठी आल्यानंतर तुटलेली शटर, अस्ताव्यस्त पडलेले साहित्य आणि चोरीचे स्पष्ट चिन्ह दिसताच परिसरात एकच खळबळ उडाली. काही वेळातच बाजारपेठेत व्यापारी आणि नागरिकांची मोठी गर्दी झाली.



या घटनेची सर्वाधिक चर्चा पोलीस ठाण्याच्या निकटवर्ती परिसरातच चोरी घडल्यामुळे होत आहे. एका रात्रीत सलग पाच दुकाने फोडली जाणे ही सामान्य बाब नसून शहरातील सुरक्षाव्यवस्थेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. व्यापारी वर्गाने रात्रीच्या गस्तीची प्रभावी अंमलबजावणी, बाजारपेठेतील सुरक्षा व्यवस्था आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून शहरात चोरीच्या घटनांची वाढ होत असल्याची भावना व्यापाऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे व्यवसायिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून लाखो रुपयांच्या नुकसानीमुळे अनेक व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसल्याचे सांगितले जात आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज जप्त करून त्याची तपासणी सुरू करण्यात आली असून संशयितांच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी तांत्रिक तपासही सुरू करण्यात आला आहे. चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घेण्यासाठी विविध पथके कार्यरत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, व्यापारी संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत दोषींना तातडीने अटक करावी, रात्रीची गस्त अधिक प्रभावी करावी, मुख्य बाजारपेठेत कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था उभारावी आणि व्यापाऱ्यांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलना चा इशाराही बाजार पेठेतील व्यापाऱ्यांनी दिला आहे.

**बाजार पेठेतील व्यापाऱ्यांचा पोलीस प्रशासनाला थेट सवाल**

पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेली दुकानेही सुरक्षित नसतील, तर शहरातील सामान्य व्यापाऱ्यांनी आणि नागरिकांनी सुरक्षिततेची अपेक्षा कोणाकडून करायची? असा संतप्त सवाल व्यापारी वर्गातून उपस्थित केला जात आहे. या घटनेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे

# मोमिनपुरा येथे एस.आय.आर. विशेष नोंदणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ५ जुलै -**

विशेष सघन पुनरिक्षण (ड.ख.ठ.) अभियानांतर्गत रविवारी (दि. ५ जुलै) मोमिनपुरा येथील जवाहरुल उलूम उर्दू स्कूल येथे सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विशेष नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिराचे आयोजन ॲड. माज बडगुजर, सचिव, वकील संघ, किनवट यांच्या पुढाकाराने करण्यात आले. शिबिरात मुख्याधिकारी मृगाजी काकडे, तसेच संबंधित बीएलओ यांनी उपस्थित राहून मतदार नोंदणी, नाव दुरुस्ती, पत्ता बदल, नवीन मतदार नोंदणी आदी प्रक्रियेबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले.

शिबिरात परिसरातील बहुसंख्य नागरिकांनी उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून विविध सेवांचा लाभ घेतला. मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत करण्याच्या दृष्टीने अशा शिबिरांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

# भोकरमध्ये खूलेआम गूटखा विक्री; संबधिताचे दूर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ५ जुलै -**

पानमसाला सूगंधीत जर्दा व गूटखा हे मानवी आरोग्यास घातक ठरत असल्यामूळे राज्यसरकारकडून यावर बंदी आणली शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत भोकरमध्ये प्रतिबंधित अवैध गूटखा सर्रास विक्रि होताना पहावयास मिळत आहे.

शहरातील गूटखा विक्रेत्यांनी सूपारी स्टोअर्स, गोळी भांडार या नावाने आपली दूकाने थाटली या दूकानातून सर्रास गूटखा व जर्दा विक्रि सूरु असून अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयूक्त तूकाराम मूंढे यांचेकडे सूत्रे आल्यानंतर राज्यातील अनेक गूटखा माफीयांचे व भेसळ करणार्यांचे धाबे दणाणले त्यांना धडाकेबाज कारवायासाठी ओळखले जातात भेसळयूक्त अन्नपदार्थ व बनावट औषधाच्या विरोधात त्यांनी पूकारलेल्या मोहिमेमूळे अनेक अवैध धंदेवाल्याचे धाबे दणाणले आहेत.भोकर शहरात मात्र गूटखा माफीयांनी सर्रास गूटखा विक्रि करित असल्याचे निदर्शनास येत आहे.मोठ्या प्रमाणात गूटखा साठवून भोकर तालूक्यासह इतरत्र वाहतूक करित असल्याची चर्चा आहे.भोकर शहर हे तेलंगणा सिमेवर असल्यामूळे माफीयांनी तेलंगणातून गूटखा आणून किरकोळ व्यापार्यांना चढ्या दराने विक्रि करत आपले उखळ पांढरे करुन घेत आहेत गूटखा माफीयांची गोदामे इतरत्र असल्याची माहिती असून साठवणूक करित असलेल्या गोदामाची चौकशी केल्यास मोठ्या प्रमाणात गूटख्याचा साठा मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येते अन्न व औषध प्रशासनातील अधिकारी भोकरमधील गूटखा माफीयांना अभय देत असल्याने गूटखा माफीयांचे मनोबल वाढले आहे.वरिष्ठांनी याकडे लक्ष घालून भोकर शहरातील प्रतिबंधित गूटखा विक्रि तात्काळ बंद करण्यात यावी अशी मागणी नागरीक करित आहेत.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्लास्टिक कॅरीबॅगमुळे पर्यावरण धोक्यात; कापडी पिशवी वापरण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ जुलैः जागतिक प्लास्टिकमुक्त दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ लातूर सिटी व आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी या सामाजिक उपक्रमाच्या संयुक्त विद्यमाने दयानंद महाविद्यालय गेट परिसरात नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिकमुक्तीबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी प्लास्टिक कॅरीबॅगच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरणासह मानवी आरोग्य आणि पशुपक्ष्यांवर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती नागरिकांना देण्यात आली. प्लास्टिकच्या पिशव्या सहज विघटन होत नसल्याने त्या अनेक वर्षे जमिनीत आणि नाल्यांमध्ये साचून राहतात. त्यामुळे मातीची सुपीकता कमी होते, नाले तुंबून पूरस्थिती निर्माण होते, तसेच जनावरे प्लास्टिक खाल्ल्याने त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. प्लास्टिक जाळल्याने विषारी वायू तयार होऊन वायू प्रदूषण वाढते आणि त्याचा मानवी आरोग्यावरही गंभीर परिणाम होतो, असे यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमास महानगरपालिका अधिकारी श्री. समाधान सुरवंशी, डॉ. अजय नारायणकर (रीजन चेअरमन, लायन्स), श्री. अशोक पांचाळ (डीसी, लायन्स क्रेस्ट), श्री. सौरभ सुतार (अध्यक्ष, लायन्स क्लब लातूर हेल्पिंग हँड्स), लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीचे अध्यक्ष अनिलजी जवर, सचिव ईश्र्वरजी चांडक तसेच आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी या सामाजिक उपक्रमाचे अध्यक्ष संजय राजुळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



## विविध वृत्त...

## एक रकमी कर भरणाऱ्यांना मनपाकडून व्याजात सवलत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ जुलै : दिनांक ६ ते २० जुलै या कालावधीत थकीत कर एकरकमी भरणाऱ्या नागरिकांना व्याज शास्तीमध्ये १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात आला आहे.

शहरातील नागरिकांनी आपल्याकडील थकीत कराचा भरणा करावा यासाठी महानगरपालिकेच्या वतीने वेळोवेळी आवाहन करण्यात येत आहे. अनेक नागरिकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी शिल्लक आहे. नागरिकांनी व्याजात सुट देण्याची मागणी सुधा केली होती. नागरिकांची मागणी व कर वसुलीस चालना देणे साठी थकीत करावरील व्याजामध्ये सवलत देण्याचे निर्देश महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे, विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी प्रशासनाला दिले आहेत. त्यानुसार नूतन आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी दिनांक ६ जुलै ते २० जुलै या कालावधीत थकीत कराचा एकरकमी भरणा करणाऱ्या नागरिकांना व्याज शास्ती मध्ये १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

भरणा तरी शहरातील नागरिकांनी या सुवर्ण संधींचा लाभ घेऊन आपल्याकडील थकीत कर महानगरपालिकेकडे करावा, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने अनेकांच्या जीवनात आदर्श निर्माण केला आहे : राहुलकुमार मीना

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ जुलै : भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने आपल्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या यशस्वी वाटचालीत अनेकांच्या जीवनात आदर्श निर्माण करण्याचे काम केले आहे. असे प्रतिपादन लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांनी केले.श्री केशवराज शैक्षणिक संकुलाच्या वतीने दि.५/७/२०२६ रोजी दयानंद सभागृहात आयोजित केलेल्या 'गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा' कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून राहुलकुमार मीना बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.राम पाटील हे होते.या सत्रात इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले विद्यार्थी व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसमवेत गौरव करण्यात आला.



यावेळी प्रमुख अतिथी म्हणून लातूर जिल्हा परिषदेतील भाजपचे गटनेते रामचंद्र तिरुके यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच यावेळी मंचावर संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, संजय गुरव, केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समिती अध्यक्ष (माध्य.) गंगाधर खेडकर, रेनिसन्स सीबीएसई विभागाचे अध्यक्ष प्रा.कृष्णा जाधव, माध्यमिकचे मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, प्राथमिकचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे, रेनिसन्स सीबीएसईच्या प्राचार्या सोनाली दर्डा, केशव शिशुवाटिका प्रधानाचार्या अवंती कुलकर्णी आदींची उपस्थिती होती.

जीवनात यशासाठी शिस्त खूप महत्त्वाची आहे.शिस्तीने सातत्य निर्माण होते,असे सांगून राहुलकुमार मीना पुढे म्हणाले, की विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात कधीही शून्य दिवस येऊ देऊ नये. सध्या सर्वांना तात्काळ, इन्स्टंट यश हवे आहे, पण इन्स्टंट यश कधीही मिळत नसते. त्यासाठी शिस्त, सातत्य असलेच पाहिजे. कोणतेही यश अगदी सहज मिळत नसते. त्यासाठी कठोर परिश्रमाची आवश्यकता असते. आपल्या समोर आलेली समस्या सोडवता आली पाहिजे. चर्चेतून कितीही जटील समस्यांचे निराकरण करणे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शालेय अभ्याससोबतच स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठीही प्रयत्न करावेत. विद्यार्थी मित्रांनी पुढच्या दहा वर्षात चांगले मित्र निवडावेत. अभ्याससोबतच आपल्यातील अन्य सुप्त गुणांनाही वाव द्यावा असे मत मीना यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात यश मिळवावे, पण यशस्वी व्हावे असे सांगून पालक - शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाने विद्यार्थी जीवनात नक्कीच यशाचे अत्युच्च शिखर गाठतील,असा विश्र्वासही राहुलकुमार मीना यांनी व्यक्त केला.

रामचंद्र तिरुके यांनी आपल्या भावना व्यक्त करताना भारतीय शिक्षण प्रसारक या संस्थेकडून चौफेर शिक्षणासोबतच माणूस म्हणून जगण्याचे शिक्षण देण्याचे काम प्रभावीपणे केले जात असल्याचे सांगितले. या संस्थेने अनेक राजकीय नेते,आयएएस,आयपीएस अधिकारी, अभियंते,उद्योजक दिले असल्याचे नमूद करून गुणवंत विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले.आलेल्या किरकोळ अपयशाने खचून न जाता विद्यार्थ्यांनी पुन्हा नव्या दमाने यश संपादन करण्यासाठी परिश्रम करण्याची तयारी ठेवून प्रशासनातील आयएएस, आयपीएस सारख्या उच्च पदापर्यंत मजल मारावी,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोप डॉ.राम पाटील यांनी केला. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशामागे पालकांचा त्याग, शिक्षकांचे परिश्रमही असतात.विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर केवळ गरजेपुरता करावा आणि मोठी स्वप्ने बघून त्यांच्या पूर्ततेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे यांनी केले.महेश काकनाळे यांनी वैयक्तिक पद्य सादर केले.श्रीमती कांचन तोडकर यांनी सरस्वती स्तवन प्रस्तुत केले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या वतीने इ.१० वीच्या कु. श्रुतिका गंगावणे हिने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र जोशी, श्रीमती शैला सांगवीकर यांनी तर आभार प्रदर्शन श्रीमती अवंती कुलकर्णी यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन दहावी प्रमुख अर्चना ठोंबरे व लक्ष्मण गिराम यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी, राम जोशी, अंजली निर्मळे तसेच शिशुवाटिका, प्राथमिक,माध्यमिक, रेनिसन्स सीबीएसई विभाग, श्री केशवराज कनिष्ठ महाविद्यालय या सर्व विभागातील सर्व शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात आज महामोर्चा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ जुलै : महाराष्ट्र शासनाच्या वतीने अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये अ, ब, क, ड अशा स्वरूपाचे उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेला विरोध दर्शवण्यासाठी आज दि. ६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोर्चास प्रारंभ करण्यात येईल. त्यानंतर छत्रपती राजर्षी शाहू चौक, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे पुतळा, गंजगोलाई, हनुमान चौक, महात्मा गांधी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, अशोका हॉटेल, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जुने जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे मोर्चाची सांगता होईल. त्यानंतर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चास सरसेनानी आनंदराज आंबेडकर, माजी मंत्री राजकुमार बडोले, माजी आमदार बबनराव घोलप तसेच युवा नेते अमन आंबेडकर यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

अनुसूचित जातीच्या आरक्षणातील अ, ब, क, ड उपवर्गीकरणाचा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, उपवर्गीकरणासाठी नेमण्यात आलेली समिती तात्काळ बरखास्त करण्यात यावी, संबंधित समितीचा अहवाल फेटाळून लावण्यात यावा, अनुसूचित जातीच्या आरक्षणाची शंभर टक्के प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी,

शासनातील सर्व रिक्त आरक्षित पदे तातडीने भरावीत., शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृहे, संशोधन आणि उच्च शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढविण्यात याव्यात, अनुसूचित जातींसाठीचे आरक्षण लोकसंख्येच्या प्रमाणात वाढवून किमान २० टक्के करण्यात यावे, अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांचे संरक्षण करून आरक्षण कमकुवत करण्याचे सर्व प्रयत्न थांबविण्यात यावेत आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

संविधानाने प्रदान केलेल्या हक्कांच्या संरक्षणासाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व समाजबांधव, महिला, युवक, युवती, विद्यार्थी, कर्मचारी, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून महामोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन अनुसूचित जाती प्रवर्ग उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा कृती समिती, लातूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जंगम समाजातील गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा थाटात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ६ जुलै : लातूर जिल्हा सकल जंगम समाजाच्या वतीने येथील गिरवलकर मंगल कार्यालयात श्री. ष. ब्र. १०८ शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज हिरेमठ संस्थान औसा यांच्या दिव्य सानिध्यात, राष्ट्रीय जंगम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रावण राजेंद्र जंगम सातारा व प्रमुख वक्ते शिवानंद स्वामी तुपकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत जंगम समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा थाटात पार पडला.




यावेळी बंडपण्णा काळगे, पंचाक्षरी बाबय्या मठपती स्वामी, कुमार स्वामी गणाचार्य महाराज, शरणप्पा कलेमले, शिवहार स्वामी बर्दापूरकर, सुर्यकांत पत्रे, शिवलिंग स्वामी मठपती, ॲड. सांबाप्पा गिरवलकर, ॲड. गंगाधरप्पा हमणे, प्रा. मन्मथप्पा प्रा. सुदर्शन बिरादार, उमाकांत कोरे, बसवंतप्पा भरडे, अंबुलगे, मल्लिकार्जुन शंकर स्वामी, संगमेश्र्वर बालकुंदे, महादेव बालकुंदे, सोमनाथ बालकुंदे, दयानंद स्वामी, पंचाक्षरी, शरणप्पा नागनाथ स्वामी, डॉ. रुद्रमनी स्वामी, डॉ. गणेश स्वामी, डॉ. मन्मथ स्वामी, डॉ. जयश्री चंदेश नागुरे स्वामी, कमलबाई शंकर स्वामी, संगीताताई संगमेश्र्वर बालकुंदे आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. ष. ब्र. १०८ शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज, शिवानंद स्वामी तुपकरी, श्रावण राजेंद्र जंगम यांनी मार्गदर्शन केले. सुमारे १०० गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा गौरव करण्यात आला. प्रास्ताविक त्र्यंबक स्वामी यांनी केले. सर्वांचे आभार अध्यक्ष शिवशंकर स्वामी यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन / इतर जाहिराती योग्य दरात छापल्या जातील संपर्क –७३८५५६७०३१

## सर्व पॅथीच्या डॉक्टरांनी एकत्र येत साजरा केला 'डॉक्टर्स डे'

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ जुलै : रुग्णासाठी डॉक्टर म्हणजे केवळ उपचार करणारी व्यक्ती नसते, तर संकटाच्या काळात धीर देणारा, आशेचा किरण दाखवणारा आधारवड असतो. अशा या पवित्र नात्याला अधिक विश्र्वास, संवेदनशीलता आणि आपुलकीची जोड देण्याचा संकल्प लातूरमध्ये जागतिक डॉक्टर्स डे निमित्त सर्व पॅथीच्या डॉक्टरांनी एकत्र येत केला.

यानिमित्ताने ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी आणि दंतवैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर प्रथमच एका छताखाली एकत्र आले. लातूर आयएमएच्या एमएच्या संकल्पनेतून साकारलेल्या या अनोख्या उपक्रमात सुमारे २०० हून अधिक डॉक्टर

सहभागी झाले होते. वैद्यकीय उपचारपद्धती वेगवेगळ्या असल्या तरी रुग्णाचे दुःख कमी करण्याचे ध्येय एकच असल्याची भावना यावेळी प्रत्येकांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली. अनेक डॉक्टरांचा या निमित्ताने प्रथमच एकमेकांशी परिचय झाला आणि व्यावसायिक नात्यांपलीकडे मैत्री, संवाद व सहकार्याचे नवे बंध निर्माण झाले.




धन्वंतरी पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. व्यासपीठावर डॉ. सोपान जटाळ, डॉ. अशोक गाणू, आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, महिला विंगच्या अध्यक्षा डॉ. श्र्वेता काटकर, सचिव डॉ. आकांक्षा त्रिपाठी, निमा नेमा संघटनेचे अध्यक्ष डॉ. बालाजी साळुंके, सचिव डॉ. विकास

कदम, होमीओपॅथीच्या डॉ. आम्रपाली देशमुख, डॉ. स्मिता वडे, डेंटल असोसिएशनचे डॉ. संजू बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय करणारे डॉक्टर्स आणि त्यांच्या गुणवंत पाल्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. त्यात डॉ. ब्रीजमोहन झंवर, डॉ. आरती झंवर, संजू भार्गव, डॉ. अनघा राजपूत, डॉ. रामेश्र्वरी अलाहाबादे, ऋषीकेश गोरे, ओजस्वी सुळ, सिध्देश इंगळे, प्रहर्ष मुळे यांचा समावेश होता. सेवानिवृत्तीनिमित्त डॉ. अनिल सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. हर्षवर्धन राऊत यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. गिरीष कोरे आणि डॉ. दीपक गुगळे यांनी केले. डॉ. विश्रांत भारती यांनी आभार मानले.

## जि. प. शाळांच्या गुणवत्तेवर भर देणार : दयानंद सुरवसे



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ जुलै : जिल्हा परिषद शिक्षण समितीच्या बैठकीत जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्तेवर भर देण्यात आला असून, बैठक शुक्रवारी (दि. ३) खेळीमेळीत जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत जिल्हा परिषद शाळांचा कमी होत असलेला पट, यावरही विशेष चर्चा झाली. जि. प. शाळांचा पट वाढविणे, शाळांना भौतिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून नवनवीन उपक्रम राबविणे, शिष्यवृत्ती, नवोदयसारख्या स्पर्धात्मक परीक्षांवर भर देण्यासंबंधी चर्चा झाली. तसेच शिक्षकांचे उब्दोधन करणे, पर्यवेक्षीय यंत्रणा सज्ज करणे, शाळा बांधकाम यासारख्या विषयांवर प्रकाश टाकण्यात आला. राज्य सरकारने २ जुलै २०२६ रोजी राज्यातील समग्र शिक्षा अभियान अंतर्गत ३३७८ कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायम करण्याचा अभूतपूर्व निर्णय राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेतला. त्यापैकी लातूर जिल्हा परिषदे अंतर्गत समग्र शिक्षा मधील १०७ कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले आहे. यामुळे शिक्षण समितीच्या बैठकीत प्रतिनिधी स्वरूपात या कर्मचाऱ्यांचा उपाध्यक्ष सुरवसे व इतर शिक्षण समिती सदस्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बैठकीस शिक्षण समिती सदस्या मनिषा कदम, सई गोरे, पूनम मुक्ता, शीतल चिलमे, रंजना चाटे, रूपाली गायकवाड, रामलिंग शेरे, मुकेश भालेराव, शिक्षणाधिकारी (यो.) तृप्ती अंधारे, शिक्षणाधिकारी (प्रा.) प्रमोद पवार यांच्यासह तालुक्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, अधीक्षक, कक्ष अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**

**E-TENDER NOTICE NO - 2026_DOAWB_1313465_1**

**Supply, Installation, Commissioning & Testing of Weigh Bridge 60 Ton & Generator 62.5 KVA**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Rasika Agro Processing Farmer Producer Company Ltd *is* one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org**, in *tender and procurement section*. The last date for submission of online bid is **13/07/2026 up to 03.00 PM**. Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project Dist. Latur**